
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३२४ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघाच्या शाखांतून प्राप्त संस्कारांमुळे स्वयंसेवक नि:स्वार्थता, अनुशासन आणि देशभक्तीच्या भावनेतून समाजसेवा करण्यासाठी सदैव सज्ज असतो. देशावर येणाऱ्या सर्व प्रकारच्या संकटप्रसंगी त्याचे वर्तन त्याच्यातील गुण आणि चारित्र्य प्रतिबिंबित करते.

**- श्रीकांत जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचार प्रमुख

## विनम्र अभिवादन



नेताजी सुभाषचंद्र बोस यांना आज जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

# दावोसमध्ये महाराष्ट्रासाठी ३० लाख कोटींचे सामंजस्य करार

◆ **दावोस, २२ जानेवारी**

दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकारांना दिली. यातून ४० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे.

महाराष्ट्रातील पत्रकारांशी त्यांनी व्हीसीच्या माध्यमातून आज संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. या करारांमध्ये ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक असून, एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात ही गुंतवणूक येते आहे. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय तंत्रज्ञान भागिदारीत आहे.

या १८ देशांमध्ये अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, जपान, स्वित्झर्लंड, स्वीडन, नेदरलँड, नॉर्वे, इटली, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, युएई, स्पेन, कॅनडा, बेल्जियम इत्यादींचा समावेश आहे. औद्योगिक, सेवा, कृषी, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक येते आहे. सामंजस्य करार प्रत्यक्षात परावर्तित होण्याचा दर हा ७५ टक्के आहे. गेल्यावर्षीचे करार हे ७५ टक्के प्रत्यक्षात आलेले आहेत, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.

### सर्वदूर गुंतवणूक



कोकण, एमएमआरमध्ये २२ टक्के, विदर्भात १३ टक्के, ५० टक्के राज्याच्या इतर भागात आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, धुळे, अहिल्यानगर अशा सर्व भागात ५० हजार कोटी, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये ५५,००० कोटी रुपये, कोकण प्रदेशात ३,५०,००० कोटी, नागपूर आणि विदर्भात २,७०,००० कोटी अशी प्रमुख आकडेवारी आहे. जायका, जेबीआयसी, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, स्टँडफोर्ड युनिव्हर्सिटीतील स्टँडफोर्ड बायोडिझाईन असे अनेक संस्थात्मक करार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. ■

# १५ महानगरांचा कारभार जाणार महिलांच्या हाती

## महापौरपदाचे आरक्षण जाहीर, १७ मनपा खुल्या प्रवर्गासाठी



**सर्वसाधारण**

(१) वसई-विरार- सर्वसाधारण (२) नागपूर- सर्वसाधारण (३) अमरावती- सर्वसाधारण (४) पुणे- सर्वसाधारण (५) सांगली-मिरज-कुपवाडा- सर्वसाधारण (६) सोलापूर- सर्वसाधारण (७) छत्रपती संभाजीनगर- सर्वसाधारण (८) परभणी- सर्वसाधारण

**सर्वसाधारण वर्ग (महिला) ९**

(१) मुंबई महापालिका (२) नवी मुंबई (३) मिरा-भाईंदर (४) पुणे (५) नागपूर (६) नाशिक (७) मालेगाव (८) धुळे (९) नांदेड-वाघाळा

**अनुसूचित जाती ३**

(१) जालना- एससी महिला (२) लातूर- एससी महिला (३) ठाणे- एससी

**अनुसूचित जमाती १**

१. कल्याण-डोंबिवली महापालिका

**ओबीसी ८**

(१) उल्हासनगर (२) पनवेल (३) कोल्हापूर (४) इचलकरंजी (५) अकोला (महिला) (६) चंद्रपूर (महिला) (७) अहिल्यानगर (महिला) (८) जळगाव (महिला)

◆ **मुंबई, २२ जानेवारी**

राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदासाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. यापैकी १५ महानगरपालिकांचा कारभार महिलांच्या हाती जाणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर या महानगरांच्या महापौरपदी महिला विराजमान होणार आहेत. एकूण १७ महापालिकांचे महापौरपद सर्वसाधारण (खुल्या) प्रवर्गासाठी राखीव झाले आहे. तर, ओबीसींसाठी ८, अनुसूचित जातींसाठी ३ आणि अनुसूचित जमातीसाठी १ महापौरपद आरक्षित झाले आहे.

नगरविकास विभागात राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत ही सोडत पार पडली. ५० टक्के महिला आरक्षणानुसार १५ महापालिकांमध्ये महिला महापौर निश्चित झाल्या आहेत. ९ महापालिकांमध्ये सर्वसाधारण महिला, ४ महापालिकांमध्ये ओबीसी महिला, २ महापालिकांमध्ये अनुसूचित जातींच्या महिला महापौरपदी विराजमान होणार आहेत. यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आता महिला नेतृत्वाचा नवा अध्याय सुरु होताना बघयाला मिळणार आहे.

**मुंबईत आरक्षणावरुन वाद**

मुंबई महापौर आरक्षणावर आक्षेप विरोधकांनी आक्षेप घेतला. मुंबई महापालिकेचे महापौरपद पुन्हा एकदा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव ठेवल्याने राजकीय वाद निर्माण झाला आहे. मुंबईत गेल्या २५ वर्षांत ओबीसी आणि अनुसूचित जमातीला महापौरपदाचे आरक्षण न मिळाल्याचा मुद्दा उपस्थित करत, ठाकरे गट आणि काँग्रेसने या आरक्षणावर आक्षेप घेतला. इतर महापालिकांसाठी जे निकष लावले गेले, ते मुंबईसाठी का लावले नाहीत? असा सवाल त्यांनी उबाठा गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी विचारत या लॉटरी प्रक्रियेवर बहिष्कार टाकला.

◂(तभा वृत्तसेवा)

### तीन सत्रांच्या घसरणीनंतर शेअर बाजारांत तेजी

◆ **मुंबई, २२ जानेवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँडच्या मुद्यावर घेतलेली सामंजस्याची भूमिका आणि भारतासोबत चांगला व्यापार करार होण्याबाबत दिलेल्या संकेतांनंतर शेअर बाजारांत गुरुवारी तेजी परतली. मागील तीन सत्रांच्या घसरणीनंतर बाजारात तेजी आली. दुसरीकडे रुपयात झालेली किरकोळ सुधारणा तसेच खनिज तेलांच्या किमतीत झालेल्या घसरणीचा सकारात्मक फायदा देशातील शेअर बाजारांना झाला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ३९७ अंकांनी वधारून ८२,३०७ वर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात निर्देशांकाने ८७३ अंकांची उसळी घेतली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १३२ अंकांनी उसळी घेत २५,२८९ या पातळीवर बंद झाला. जागतिक पातळीवर सकारात्मक संकेत प्राप्त झाल्याने आज मोठ्या प्रमाणात खरेदी झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.



मागील तीन सत्रांच्या घसरणीमध्ये गुंतवणूकदारांचे १० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे.

◂(वृत्तसंस्था)

# सोलापूरचे महापौरपद यंदा खुल्या प्रवर्गासाठी

- **पहिली अडीच वर्षे संधी**
- **महापौर कोण याकडे सोलापूरकरांचे लक्ष**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२२ जानेवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतर महापौर पदासाठी खुला प्रवर्ग म्हणजे सर्वसाधारण ओपन आरक्षण जाहीर झाले आहे. महापौर पद हे खुला प्रवर्गासाठी आरक्षित झाले असून या पदासाठी मोठ्या प्रमाणात रस्सीखेच होणार आहे. १०२ नगरसेवक असलेल्या महापालिकेत भाजपाने तब्बल ८७ जागा जिंकून महाविजय मिळवला आहे.



महापौरपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याची उत्सुकता सोलापूरकरांना लागली आहे. दरम्यान महापौर कोण हे नाव मुंबईतून येण्याचीही शक्यता दाट आहे. चार टर्म नगरसेवक राहिलेले विनायक कोंड्याल सर्वाधिक मताधिक्याने निवडून आले आहेत. त्यामुळे महापौर पदासाठी त्यांच्या नावाची चर्चा आहे. आ.विजयकुमार देशमुख यांचे सुपुत्र डॉ.किरण देशमुख, नरेंद्र काळे, अनंत जाधव, शिवानंद पाटील, सात्विक बडवे, रंजीता चाकोते यांच्याही नावांची चर्चा आहे. महापौर पदासाठी इच्छुक असलेल्यांनी आपापल्या गॉडफादरकडून फिल्डिंग लावली आहे. सामाजिक, राजकीय गणिते यावरच महापौर पदाचा उमेदवार ठरणार आहे. दरम्यान, आ.विजय देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे यांच्यात समन्वय साधून महापौर पदाचे नाव ठरविण्यात येणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात येते. विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त आणि सोलापूर महानगरपालिका नगरसचिव यांच्याशी विचार विनिमय केल्यानंतर पोट नियम (१) अन्वये विशेष सभा बैठक आयोजित होणार आहे. या बैठकीच्या किमान पूर्ण तीन दिवस आधी या पदासाठी नाम निर्देशन अर्ज करता येणार आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### अज्ञात कारणाने पत्नीचा मृत्यू तर गळफास घेऊन पतीने संपवले जीवन

**सांगोला तालुक्यातील कटफळ येथील घटना**


श्रीमंत मिसाळ


मंडाबाई मिसाळ

**सांगोला,दि.२२ जानेवारी -**
अज्ञात कारणाने पत्नीचा तर गळफास घेऊन पतीचा मृत्यू झाल्याची घटना सांगोला तालुक्यातील कटफळ येथे गुरुवार दि.२२ जानेवारी रोजी दुपारी घडली. याबाबत अधिक माहिती अशी, पत्नी मंडाबाई श्रीमंत मिसाळ, वय-५४ वर्षे, रा.कटफळ, ता.सांगोला, जि.सोलापूर ह्या त्यांच्या रहाते घरी अज्ञात कारणावरुन बेशुद्ध अवस्थेत मिळुन आल्या. तसेच पती श्रीमंत मारूती मिसाळ वय-५८ वर्षे, रा.कटफळ, ता.सांगोला, जि.सोलापूर हे त्यांच्या शेतात सुबाभळीच्या झाडाला सुताच्या दोरीने गळफास लावून घेतल्याचे आढळून आले. त्या दोघांना बाळासाहेब मिसाळ रा.कटफळ ता.सांगोला यांनी उपचाराकरीता ग्रामीण रुग्णालय, सांगोला येथे उपचारास दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासुन ते उपचारा पुर्वीच मयत झाले असल्याचे सांगितले. याबाबत बाळासाहेब मारूती मिसाळ, वय- ५६ वर्षे, रा.कटफळ, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी सांगोला पोलीस ठाणे येथे खबर दिली आहे. पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत.



### श्री गणेशोत्सवानिमित्त गुलमोहर सोसायटीत पाळणा व महाप्रसाद

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**
श्री गणेश जयंतीनिमित्त गुलमोहर सोसायटीत पाळणा सोहळा व महाप्रसादाचे आयोजन गुलमोहर सोसायटी येथे श्री गणेश जयंतीनिमित्त धार्मिक व भक्तिमय वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून त्याचा समारोप गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडला.समारोपाच्या दिवशी दुपारी बारा वाजता पाळणा सोहळा पार पडला. त्यापूर्वी श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या ग्रंथांची भव्य दिंडी काढण्यात आली. या दिंडीत सोसायटीतील सर्व महिला मोठ्या श्रद्धेने सहभागी झाल्या होत्या. दिंडीदरम्यान सर्व ग्रंथांची सामूहिक आरती करण्यात आली. त्यानंतर विधीवत ग्रंथपूजन करण्यात आले. श्री गणेश जयंतीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाप्रसादाचा शेकडो भक्तभाविकांनी लाभ घेतला, अशी माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. या संपूर्ण उत्सवामुळे परिसरात भक्तीमय व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. हा धार्मिक उत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी गुलमोहर सोसायटीतील स्थानिक नागरिकांनी अथक परिश्रम घेतले असून त्यांच्या सहकार्या मुळे कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व सुंदररीत्या संपन्न झाला.



### प्रभु श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठापना दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त महाप्रसाद वाटप

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**
श्री रुद्राक्ष प्रतिष्ठान तर्फे दि. २२ जानेवारी रोजी प्रभु श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठापना दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आला होता. दुपारी १:१५ वाजुन मिनिटाने प्रभु श्री सिया राम अक्षता सोहळा संपन्न झाल. अकरा जोडप्यांना विविध नैवेद्य देण्यात आले. २००० लोकांना संध्याकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री रुद्राक्ष प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष अंबादास लोकुर्ते व सर्व सहकारी मित्र परिवार आणि आमचे गुरु सुभाष देशमुख, मनिष देशमुख, भारतीय जनता पार्टी ॲड. योगेश कुरे, देवेंद्र शावंतुल, कन्नया रेड्डी, अर्जुन नागमल, गोविंद महिंद्रकर, राजेश अंबुरे, अनिल इंदापुरे, सुनिल इंदापुरे, रुपेश महिंद्रकर, उदय कंटली आदी बहुसंख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

### वेदमूर्ती बसवराज शास्त्री हिरेमठ यांचे निधन; आज अंत्ययात्रा



**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**
आपल्या वाणीने लाखो लोकांना खिळवून ठेवणारे वेदमूर्ती बसवराज शास्त्री हिरेमठ (वय ८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी दुपारी चार वाजता हत्तुरे वस्ती ओम नमः शिवाय नगर मधील त्यांच्या राहत्या निवासस्थानापासून निघणार आहे. बसवराजशास्त्री हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेत बसवराज शास्त्रींचा आवाज आला की लाखो भाविक आनंदाने जयघोष करायचे. मंदिरातील गर्भगृहात गेल्या ६५ वर्षांपासून अखंडपणे त्यांनी पोरोहित्याची सेवा केली. यंदाच्या यात्रेत बसवराज शास्त्रींचा आवाज ऐकू आला नव्हता. काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी त्यांना व्याख्यान केसरी ही उपाधी दिली होती. तत्त्वज्ञान विषयात त्यांनी पदवी प्राप्त केली होती. तसेच नवरात्रौत्सवात शिवगंगा मंदिरातील धार्मिक कार्यक्रमात ते सहभागी होत होते.

# मोडनिंब जिल्हा परिषद गटात रंगणार तिरंगी लढत!

**मोडनिंब तालुका पंचायत अर्ज दाखल; निवडणूक चुरशीची; राजकीय समीकरणे बदलणार?**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २२ जानेवारी -**
मोडनिंब जिल्हा परिषद गटात प्रमुख तीन पक्षांमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रभावती भारत शिंदे, भारतीय जनता पार्टीकडून वंदना शिवाजी कांबळे, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून पल्लवी सूर्यकांत पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

मोडनिंब गटात भारत शिंदे आणि शिवाजी कांबळे यांच्या पत्नी आमनेसामने असून लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पल्लवी पाटील यांनी शिवसेनाकडून (उद्धव बाळासाहेब ठाकरे) निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने सध्या निवडणुकीतील राजकीय समीकरणे बदलली असून लढतीत अधिक रंगत आली आहे. तिन्ही पक्षांच्या तिरंगी लढत होणार आहे म तदारांचे लक्ष या लढतीकडे लागले आहे. मोडनिंब पंचायत समिती गणासाठी पुढील उमेदवारांनी आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले.

यामध्ये प्राजक्ता प्रतापसिंह पाटील (नॅशनलीस्ट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), मंदाकिनी चांगदेव वरवडे (भारतीय जनता पार्टी), मनिषा दीपक सुर्वे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट),सुनंदा चंद्रकांत गिड्डे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) सुवर्णा अरुण गिड्डे (नॅशनलीस्ट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) यांचा समावेश आहे. नामनिर्देशन प्रक्रियेमुळे मोडनिंब गणामध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, या निवडणुकीकडे मतदारांचे लक्ष लागले आहे.

विविध पक्षांचे व अपक्ष उमेदवार रिंगणात उतरल्याने ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सर्व पक्षांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारी अर्ज भरताना अनेक ठिकाणी मोठ्या रॅली आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करण्यात आले.

प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देण्यावर भर दिला आहे, तसेच काही ठिकाणी आघाडीत जागावाटपावरून रस्सीखेच पाहायला मिळाली. बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले असून गुरुवारी छाननीची प्रक्रिया पार पडणार आहे.

## माघ यात्रा : दिंडीधारकांनी प्लॉटसची मागणी नोंदवावी : प्रांताधिकारी इथापे

**दि. २५ जानेवारीपासून प्लॉट नोंदणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जानेवारी -**
माघ यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि.२९ जानेवारी रोजी होत असून, यात्रा कालावधी २३ जानेवारी ते १ फेब्रुवारी असा आहे. या यात्रेत येणाऱ्या शेकडो दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. दि. २५ जानेवारी पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात येणार आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

माघ यात्रेला येणाऱ्या दिंड्यांम धील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात.या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्या साठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. भक्तीसागर (६५ एकर) येथे भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७७२४८२१०) तसेच ग्राम महसूल अधिकारी प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## मोडनिंब येथे गणेश मंदिरात गणेश जयंती सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २२ जानेवारी -**
मोडनिंब (ता.माढा) येथे गणेश जयंती सोहळा धार्मिक व भक्तिमय वातावरणात पार पडला. बाप्पाच्या मूर्ती समोर छोट्या पाळण्यामध्ये श्रीफळ रूपी बाप्पाला बसवून पारंपरिक पाळणा म्हणत बाप्पाचा जन्मोसत्व साजरा करण्यात आला.

दुपारी बारा वाजता पुष्प वृष्टी करण्यात आली.फटाक्यांची आतषबाजी झाली नंतर महाआरती झाली.दिवसभर भजनकीर्तन व गणपती भक्तिगीतांचे कार्यक्रम सुरू होते. मंदिरात आकर्षक फुलांची सजावट तसेच विद्युत रोषणाई, रांगोळी करण्यात आली होती. सहस्त्रावर्तन, अभिषेक, महापूजा, कीर्तन, प्रवचन, अथर्वशीर्ष पठण अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. भक्त मंडळांच्या वतीने आरतीसह महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. गणेश जयंतीनिमित्त मंदिरामध्ये फुलांची आरास करण्यात आली होती. रंगीबेरंगी फुलांनी केलेली ही आरास भाविकांचे लक्ष अधिकच वेधून घेत होती.जन्मोत्सव सोहळ्याची सांगता महाप्रसादाने झाली. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी दत्ता सुर्वे, नितीन सुर्वे, सोमनाथ माळी, मोहन शेळके, दत्तनगर गणेश मंडळ, आदर्शनगर गणेश मंडळ यांनी परिश्रम घेतले.

## मानेगाव येथे गणेश जन्मोत्सव मोठ्या उत्साहात; हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२२ जानेवारी-**
बार्शी तालुक्यातील मानेगाव येथील प्रसिद्ध सिद्धिविनायक गणेश मंदिर येथे गणेश जन्म ोत्सवाचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या निमि त्ताने आयोजित सोहळ्यात हजारो भाविकांनी दर्शनाचा आणि म हाप्रसादाचा लाभ घेतला, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता.



**महिलांची विक्रमी उपस्थिती**

यावर्षीच्या उत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे महिला भाविकांची लाभलेली लक्षणीय उपस्थिती. सकाळपासूनच महिलांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पारंपारिक वेशभूषेत आणि भक्तीभावात आलेल्या महिलांमुळे सोहळ्याची शोभा अधिकच वाढली.

**धार्मिक कार्यक्रम आणि महाप्रसाद**

गणेश जन्मोत्सवा निमित्त मंदिरात पहाटेपासूनच अभिषेक, पूजा आणि आरतीचे आयोजन करण्यात आले होते. 'सिद्धिविनायक प्रतिष्ठान, मानेगाव' च्या वतीने या कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले होते. दुपारी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा हजारो भाविकांनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने लाभ घेतला.

**सिद्धिविनायक प्रतिष्ठानचे नियोजन**

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सिद्धिविनायक प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. येणाऱ्या प्रत्येक भाविकाला सुलभ दर्शन मिळावे आणि महाप्रसादाचे वाटप सुरळीत व्हावे, यासाठी स्वयंसेवकांकडून चोख व्यवस्था करण्यात आली होती. मानेगावच्या सिद्धिविनायकावर भाविकांची मोठी श्रद्धा आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेश जन्मोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. ग्रामस्थांचे आणि प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांचे सहकार्य या सोहळ्याला लाभले.

**- आयोजक, सिद्धिविनायक प्रतिष्ठान.**

## रिध्दी-सिध्दी मंदिरात गणेश जन्मोत्सवानिमित्त पाळणा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. २२ जानेवारी -**
गणपती बाप्पा मोरया, हर हर महादेव, श्री स्वामी महाराज की जय असे विविध जयघोष करीत सुभाष गल्ली अक्कलकोट येथील श्री रिद्धी - सिद्धी गणेश मंदिर येथे श्री गणेश जन्मोत्सव निमित्य रक्तदान शिबीर महाप्रसाद पाळणा कार्यक्र मोठया जल्लोषात करण्यात आला.

प्रति वर्षाप्रमाणे यंदाही म.नि.प्र. श्री बसवलिंग महाराज यांच्या दिव्य सानिध्यात श्री रिद्धी - सिद्धी गणेश मंदिर समाजसेवी संस्था अध्यक्ष मल्लिनाथ साखरे, उपाध्यक्ष प्रकाश बसवणप्पा किलजे, सचिव शिवपुत्र गिरेच्या हळगोदे, सहसचिव दयानंद शरणप्पा बिडवे,खजिनदार राजेंद्र भुंजगे सुभाष गल्ली,रिद्धी सिद्धी गणेश मंदिर, जय हिंद मित्र मंडळ, श्री रिद्धी सिद्धी प्रतिष्ठान यांच्या वतीने गेल्या पंचवीस वर्षापासून श्री गणेश जन्मोत्सव कार्यक्रम मोठया उत्सहात आयोजित केला जातो.



गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी पहाटे श्री च्या मुर्तीस महाअभिषेक सकाळी १० वाजता भजन सत्संग महिला भजनी कार्यक्रम, दुपारी १२ वाजता पाळणा व गुलाल कार्यक्रम दुपारी १२ ते ५ पर्यंत सुमारे तीन हजार भक्तांनी महाप्रसाद घेतले.सुमारे ७९ जणांनी रक्तदान केले आहे. यावेळी श्रीमंत मालोजीराजे भोसले, नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी उपनगराध्यक्ष बंटी राठोड,श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अम ोलराजे भोसले माजी नगरध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, प्रथमेश इंगळे,नगरसेवक नागराज कुंभार, लक्ष्मीकांत धनशेट्टी, महेश हीडोळेसह नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंडळाचे संचालक, गुरुनाथ पोतदार, प्रशांत शिंपी,सुशिल किलजे, दयानंद रोडगे, राजेंद्र व महेश लोकापुरे, प्रभुलिंग हळगोदे, अनिल लोकापुरे, बसवराज धरणे,प्रकाश थंब, राजशेखर भरडे चनम लप्पा पट्टद, कु.मल्लम्मा पसारे राजशेखर कलबुर्गी, राचय्या शि. हळगुणकी,कु. शिवकांता पसारे,श्रीमती प्रभावती लोकापुरे आदी प्रमुख उपस्थित होते.सदर कार्यक्रम यशस्वीसाठी अनिल वेदपाठक, अरुण पोतदार, महेश कलबुर्गी, प्रशांत थंब (ज्ञि) संतोष पराने, गुरुनाथ पट्टद, सुरेश येळसंगे, संजय लोकांपुरे, प्रशांत शिंपी,शिवशंकर भूषणुरे आदिनी परिश्रम घेतले.



## श्री राजे गणपती सांस्कृतिक मंडळातर्फे गणेश जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**खा. प्रणिती शिंदे यांची होती प्रमुख उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी -**
श्री राजे गणपती सांस्कृतिक मंडळ वसंत विहार फेज ३ गणेश जयंती निमित्त श्री राजे गणपती सांस्कृतिक मंडळातर्फे विविध कार्यक्रम होम हवन -गुलाल पाळणा महाआरतीचे आयोजन केले होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती ही सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे व शिवसेना शहरप्रमुख महेश धाराशिवकर, प्राध्यापक उत्तरा बचुटे / बरडे, नगरसेवक बिज्जु प्रधाने, मंदाकिनी तोडकरी यांच्या हस्ते महाआरती व महाप्रसाद वाटप करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

शिवसेना सोलापूर शिवसेना शहर संघटक व मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुरेश जगताप, उत्सव अध्यक्ष सुहास लोंढे, शाखाप्रमुख राहुल परदेशी, राजेश पानकर, विशाल धंगेकर, दत्तात्रय सुरवसे, विवेक रुपनर, वैभव पाटील, मंगेश शिरसागर, तानाजी पाटील आदी महिला व पुरुष बहुसंख्येने उपस्थित होते.

## पंचायत समितीच्या १६ गणातून १२ तर जिल्हा परिषदेच्या ६ गटातून ५ उमेदवारी अर्ज अवैध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जानेवारी -**
पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकी मध्ये गुरुवारी (ता.२२) छाननी प्रक्रिया पार पडली. या छाननी प्रक्रियेच्या वेळी पंचायत समितीच्या १६ गणात १२ तर जिल्हा परिषदेच्या ६ गटात ५ उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आल्याची माहिती येथील प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

> दरम्यान या निवडणूकीचे अंतिम चित्र उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या मुदतीनंतरच आता स्पष्ट होणार आहे. त्यामुळे पंढरपूर तालुक्यातील नागरिकांचे लक्ष उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवसाकडे लागलेले आहे.

या संदर्भात माहिती देताना त्यांनी सांगितले की, पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या करकंब, भोसे, रोपळे ,गोपाळपूर या गटातून एक देखील उमेदवारी अर्ज अवैध ठरला नाही. दुसरीकडे भाळवणी गटातून २, टाकळी २ आणि कासेगाव गटातील १ अर्ज अवैध ठरलेले आहेत. जिल्हा परिषदेच्या या ६ गटातून एकुण १५८ उमेदवारी अर्ज प्राप्त झालेले होते. या मधील १५३ अर्ज वैध ठरले तर ५ उमेदवारी अर्ज अवैध ठरविले गेले आहेत.

या बरोबरच तालुक्यातील पंचायत समितीच्या १६ गणा पैकी उंबरे, करकंब, भोसे, गुरसाळे, रोपळे, पुळूज, गोपाळपूर, पटवर्धनकुरोली, टाकळी आणि सरकोली गणातून एकही उमेदवारी अर्ज अवैध ठरला नाही. तर सुस्ते ४, वाखरी १, भाळवणी २, पळशी २, खर्डी २ आणि कासेगाव गणातून १ असे एकुण १२ उमेदवारी अर्ज अवैध ठरविले गेले आहेत. दरम्यान तालुक्यातील पंचायत समितीच्या १६ गणातून २६७ उमेदवारी अर्ज प्राप्त झालेले होते.

त्या पैकी २५५ उमेदवारी अर्ज वैध ठरले तर केवळ १२ उमेदवारी अर्ज अवैध ठरल्याची माहिती प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्री.इथापे यांनी दिली.

## रानडे यांच्या लघुशब्दकोशात 'खोकड योगगुरु' शब्दाची नोंद

**सोलापूरचे डॉ. व्यंकटेश मेतन यांचे खोकड प्राण्यावर अभ्यासपूर्ण संशोधन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**
खोकडाच्या हालचालींचा प्रदीर्घ अभ्यास सोलापूरचे वन्यजीव फोटोग्रॉफर डॉ. व्यंकटेश मेतन यांनी केला आहे. खोकड स्वतःचे शरीर मोकळे करण्यासाठी पाय ताणतो, सर्व प्रकारच्या सांध्याचे व्यायाम करतो. खोकडाच्या या व्यायाम करण्याच्या क्रिया पाहून डॉ. मेतन यांनी खोकडाला 'योगगुरू' असे संबोधले आहे, असे रानडे यांनी शब्दकोशातील पृष्ठ क्रमांक २९७ वर म्हटले आहे. डॉ. मेतन यांनी अभ्यासपूर्ण शोधाने सोलापूरचा नावलौकिक वाढवल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.







योगगुरु या शब्दाची नोंद सुहास अनंत रानडे यांनी लिहिलेल्या मराठी समानार्थी लघु शब्दकोश आणि इतर बरच काहीखंड एक यामध्ये समावेश आहे. कोशकार सुहास अनंत रानडे यांनी 'मराठी समानार्थ लघु शब्दकोश आणि इतर बरंच काही'च्या पहिल्या खंडात चतुष्पाद प्राण्यांच्या सम ानार्थी शब्दांबरोबरच अन्यही अतिशय रंजक, महत्त्वाची माहिती दिली आहे. श्री. रानडे यांचे हे काम अद्वितीय स्वरूपाचे आहे.'परममित्र प्रकाशना'ने हा कोश सिद्ध केला आहे. प्रत्येक भाषाप्रेम ीच्या संग्रहात तो असलाच पाहिजे, असा ऐवज आहे. ९६८ पृष्ठांचा हा संग्राह्य मजकूर वाचताना श्री. रानडे यांच्या परिश्रमपूर्ण कामगिरीने थक्क व्हायला होतं. 'खोकड' हा प्राणी योगगुरू असल्याचे सोलापूरचे डॉ. व्यंकटेश मेतन यांनी नोंदवले असल्याचा उल्लेख रानडे यांनी केला आहे. खोकडाच्या हालचालींचा प्रदीर्घ अभ्यास मेतन यांनी केला आहे. खोकड स्वतःचे शरीर मोकळे करण्यासाठी पाय ताणतो, सर्व प्रकारच्या सांध्याचे व्यायाम करतो. खोकडाच्या या व्यायाम करण्याच्या क्रिया पाहून त्याला डॉ. मेतन यांनी 'योगगुरू' असे संबोधले आहे, असे या कोशात पृ. क्रमांक २९७ वर म्हटले आहे. (व्यंकटेश माडगूळकरांनीही खोकडाबद्दल, त्याच्या शिकारीबद्दल त्यांच्या साहित्यात ठिकठिकाणी लिहिलं आहे.)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### स्टील कारखान्यात स्फोटात ८ कामगारांचा मृत्यू

**रायपूर, २२ जानेवारी**

छत्तीसगडच्या बलौदा बाजार येथील एका स्टीलच्या कारखान्यात गुरुवारी सकाळी झालेल्या स्फोटानंतर भीषण आग लागली. या घटनेत आठ कामगारांना मृत्यू झाला, तर दहापेक्षा अधिक जखमी झाले. ढिगाऱ्याखाली अजूनही अनेक कामगार अडकले असून, बचावपथकांकडून शोधमोहीम सुरू आहे. जिल्हाधिकारी दीपक सोनी यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, बकुलाही येथील स्टील कारखान्यात कामगार सकाळी नेहमीप्रमाणे काम करत होते. मजूर आपापल्या कामात व्यस्त असतानाच अचानक स्पंज आयरन युनिटमध्ये मोठा स्फोट झाला. या आवाजाने परिसरातील काही किलो ीटरचा परिसर हादरून गेला. स्फोटानंतर एकच धावपळ उडाली आणि आगीच्या ज्वाळांनी रौद्र रूप धारण केले. आपल्या डोळ्यादेखत सोबती मृत्यूच्या दरीत ओढले जात असल्याचे पाहून मजुरांध्ये भीतीचे वातावरण पसरले. घटनेची माहिती मिळताच भाटापारा ग्रामीण पोलिस, अग्निशमन विभागाचे पथक आणि जिल्हा प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. ढिगाऱ्याखालून आतापर्यंत ८ मजुरांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

### वंदे भारत स्लीपर ट्रेन पहिल्याच हाऊसफुल्ल

**कामाख्या, २२ जानेवारी**

आसाममधील कामाख्या आणि पश्चिम बंगालमधील हावडा दरम्यान धावणाऱ्या वंदे भारत स्लीपर ट्रेनच्या (ट्रेन क्रमांक २७५७६) पहिल्या व्यावसायिक प्रवासाला प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. बुकिंग सुरू झाल्यानंतर २४ तासांपेक्षा कमी वेळात ट्रेनच्या सर्व वर्गांची तिकिटे विकली गेली. रेल्वेने वृत्त दिले की २२ जानेवारी रोजी कामाख्या येथून निघणाऱ्या वंदे भारत स्लीपर ट्रेनमधील सर्व जागा पीआरएस आणि इतर साइट्सद्वारे तिकीट बुकिंग सुरू झाल्यानंतर काही तासांतच बुक करण्यात आल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७ जानेवारी रोजी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या देशातील पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. रेल्वेनुसार, ही ट्रेन २२ जानेवारी रोजी कामाख्या येथून आणि २३ जानेवारी रोजी हावडा येथून आपला पहिला व्यावसायिक प्रवास सुरू करेल.



### वाहन दरीत कोसळले; १० जवान हुतात्मा

**श्रीनगर, २२ जानेवारी**

जम्मू आणि काश्मीरमधील दोडा जिल्ह्यातील भदेरवाह उपविभागातील थानाला येथे गुरुवारी सकाळी भारतीय लष्कराचे वाहन अनियंत्रित होवून दरीत कोसळल्याने दहा जवान हुतात्मा आणि सात जखमी झाले. एका अधिकाऱ्याने सांगितले की जम्मू आणि काश्म ीरमधील दोडा जिल्ह्यात भदेरवाह-चंबा आंतरराज्य रस्त्यावरील खन्नी टॉप येथे १७ जवानांना घेऊन जाणारे बुलेटप्रूफ लष्कराचे वाहन वाहन रस्त्यावरून घसरून खोल दरीत कोसळले. चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. लष्कर आणि पोलिसांनी तत्काळ संयुक्त बचाव मोहीम सुरू केली आणि अपघातग्रस्त वाहनातून १० जवानांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. इतर सात जवानांना जखमी अवस्थेत दोडा येथील रुग्णालयात हलविण्यात आले. त्यापैकी तीन गंभीर जखमींना विशेष उपचारांसाठी उधमपूर लष्करी रुग्णालयात विमानाने नेण्यात आले.

### मोहोळ निवडणूक; जि.प.साठी ८९ तर पं.स.साठी ९७ उमेदवार

**मोहोळ, दि. २२ जानेवारी -**

मोहोळ जिल्हा परिषदेच्या सहा जागांसाठी एकूण ९० उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले होते. पंचायत समितीच्या १२ जागां साठी १०१ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते यापैकी जिल्हा परिषदेचा नरखेड गटातील एक अर्ज छाननी मध्ये बाद करण्यात आला त्यामुळे ८९ उमेदवार रिंगणात राहीले तर पंचायत समिती चे चार गणातील अर्ज बाद झाले आहेत त्यामुळे आता ९७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. यामध्ये सहा जिल्हा परिषद गटापैकी नरखेड जिल्हा परिषद गटातील सुशील कुबेर मोटे यांचा अर्ज शपथ पत्र साक्षांकित नसल्यामुळे बाद करण्यात आला आहे. तर पंचायत समितीच्या सावळेश्वर गावातील मयुरी समाधान शेंडगे यांच्या अर्जावर सुचत दुबार असल्याने अर्ज बाद करण्यात आला कामती बु गणातील अंजली जीवन गेंगाणे यांनी अनामत रक्कमच भरली नसल्याने त्यांचा अर्ज बाद करण्यात आला तर पोखरापूर गणाततुन फुलचंद निवृती सरवदे यांनी अर्ज भरला होता त्यांच्या अर्जावर इतर गणातील सुचक असल्याने त्यांचा अर्ज बाद झाला तर टाकळी सिकंदर गणातील स्वाती दिपक गवळी यांचा सुचक दुबार असल्याचे कारणाने अर्ज बाद करण्यात आला आहे.

### हरिभाई कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

हरीभाई कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. नीलिमा माळगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कॉलेजविषयी असणारे प्रेम, जिव्हाळा त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी प्राचार्य दीपा फाटक, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक भानुदास बनसोडे, पर्यवेक्षक आप्पासाहेब राऊत, कार्याध्यक्ष चंद्रकांत जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा महेश पाटील यांनी केले. श्रीमती उर्मिला चव्हाण यांनी आभार मानले

# ४ महिलांनंतर यंदा पुरुषाला महापौरपदाची संधी!

## २०१२ ते २०२२ या १० वर्षांच्या कालावधीत राठोड, आबुटे, बनशेट्टी, यन्नम यांनी भूषविले होते महापौरपद

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

सोलापूर महापौरपदाचे आरक्षण यंदा सर्वसाधारण म्हणजेच खुले पडल्याने पुरुष महापौर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान सन २०१२ ते २०२२ या कालावधील काँग्रेसच्या अलका राठोड, प्रा.सुशिला आबुटे आणि भाजपाच्या शोभा बनशेट्टी, श्रीकांचना यन्नम या चार नगरसेविकांनी महिला महापौरपदाचा मान मिळवला होता. आता भाजपाकडून दावेदार असलेल्या पुरुष नगरसेवकांमध्ये महापौर होण्यासाठी चढाओढ लागली आहे. महापौर कोण होणार आणि कोणत्या आमदाराचे वर्चस्व पालिकेवर असणार? हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

सलग दहा वर्षे महापौरपदाच्या माध्यमातून सोलापूर शहरावर महिला नगरसेवकांनी राज केल्याचे सोलापूरकरांनी पाहिले. सन १९६४ साली सोलापूर महापालिका अस्तित्वात आल्यापासून पुलोद सत्तेचा अपवाद वगळता सन १९१७ पर्यंत महापालिकेवर काँग्रेसची निर्विवाद सत्ता होती. सन १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसचा उदय झाल्यानंतर काँग्रेसबरोबर राष्ट्रवादीही महापालिकेच्या सत्तेत सहभागी झाली. सन २०१७ मध्ये भाजपाने महापालिकेतील काँग्रेसची सत्ता उलटवून लावत १०२ पैकी ४९ जागा जिंकत एकहाती सत्ता आणली. काँग्रेसच्या काळातही पक्षांतर्गत वाद होते. पण ते एका मर्यादेच्या बाहेर जात नव्हते. परंतु भाजपाच्या पाच वर्षाच्या सत्तेत भाजपामधील पक्षांतर्गत वाद सातत्याने चव्हाट्यावर आल्याचे दिसून आले.



महापालिकेचे ४९ नगरसेवक दोन आमदारांच्या गटात विभागले गेले आणि त्यांच्यात सातत्याने वाद होत असल्याचे सर्वश्रृत आहे. काँग्रेसच्या सत्ता काळातही अनेक वर्षे सोलापूरकरांना दैनंदिन पाणीपुरवठा होत नव्हता आणि भाजपाच्या काळातही पाणीपुरवठ्याची तीच परिस्थिती होती. सर्वच सत्ताधाऱ्यांनी दैनंदिन पाणीपुरवठ्याचे आश्वासन सोलापूरकरांना दिले. पण आजही सोलापूरकरांना आठवड्यातून एकदाच पाणीपुरवठा होतो, ही शोकांतिका आहे. विशेष म्हणजे सोलापूर जिल्ह्यात विशालकाय १२३ टीएमसी क्षमतेचे उजनी धरण आहे.

आता भाजपाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकासासाठी सोलापूरचे पालकत्व स्वीकारल्यानंतर विमानसेवा, दुहेरी जलवाहिनी हे विषय मार्गी लागले. असून शहरातील दोन उड्डाणपूल, आयटी पार्क हे विषय होण्याच्या मार्गावर आहेत. शहरातील रस्त्यांची बहुतांश प्रमाणात दुरवस्था आहे. अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले आहे. अतिक्रमण आणि अस्वच्छतेमुळे स्वच्छ सोलापूर, सुंदर सोलापूर नाऱ्याचा फज्जा उडाला आहे. वाढलेल्या धुळीच्या प्रदूषणाने सोलापूरकरांचा श्वास कोंडला जात आहे. महापालिका प्रशासनावर कोणत्याही पक्षाला मजबूत पकड घेता आलेली नसल्याचे दुर्दैव आहे. महापालिकेच्या बांधकाम खात्यात प्रशासनातील अधिकाऱ्यांनीच बोगस बांधकाम परवाना देण्याची सम ांतर प्रशासकीय यंत्रणा राबवून मोठा घोटाळा केल्याचे उघडकीस आलेले आहे. पार्क चौपाटीवरील अतिक्रमण हटविण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. स्मार्ट सिटीची कामे निकृष्ट झाल्याचे आरोप जैसे थे आहेत. शहरात सिटी बससेवाच नसल्याने रिक्षाचालकांची मुजोरी व मनमानी भाडेआकारणी सोलापूरकरांना नाहक सहन करावी लागते आहे.

सलग तीन वर्षे महापालिकत प्रशासनाचा कारभार सुरु होतो, त्यामुळे जनतेला प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला आहे. कारण प्रशासनाला जाब विचारणारे नगरसेवकच तीन वर्षे नव्हते. किमान सोलापूर आणि जुळे सोलापुरातील रस्तांची कामे तरी महापालिकेने करणे अपेक्षित होते. पण रस्त्यांना ठिगळपट्टी करून जबाबदारी झटकली जात आहे. जिथे आमदार खमम्या तिथे मात्र कामे करुन घेतली जात आहेत.

आता महापालिकेवर भाजपाची निर्विवाद सत्ता आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केल्याप्रमाणे सोलापूरकरांना दैनंदिन व वेळेत सुरळीत पाणीपुरवठा, आयटी पार्क, शहरातील दोन उड्डाणपूल, रस्ते, उद्यानांचे सुशोभिकरण, प्राणीसंग्रहालय सुरु करणे, अतिक्रमण काढणे आणि अनधिकृत बांधकाम ांवर कारवाई करणे ही कामे भाजपाचे नूतन महापौर आणि पदाधिकारी नक्की करतील, ही माफक अपेक्षा सोलापूरकरांनी बाळगायला तूर्तास तरी काही हरकत नाही. कारण आता घोडामैदान जवळ आहे.

### नूतन नगरसेवकांना प्रशिक्षणाची तीव्र गरज...

यंदा महापालिकेत विजयी झालेल्या १०२ नगरसेवकांपैकी जवळपास पन्नासच्यावर नवीन चेहरे नगरसेवकपदी निवडून आलेले आहेत. आजपर्यंतचा अनुभव पाहता महापालिकेच्या सभागृहात बहुतांश नगरसेवक तोंडही उघडत नाहीत. नगरसेवकांना बीपीएमसी ॲक्टचीदेखील माहिती नसते. सभागृहाचे सभाशास्त्र माहिती नसते. पाईंट ऑफ ऑर्डर, पाईंट ऑफ इनफॉर्मेशन आदीबाबत नवीन नगरसेवकांना माहिती होण्यासाठी सर्वच नगरसेवकांसाठी राजकीय पक्ष अथवा प्रशासनाने तरी किमान आठवड्याचे प्रशिक्षण शिबीर घेणे गरजेचे आहे. महापौर आणि पदाधिकारी निवडी होण्यापूर्वीच अशा प्रकारच्या प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होणे गरजेचे आहे. राजकीय पक्ष अथवा प्रशासन असे प्रशिक्षण शिबीर घेणार नसेल तर सोलापुरातील सामाजिक संस्था, संघटनांनी तरी यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. अन्यथा लोकांना मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेले नगरसेवक जनतेच्या अपेक्षा पूर्ण करतील की नाही? याबाबत साशंकताच आहे.

## अक्कलकोट जि.प. गटातील तीन, पंचायत समिती गणातील चार अर्ज अवैध

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि २२ जानेवारी**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीत गुरुवारी अर्ज छाननीच्या दिवशी जिल्हा परिषद गटातील तीन तसेच पंचायत समिती गणातील चार अर्ज अवैध झाले आहेत.जिल्हा परिषद गटातून ७० तर पंचायत समिती गणातून १०६ उमेदवारानी अर्ज दाखल केला होता.

अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव गणातील लक्ष्मी किशोर काळे यांचा उमेदवारी अर्ज हा चपळगाव गणातील सूचक नसल्याने अवैध ठरविण्यात आला. शिवसेना ठाकरे गटातर्फे मनोजकुमार पवार यांनी तोळणूर गणातून उमेदवार उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तोळणूर हा गण नागरिकांचा मागास वर्ग महिला यासाठी राखीव असल्याने म नोजकुमार पवार यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरला. सुलेरजवळगे गणातील चंद्रकांत वाघमारे यांचा अर्ज जात वैधता प्रमाणपत्र अर्ज सादर केल्याची पोहोच सादर न केल्याने अवैध ठरला आहे. सलगर गणातील शंवाबाई गवळी यांचा उमेदवारी अर्ज जात वैधता प्रमाणपत्र अर्ज केल्याची पोहोच पावती सादर न केले नसल्याने अवैध ठरविण्यात आला. जेऊर गटातील लालचंद नडगम यांनी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी करिता अर्ज सादर केल्याची पोहोच सादर न केल्याने उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आला. मंगरूळ गटातील भिमाबाई गायकवाड यांचा सुचक दोन ठिकाणी एकच असल्याने उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आला.



सलगर गटातील संजनाबाई बिराजदार यांचा उम ेदवारी अर्ज नमुना दोन ब कोरा असून उमेदवारी सदर पक्षाकडून ग्राह्य धरता येणार नाही यामुळे अर्ज अवैध ठरविण्यात आला.

## सांगोला तालुक्यात जि.प गटाचे १२ तर पं.स गणाचे १९ अर्ज अवैध

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ जानेवारी -**

गुरुवार दि.२२ जानेवारी रोजी सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीतील ३३८ उम ेदवाराची उमेदवारी अर्जाची छाननी प्रक्रिया जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे निवडणूक निरीक्षक आनंद करम ाने, निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांचे उपस्थितीमध्ये पार पडली. दि.१६ ते २१ जानेवारी अखेर एकूण ३३८ उमेदवारांचे अर्ज भरले होते. त्यापैकी छाननी मध्ये सर्व अर्जाची कागदपत्रे, जात प्रमाणपत्र, शपथपत्र, तसेच इतर आवश्यक बाबी तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ३१ अवैध अर्ज व ३०७ वैध अर्ज करण्यात आले. जिल्हा परिषद गटातून १४१ अर्जापैकी १२ अर्ज अवैध ठरले असून १२९ अर्ज वैध ठरले आहेत. पंचायत समिती गणातून १९७ अर्जापैकी १९ अर्ज अवैध ठरले असून १७८ अर्ज वैध ठरले आहेत, अशी माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली. छाननी प्रक्रिया शांततेत पार पडली असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

> उमेदवारांनी अर्ज मागे घेण्याची मुदत दि.२३, २४ व २७ जानेवारी रोजी सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत आहे. तसेच रविवार दि.२५ व सोमवार दि.२६ जानेवारी रोजी शासकीय सुट्टी असल्याने अर्ज मागे घेण्याची नोटीस स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
> **- बी.आर.माळी, निवडणूक निर्णय अधिकारी, जि.प व पं.स**

### हरिभाई महाविद्यालयाचा समर्थ हिरकुर कन्नड अभिवाचन स्पर्धेत प्रथम

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

संगमेश्वर महाविद्यालयाच्या भाषा संकुलाच्या वतीने आयोजित जिल्हा स्पर्धांमध्ये हरिभाई देवकरण महाविद्यालयाच्या समर्थ सिद्धाराम हिरकुर याने कन्नड अभिवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

इंग्रजी अभिवाचन स्पर्धेत सोनाली सोनटक्के हिने तृतीय क्रमांक मिळवला. तसेच संस्कृत अभिवाचन स्पर्धेत समर्थ सिद्धाराम हिरकुर, हिंदी अभिवाचन स्पर्धेत रिहाना राजअहमद शेख आणि हिंदी सुलेखन स्पर्धेत रेणुका परशुराम बनसोडे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक संपादिला. प्रसिद्ध नाट्यकलावंत अनिरुद्ध जोशी यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना प्रा. धन्यकुम ार बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, प्राचार्या दीपा फाटक, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे व पर्यवेक्षक ए. सी. राऊत यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शुभेच्छा दिल्या.

## भारतातील महनीयांचे जगात अनुकरण : भागवत

**भार नागौर, २२ जानेवारी**

भारतातील महनीय लोक ज्ञानाविषयी फक्त बोलत नाहीत तर ते त्याचा जीवनात अंगीकार करतात. भारतातील महनीयांचे नेहमीच जगाने अनुकरण केले आहे. आजही, समाजातील आध्यात्मिक गुरू याची साक्ष आहेत, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

१६२ व्या मर्यादा महोत्सवानिमित्त नागौर जिल्ह्यातील छोटी खातू शहरात एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आचार्य म हाश्रमणजींच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रम ाला सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी संबोधित केले. सरसंघचालक म्हणाले की, पैशाच्या मागे लागणे ही आपली परंपरा नाही. जे पैसे कमवतात ते दान करतात. दान हा भारतीय जीवनाचा एक भाग आहे आणि असे लोक देखील आहेत जे आपले संपूर्ण जीवन दान करतात. आपण जे कमवतो ते कसे सामायिक करावे हे जाणून घेणे आवश्यक आहे. सध्याच्या जागतिक परिदृश्याबद्दल ते म्हणाले की, सध्या अनेक देश असे मानतात की त्यांचे स्वार्थ काहीही असले तरी पूर्ण केले पाहिजेत. तथापि, भारताने हा मार्ग अवलंबला नाही आणि करणारही नाही. भारत जगातील प्रत्येकाची काळजी घेतो.

भारत हा एकमेव देश आहे ज्याने आपत्ती आणि संकटाच्या काळात सेवा केली आहे. भारताने स्वतःच्या गरजा पूर्ण करून इतर देशांनाही मदत केली आहे. हा धर्म आहे. धर्म आपल्याला काय बरोबर आहे आणि काय चूक आहे हे शिकवतो. सरसंघचालक म्हणाले की, सध्या पाश्चात्त्य रसायनांचा वापर करून शेतीम ध्ये कीटक पूर्णपणे नष्ट केले जात आहेत, तर निसर्गाच्या संतुलनाबद्दल भारतीय दृष्टिकोन वेगळा आहे. भारतात कीटक नियंत्रण साध्य केले जाते. शेतीमध्ये हा एक प्रकारचा समतोल आहे. आपल्या स्वतःच्या वर्तनात संतुलन कसे राखायचे हे देखील धर्माच्या संदर्भातून लक्षात येते. सेवा, शिस्त आणि प्रतिष्ठा हे भारताचे कर्म आहे, जे भारताला देवाने किंवा नियतीने प्राप्त करून दिले आहे. भारताने कधीही धोरणात्मक, आर्थिक किंवा बळजबरीने कोणालाही दडपले नाही आणि आपल्या उदाहरणाद्वारे हे दाखवून दिले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजन समितीचे अध्यक्ष मनसुख भाई सेठिया यांनी केले.

## बोलीभाषांमुळेच मराठी अधिक समृद्ध : प्राचार्य डॉ. महेंद्र कदम

### सोलापूर विद्यापीठात भाषा संचालनालयातर्फे ‘बोलींचा जागर’ कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ -**

मराठी भाषेची खरी ताकद तिच्या विविध बोलीभाषांमध्ये दडलेली असून, अनेक परकीय भाषांच्या प्रभावानंतरही मराठी भाषा टिकून राहून अधिक समृद्ध झाली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ भाषा अभ्यासक, प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग व भाषा संचालनालय आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत ‘बोलींचा जागर’ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ. महेंद्र कदम हे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, राज्य शासनाचे भाषा अधिकारी डॉ. संजय पवार, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, भाषा व वाङ्मय विभागाच्या संचालिका डॉ. अंजना लावंड यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रातील ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनाने झाली. त्यानंतर विद्यापीठ परिसरातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. या ग्रंथदिंडीत विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह वारकरी संप्रदायातील भाविकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

प्राचार्य डॉ. महेंद्र कदम आपल्या भाषणात म्हणाले की, मायबोली मराठी ही प्रत्येक प्रदेशातील बोलींमुळे समृद्ध होत गेली आहे. आज मराठी ही जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी बाराव्यातेराव्या क्रमांकावर आहे. एआयच्या युगातही मराठी भाषा स्वतः ला सक्षमपणे जुळवून घेत आहे, ही अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य शासनाचे भाषा अधिकारी डॉ. संजय पवार म्हणाले की, महाराष्ट्रातील विविध प्रांतांम ध्ये मराठी वेगवेगळ्या बोलींमध्ये बोलली जाते. या बोलीभाषांचे जतन होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यातूनच आपली सांस्कृतिक परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते. याच उद्देशाने शासनातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत ‘बोलींचा जागर’ हा उपक्रम राबविला जात आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले की, मराठी भाषेचा इतिहास अत्यंत समृद्ध असून, तिच्या विविध बोलीभाषांम ुळे आपली सांस्कृतिक ओळख ठरते. मराठीतील साहित्य व ग्रंथसंपदा इतर भाषांमध्ये अनुवादित व्हावी, यासाठी विद्यापीठात स्वतंत्र भाषांतर विभाग सुरू करण्याचा मानस आहे. तसेच हे ज्ञान डिजिटल माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या कार्यक्रमात डॉ. अभिमन्यू माने व डॉ. हेमंत गव्हाणे यांनी मराठीतील विविध बोलीभाषांवर सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्रा. नानासाहेब गव्हाणे यांनी संपादित केलेल्या ‘मायबोली मराठी दिनदर्शिका’ या प्रकाशनाचे अनावरण करण्यात आले.

## कंदलगाव झेडपी शाळा केंद्रप्रमुखाच्या चौकशीचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना शिक्षण विभागाच्या केंद्र परिषदेला राजकीय लोकांना निमंत्रण देऊन व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल कंदलगाव बीटचे केंद्रप्रमुख आमसिद्ध म्हेत्रे यांची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिले आहेत.

याबाबत कास्ट्राईब शिक्षण संघटनेच्या दक्षिण सोलापूर शाखेने तक्रार केली होती. ३० डिसेंबर रोजी मनगुळी येथे कंदलगाव केंद्र शिक्षण परिषद झाली. यावेळी महापालिकेची निवडणूक आचारसंहिता लागू होती. असे असताना या परिषदेला राजकीय लोकांना कार्यक्रमाचे निमंत्रण देऊन पक्षाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. तसेच अंत्रोळी शाळेतील सातवीतील विद्यार्थिनी गौरी शिंगण हिची राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली व मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेतल्याचे तिला प्रमाणपत्र मिळाले. असे असताना तिचे अभिनंदन व कौतुक करण्याचे जाणीवपूर्वक टाळले. या दोन्ही कारणामुळे प्रभारी गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार व केंद्रप्रमुख अमसिद्ध म्हेत्रे यांची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी कास्टाईब शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल कोरे व सचिव सोमनिंग कोळी यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी शेख यांच्याकडे केली. त्यावर प्राथमिक शिक्षणाधिकारी शेख यांनी प्रभारी गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार यांना केंद्रप्रमख म्हेत्रे यांची चौकशी करून अहवाल सादर करावा, असे आदेश दिले आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# बालेकिल्ले, बुरूज आणि बुलडोझर!

महाराष्ट्राच्या राजकारणात इतिहासातील आदर्शांचे अनुकरण किती होते, या मुद्यावर मतभेद असू शकतात. वादविवादही होऊ शकतात. पण, इतिहासातील वानग्यांचा महाराष्ट्राच्या राजकारणावरील प्रभाव अभेद्य आहे याबाबत मात्र कोणाचेच दुमत असू शकत नाही. वानगीदाखल बोलायचे झाले, तर महाराष्ट्राच्या सत्ताकारणाला इतिहासाच्या आदर्श राज्यपद्धतीचा मुलामा देणारे 'शिवशाही'सारखे गोंडस शब्द अनेक वर्षांपासून निवडणुकीच्या राजकारणात घुमत राहिले आहेत. शिवशाहीच्या आणि स्वराज्य स्थापनेच्या आणाभाका घेतच एकत्र येणाऱ्या राजकीय पक्षांनी स्वत:च्याच ताकदीला 'शिवशक्ती'सारखी नावेदेखील बहाल केलेली आहेत आणि राजकारणाच्या प्रचारयुद्धाची वर्णनेदेखील 'रणधुमाळी' वगैरे शब्दांतच होऊ लागली आहेत. या राज्यातील काही राजकीय पक्षांचा कार्यकर्ता हा 'मावळा' असतो, निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली की तो युद्धास सज्ज झालेल्या मावळ्याच्या आवेशातच 'रणांगणा'त उतरतो आणि प्रतिस्पर्धी राजकीय पक्ष म्हणजे मुघलांची फौज वगैरे असल्याच्या आवेशांत आपल्या प्रचाराच्या तलवारीपर्यंत, शत्रूचा कोथळा काढण्याची भाषा करतो. महाराष्ट्र हा इतिहासकाळातील लढवय्यांचा देश म्हणून ओळखला जातो. इतिहासकाळातील त्या लढाया आता रणांगणावर होत नसल्या, तरी प्रत्येक मराठी माणसाच्या मनातला मावळा जिवंत ठेवण्यासाठी राजकीय रणांगणावर होणाऱ्या निवडणुकांनाच युद्धभूमी मानून तेथे तलवारी परजण्याची आणि आव्हाने देत शत्रुपक्षास रणांगणावर पराजित करण्याची जबर ऊर्मी मात्र या मातीत अजूनही रुजून राहिली आहे. याचे सारे श्रेय अर्थातच, नि:संशयपणे सध्याच्या राजकारणालाच द्यावे लागेल. 'दगडांचा देश' असलेल्या हा कणखर सह्याद्री देशाच्या संकटकाळात हिमालयाच्या मदतीला धावून गेल्याच्या इतिहासाचा अभिमानही याच भावनेतून अजूनही मनामनांना सुखावत असतो. त्यामुळे राजकारणाने इतिहासाचे अनुकरण केले अथवा न केले असेल, तरी इतिहास जागविण्यात मात्र महाराष्ट्र सर्वांत पुढे आहे, असेच म्हणावे लागेल. त्यामुळेच, महाराष्ट्राच्या राजकारणात प्रस्थापित झालेल्या नेत्यांच्या शिरावर नेहमी संस्थानिक, साखरसम्राट, शिक्षणसम्राट, सहकारसम्राट अशा पदव्यांचे मुकुट चढविले गेले असून त्यांनी राजकीयदृष्ट्या बांधलेल्या मतदारसंघानाही बालेकिल्ले, गड, बुरूज अशीच ओळखही दिली गेली आहे.

निवडणुकांच्या रणभूमीवरील तोफा थंडावल्यानंतर युद्धस्थितीची वर्णने रंगविणाऱ्या माध्यमांच्या मुखातही आजकाल हेच ऐतिहासिक शब्द रूढ झाले असल्याने, महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळीच रंगत आली आहे, हे नाकारता येतच नाही. म्हणूनच, निवडणुकांच्या निकालानंतर चर्चेच्या दिशा बदलतात आणि कोणाचा 'बालेकिल्ला' गमावला, कोणता 'गड' कोणत्या पक्षाने सर केला, कोणते 'बुरूज' ढासळले अशा चर्चा सुरू होतात. कारण, महाराष्ट्राच्या राजकारणात बालेकिल्ला ही संज्ञा केवळ तात्कालिक विजयाची नव्हती, तर एखाद्या राजकीय पक्षाने बांधलेल्या आणि अभेद्य ठरलेल्या मतदारसंघाची होती. अशा प्रकारे भक्कम बांधलेला बालेकिल्ला म्हणजे त्या नेत्याच्या किंवा कोणत्याही राजकीय पक्षाच्या मक्तेदारीचा किंवा राजकीय मालकीचा म्हणूनच ओळखला जायचा. कोणत्याही निवडणुकीत सातत्याने त्याच नेत्याचे किंवा राजकीय पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित झाले, म्हणजे बालेकिल्ला अभेद्य झाला असे मानले जायचे आणि मतदारसंघाच्या एखाद्या कोपऱ्यात धक्का लागला, तरी 'बुरूज' ढासळू लागल्याच्या चर्चेने वर्तमानकाळातील इतिहासाच्या वानग्यांना धडकी भरायची. गेल्या काही दशकांत अनेक नेत्यांनी आपापले बालेकिल्ले आपल्या राजकीय कौशल्याने, सत्तेला सोबत घेऊन भक्कम केले, तर काही पक्षांनी जनमानसावर पकड प्राप्त करून नवे बालेकिल्ले बांधले. काही पक्षांचे गड निर्माण झाले आणि शत्रूंनी, म्हणजे प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांनी गडाच्या बुरुजांवर कितीही धडका दिल्या, तरी भक्कम तटबंदीमुळे गडाचे बुरूज ढासळले नाहीत, एवढेच नव्हे, तर बुरुजांच्या तटबंदीला साध्या भेगादेखील पाडणे शत्रूस साध्य झाले नाही.

गेल्या दीड-दोन दशकांत मात्र राजकारणातील या इतिहासातील वानग्यांचे भविष्य उलटेसुलटे होत गेले आहे. वर्षानुवर्षांच्या मेहनतीने बांधलेले अनेक बालेकिल्ले खिळखिळे झाले आहेत, काही बालेकिल्ल्यांची तटबंदी ढासळत चालली आहे, तर काही बुरुजांना भगदाडेही पडू लागली आहेत. काही गड आणि किल्ल्यांचे अवशेषदेखील नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने या इतिहासप्रिय राजकारणातून या शब्दांचादेखील 'कडेलोट' वगैरे होणार की काय अशी भीती या राकट अशा दगडांच्या देशात व्यक्त होऊ लागली आहे. तसे झाले, तर राजकारणाची गाडी वर्तमानाच्या रुळावरून धावू लागेल आणि वर्षानुवर्षांची सवय संपुष्टात येऊन सपक राजकारणाचे दिवस सुरू होतील अशीही शंका व्यक्त होऊ लागली आहे. सध्याच्या राजकारणास इतिहासाचा मुलामा देण्यात आघाडीवर असणाऱ्या मावळ्यांच्या फौजेवर आपल्या भाले-तलवारी म्यान करण्याची वेळ येणार असेल, रणभूमीवर शत्रुपक्षाचा कोथळा काढण्यासाठी आणि छाताडावर पाय देऊन उभे राहण्यासाठी सेनापतीकडे फौजा शिल्लक राहणार नसतील तर दोन हात करण्याकरिता पुढे कोणास करावयाचे असा प्रश्न सेनापतींना पडणार आहे. दहा वर्षांपूर्वीच्या दशकात, म्हणजे ढोबळमानाने २००४ ते २०१४ या काळात पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादी काँग्रेसचा अभेद्य बालेकिल्ला ठरला होता. मराठवाडा-विदर्भात काँग्रेसने भक्कम तटबंदी उभारली होती, तर सहकाराची ढाल घेऊन काही भागांत राष्ट्रवादी काँग्रेसचे सैनिक जागता पहारा देत होते. २०१४ नंतर राजकारणाची व्याख्याच बदलून गेली आणि नेतृत्वाच्या आधारावर उभे राहिलेले हे गडकिल्ले ढासळू लागले. सेनापतींनीच तहाची निशाणे उंचावून आक्रमकांच्या तंबूत शरणागती पत्करल्यावर किल्ले काबीज करण्यात फारसे कष्ट पडत नाहीत. भाजपने नेतृत्वापेक्षा, निष्ठेस महत्त्व देणाऱ्या कार्यकर्त्यांच्या रूपाने उभी केलेली फौज असे गडकिल्ले काबीज करत सुटली आणि विकासाचे हत्यार परजत प्रस्थापितांची पारंपरिक तटबंदी खिळखिळी केली. राष्ट्रवादी काँग्रेसने सहकार, संस्था आणि स्थानिक सत्ता यांचा वापर करून मजबूत केलेले बालेकिल्ले सर करण्यासाठी सहकार आणि संस्थांना लक्ष्य केले आणि स्थानिक सत्ता काबीज करून राष्ट्रवादीचे बुरूज भेदले. पक्षफुटीच्या तोफा डागल्या गेल्या आणि रणांगणावर न लढता गनिमी काव्याने बालेकिल्ले सर करून टाकले. तरीही, अजूनही महाराष्ट्रात या पक्षाचा झेंडा एखाद्या किल्ल्यावर फडकलेला दिसतो. तो काबीज करणे सोपे नाही, हे लक्षात आल्यावर येथे अधनूमधून तहाची बोलणी होते, वाटाघाटी केल्या जातात, आणि खलबते शिजली की हा किल्लादेखील मांडलिकत्वाची भूमिका मान्य करतो. श्रद्धेचा मुद्दा समोर आला की बाळासाहेब ठाकरे यांनी बांधलेल्या बालेकिल्ल्यांचा इतिहास टाळता येत नाही. मुंबईशी रोजीरोटीचे नाते असलेल्या कोकण प्रांतास आपलेसे करण्याचे ठरवून बाळासाहेबांनी आपल्या फौजेत कोकणातील मावळ्यांना सामावून घेतले आणि मुंबई-ठाण्याचा गड काबीज केल्यानंतर कोकणाचा बालेकिल्ला बांधणे सोपे झाले. अनेक दशके या बालेकिल्ल्याची तटबंदी अभेद्य होती. तिच्या बुरुजाला धक्का लावणेदेखील कोणास शक्य होणार नाही, अशा हिमतीने कोकणातील शिवसैनिक छातीचा कोट करून संरक्षणासाठी सज्ज होता. पुढे काही मावळ्यांनीच बंड केले आणि या बुरुजाची तटबंदी ढासळत गेली. असे झाले की तटबंदीमुळे अभेद्य राहिलेले गडदेखील गुडघे टेकतात. मुंबईचा अभेद्य गड यामुळेच खिळखिळा झाला, बुरुजांवर भगदाडे पडली, तटबंदी ढासळत गेली आणि मावळ्यांच्या फौजादेखील गडावरच चाल करू लागल्या. आता हा गड हातातून गेल्यातच जमा आहे, याची जाणीव सध्याच्या सेनापतीस झाल्याने तहाचे निशाण हाती घेऊन कोणासोबत जाता येईल याची चाचपणी सुरू झाली आहे. मुंबईचा किल्ला मजबूत होता. हातोडा मारून त्याचे दगडदेखील हलणार नाहीत, हे लक्षात आलेल्या आक्रमकांनी या बालेकिल्ल्यावर थेट बुलडोझरच चढविल्याने, आता त्यावरचा झेंडा उतरवावा लागला आहे. उद्या या गडावर फडकणाऱ्या झेंड्याचा रंग मात्र, इतिहासाच्या आठवणी जिवंत ठेवणाराच असेल.

## प्रासंगिक

# नवीन वर्ष, नवीन गती

**पीयूष गोयल**

नवीन वर्ष भारताच्या वाणिज्य आणि उद्योग क्षेत्रासाठी नवीन आत्मविश्वास आणि आशावाद घेऊन आले आहे. २०२५ मध्ये उचललेली निर्णायक पावले व्यापार आणि गुंतवणुकीला गती देण्यास, लहान व्यवसाय आणि स्टार्टअप्ससाठी जागतिक बाजारपेठेतील प्रवेश विस्तारण्यास, रोजगार निर्माण करण्यास आणि प्रत्येक नागरिकासाठी जीवन सुलभ करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ध्येयाला पुढे नेण्यास सज्ज आहेत. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणे हा मोदी सरकारचा एक प्रमुख उपक्रम राहिला आहे. आज भारतात २ लाखांहून अधिक सरकारमान्य स्टार्टअप्स आहेत. स्टार्टअप इंडियाच्या १० व्या वर्धापनदिनानिमित्त पंतप्रधानांनी म्हटल्याप्रमाणे, आपले स्टार्टअप्स विविध समस्यांवर उपाय देत आहेत आणि भारतीय अर्थव्यवस्थेला लवचीक व आत्मनिर्भर बनण्यास मदत करत आहेत. स्टार्टअप्सना पाठिंबा देणे हा मोदी सरकारच्या आर्थिक वाढीला गती देऊन रोजगार निर्माण करण्याच्या तसेच प्रत्येक नागरिकाचे, विशेषतः गरिबांचे जीवनमान सुधारण्याच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली २०१४ पासून भारताने केलेल्या परिवर्तनशील प्रवासात २०२५ हे एक महत्त्वाचे वर्ष ठरले. धाडसी निर्णय आणि दूरगामी सुधारणांद्वारे, आमच्या सरकारने व्यावसायिक वातावरणाला नव्याने आकार दिला आहे, त्याचबरोबर प्रत्येक धोरण हे नागरिकांचे, विशेषतः अतिशय गरीब लोकांचे जीवनमान सुधारण्यास हातभार लावेल याची खात्री करण्यात आली आहे. भारत हा आता जागतिक आकर्षणाचे केंद्र बनला आहे आणि एक विश्वासार्ह भागीदार म्हणून ओळखला जात आहे. भारताची एकूण निर्यात २०२४-२५ मध्ये ६ टक्क्यांनी वाढून विक्रमी ८२५.२५ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. जागतिक अनिश्चितता असूनही विकासाची गती कायम राहिली आहे. निर्यातदारांना आणखी पाठिंबा देण्यासाठी सरकारने २५,०६० कोटी रुपयांच्या निर्यात प्रोत्साहन अभियानाची घोषणा केली आहे.

**जन विश्वास आणि व्यवसाय सुलभता** : २०२५ च्या निरसन आणि सुधारणा कायद्याने ७१ कालबाह्य कायदे रद्द केले, त्यापैकी काही १८८६ सालापासूनचे होते. जन विश्वास उपक्रमांतर्गत मोदी सरकारने अनेक किरकोळ गुन्ह्यांमधील फौजदारी तरतुदी काढून टाकल्या आहेत. या सुधारणांमुळे सुशासनाला चालना मिळते, व्यवसाय सुलभता वाढते आणि भारताची कायदेशीर चौकट आधुनिक अर्थव्यवस्थेशी सुसंगत राहते याची खात्री होते.

संसदेच्या गेल्या वर्षीच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान, जहाज वाहतूक आणि बंदरांशी संबंधित पाच महत्त्वपूर्ण विधेयके मंजूर करण्यात आली. हे कायदे दस्तऐवजीकरण सुलभ करतात, विवाद निराकरण सोपे करतात आणि लॉजिस्टिक्सचा खर्च लक्षणीयरीत्या कमी करतात. वाणिज्य क्षेत्रात परकीय व्यापार महासंचालनालयाने पारदर्शक आणि सुलभ धोरणांद्वारे निर्यातदारांना सक्रियपणे पाठिंबा दिला आहे, ज्यामुळे व्यवसाय करण्याची सुलभता वाढली आहे.

**मुक्त व्यापार करार आणि 'लोकल फॉर ग्लोबल'** : स्थानिक उद्योजक विशेषतः लहान व्यवसाय, स्टार्टअप्स, शेतकरी आणि कारागीर यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना जागतिक स्तरावर यशस्वी होण्यासाठी सक्षम करणे हे भारताच्या व्यापार आणि गुंतवणूक धोरणाचे एक मार्गदर्शक तत्त्व राहिले आहे. या दृष्टिकोनाचा पाठपुरावा करत, भारताने गेल्या वर्षी तीन मुक्त व्यापार करार (एफटीए) केले, ज्यामुळे भारतीय वस्तूंना यूके, न्यूझीलंड आणि ओमानच्या विकसित बाजारपेठांमध्ये शुल्कमुक्त प्रवेश मिळाला. मुक्त व्यापार करार हे देखील सुधारणा प्रक्रियेचा एक भाग आहेत. पूर्वी यूपीए सरकारने राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करून जागतिक स्तरावर भारताशी स्पर्धा करणाऱ्या देशांसोबत निष्काळजीपणे करार केले होते. मोदी सरकारने विकसित देशांसोबतच्या मुक्त व्यापार करारांना योग्यरीत्या प्राधान्य दिले आहे आणि दोन्ही पक्षांसाठी फायदेशीर ठरतील असे करार केले आहेत. हे मुक्त व्यापार करार रोजगार निर्मितीला गती देतील, गुंतवणुकीला चालना देतील आणि संपूर्ण भारतातील लहान व्यवसाय, विद्यार्थी, महिला, शेतकरी आणि तरुणांसाठी परिवर्तनकारी संधी उपलब्ध करून देतील.

**भारताच्या हितांचे संरक्षण** : या करारांव्यतिरिक्त स्वित्झर्लंड, नॉर्वे, आईसलँड आणि लिक्टेनस्टाईन यांचा समावेश असलेल्या युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशनसोबतचा मुक्त व्यापार करार, ज्यावर २०२४ मध्ये स्वाक्षरी झाली होती, तोही कार्यान्वित करण्यात आला आहे. सर्व मुक्त व्यापार करारांमधील एक समान सूत्र म्हणजे भारताच्या कृषी आणि दुग्ध क्षेत्रांचे संरक्षण, ज्यात न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियासारख्या प्रमुख जागतिक दुग्ध उत्पादक देशांसोबतच्या करारांचाही समावेश आहे. न्यूझीलंडने पुढील १५ वर्षांत २० अब्ज डॉलर्सच्या थेट परकीय गुंतवणुकीची वचनबद्धता दर्शवली आहे.

**भारत : एक जागतिक गुंतवणुकीचे केंद्र** : २०२४-२५ पर्यंतच्या गेल्या ११ आर्थिक वर्षांमध्ये भारताने ७४८ अब्ज डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली जी मागील ११ वर्षांत मिळालेल्या ३०८ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीच्या सुमारे अडीच पट आहे. हे फार महत्त्वाचे आहे कारण मोदी सरकारने एक गैरव्यवस्थापित अर्थव्यवस्था वारशाने स्वीकारली होती, जिला एकेकाळी जगातील सर्वांत नाजूक पाच अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून ओळखले जात होते. यूपीए सरकारच्या काळात वारंवारच्या आर्थिक धक्क्यांमुळे विकसित देशांनी भारतासोबतच्या व्यापार चर्चांमधून माघार घेतली होती.

**गरिबांना मदत करण्यासाठी सुधारणा** : भारताने २०२५ या वर्षाचा शेवट मोठ्या यशाने केला, जपानला मागे टाकून भारत जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनला आणि आता जर्मनीला मागे टाकण्याच्या मार्गावर तो ठामपणे वाटचाल करत आहे. महत्त्वाचे म्हणजे, यूपीए सरकारच्या काळाच्या विपरीत, आर्थिक लाभांचा फायदा सर्वांत गरीब लोकांपर्यंत, विशेषतः ग्रामीण भारतातील लोकांपर्यंत पोहोचला आहे. कामगारांसाठी फायदे वाढवण्यासाठी मोदी सरकारने ऐतिहासिक कामगार सुधारणा केल्या आहेत, ज्यामध्ये २९ विखुरलेले कायदे चार आधुनिक संहितांमध्ये विलीन केले आहेत. योग्य वेतन, वेळेवर पगार, सामाजिक सुरक्षा आणि सुरक्षितता यावर लक्ष केंद्रित केले आहे.

**पुढील वाटचाल** : २०२५ हे सेतू बांधण्याचे वर्ष होते: देशांतर्गत उद्योग आणि जागतिक मागणी यांच्यात; धोरणात्मक सुधारणा आणि डिजिटल सक्षमीकरण यांच्यात; तसेच उदयोन्मुख लहान व्यवसाय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठा यांच्यात.

पुढे आणखी खूप उत्साहवर्धक गोष्टी घडणार आहेत. नीती आयोगाचे सदस्य राजीव गौबा यांच्या नेतृत्वाखालील एक समिती व्यापक सुधारणांचा अभ्यास करत आहे. यामुळे पंतप्रधान मोदींच्या रिफॉर्म एक्स्प्रेसला आणखी गती मिळेल. भारत जसजसा पुढे जात आहे, तसतसा स्पर्धात्मक व्यापार, नावीन्यपूर्ण उद्योग आणि आत्मविश्वासपूर्ण व आत्मनिर्भर असलेल्या लवचीक अर्थव्यवस्थेद्वारे विकसित भारताची उभारणी करण्याची दृष्टी भारतासमोर स्पष्ट होत आहे. भारताचे निर्यातदार, उत्पादक, शेतकरी आणि सेवा पुरवठादारांचे यश हेच राष्ट्राचे यश आहे.

भारत केवळ भविष्याची तयारी करत नाही, तर तो भविष्य घडवत आहे. निर्णायक नेतृत्व, धाडसी सुधारणा आणि स्पष्ट जागतिक धोरणामुळे देशाच्या महत्त्वाकांक्षेला कृतीची जोड मिळाली आहे. भारत जगासोबत व्यापार करतो, विकास करतो, नवनवीन शोध लावतो आणि संबंध प्रस्थापित करतो, तेव्हा तो एक सामर्थ्यवान, आत्मनिर्भर आणि विश्वासार्ह देश म्हणून आपल्या स्वतःच्या अटींवर हे सर्व करतो.

(लेखक केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री आहेत)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# क्रिकेटमध्येही 'खेला होबे'!

क्रिकेटप्रेम हा नवा धर्म आहे, हे विधान धाडसाचे ठरणार नाही. धर्मांध सूडाग्नीने पेटलेल्या बांगलादेशने मात्र या धर्माशी प्रतारणा केली आहे. भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशात होऊ घातलेल्या झटपट क्रिकेटच्या विश्वचषक स्पर्धेसाठी जगभरातील क्रिकेट चाहते उत्सुक आहेत. पण, बांगलादेशने या आयोजनात मिठाचा खडा घातला आहे. भारताविषयी विनाकारण आकस ठेवून विश्वचषक स्पर्धेत खेळण्यास नकार देणाऱ्या दिवाळखोर बांगलादेशचा सर्वार्थाने 'खेला' होणार आहे.

क्रीडा, फॅशन, फिल्म आणि संगीत या क्षेत्रांना सीमांचे बंधन नाही, हे तर आम्ही बरीच वर्षे ऐकलेले सुविचार आहेत पण, कदाचित बांगलादेशींना अशी शिकवण कोणी दिली नाही. म्हणूनच, बिघडलेल्या राजकीय संबंधांचे प्रतिबिंब क्रिकेटच्या मैदानावर पाडण्याची 'नादानी' त्यांना सुचली आहे. पण, हे करताना 'बाप तो हमेशा बाप ही रहेगा' या पाकिस्तानला माहिती असलेल्या सत्याचा, बांगलादेशला मात्र विसर पडला आहे. आमची टीम भारतीय मैदानांवर खेळणार नाही, आमची व्यवस्था सहआयोजक श्रीलंकेच्या मैदानावर करून द्या, अशी मागणी बांगलादेश क्रिकेट मंडळाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट नियामक मंडळाकडे केली. पण, आयसीसीने त्यांच्या या मागणीला अजिबात भीक न घालता, खेळायचे असेल तर भारतातच खेळावे लागेल, असा सज्जड दम भरला. भारताचे उपकार विसरलेल्या बांगलादेशने स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला आणि स्कॉटलॅण्डचा स्पर्धेत प्रवेश झाला.

बांगलादेश क्रिकेटचा इतिहासच मुळात भारताने लिहिला आणि दुर्दैवाने त्याच जोरावर आज ही मुजोरी सुरू आहे. वर्ष १९९८ पर्यंत बांगलादेश आयसीसीचा पूर्णकालीन सदस्य नसतानाही, मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष जगमोहन डालमिया यांनी ढाक्यातील वंगबंधू नॅशनल स्टेडियममध्ये आयसीसीची नॉकआऊट टूर्नामेंट आयोजित केली. या आयोजनामुळे बांगलादेश क्रिकेटला जगभरात ओळख मिळाली. भारत, पाकिस्तान आणि श्रीलंकेच्या पाठिंब्यामुळेच जून २००० मध्ये आयसीसीने बांगलादेशला टेस्ट क्रिकेट स्टेटस दिला. त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात बांगलादेश डेब्यू कसोटी सामना भारताच्याच विरोधात ढाक्यात खेळला. विशेष म्हणजे कर्णधार म्हणून सौरव गांगुलीचाही हा पहिलाच कसोटी सामना होता. यानंतरही दोन्ही देशांमध्ये नियमितपणे क्रिकेट सामन्यांच्या मालिका खेळल्या गेल्या. भारतीय क्रिकेट संघ, भारतीय खेळाडू यांच्याभोवतीचे वलय बघता, या मालिकांचा अप्रत्यक्षरीत्या फायदा बांगलादेश क्रिकेटलाच मिळाला. पण, गेल्या दोन वर्षांत बांगलादेश बदलत्या राजकारणामुळे भारताला सोडून, नवे मित्र जोडण्यास उत्सुक झाला आहे. बीसीबीच्या निर्णयामागे दोन कारणे दिसतात. पहिले म्हणजे आयपीएलमधून मुस्तफिजुर रहमानची हकालपट्टी! अभिनेता शाहरुख खानच्या मालकीच्या कोलकाता नाईट रायडर्सने रहमानला साभार परत केल्यानंतर, अकडूपणा दाखवत बांगलादेशने आयपीएल प्रसारणावर बंदी घालण्याचा निर्णय घेऊन आर्थिक दिवाळखोरीची पायाभरणी केली. तर, दुसरे कारण म्हणजे बांगलादेशातील सत्तापालटानंतर भारताच्या आश्रयाला आलेल्या शेख हसीना! शिवाय, बीसीसीआयच्या कठोर भूमिकेनंतर भारत-पाकिस्तान सामने दुबईत खेळवले गेले. या पृष्ठभूमीवर आपणही संधी साधावी, असा केविलवाणा प्रयत्न बांगलादेशने करून बघितला. पण, कुठे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ ज्यांचे वार्षिक उत्पन्न जवळपास १० हजार कोटी रुपये आहे जे आयसीसीच्या उत्पन्नापेक्षाही जास्त आहे आणि कुठे बांगलादेश क्रिकेट बोर्ड ज्यांची वार्षिक कमाई ४२५ कोटी इतकी आहे. भारतीय चलनात एका टक्याची किंमत ७५ पैसे आहे, हे उल्लेखनीय! 'कहां राजा भोज, कहां गंगूतेली' असेच हे समीकरण आहे. या सगळ्यावर कडी म्हणजे बीसीबीचा अध्यक्ष आसिफ नजरुलचे वक्तव्य! 'आम्ही कोणाच्याही दबावाला बळी पडणार नाही. बांगलादेश विश्वचषक खेळला नाही तर काय परिणाम होतील, हे जग बघेल,' असा धमकीवजा इशारा नजरुलने क्रिकेटजगताला दिला आहे. बांगलादेशचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळवावेत का? यावर आयसीसीने घेतलेल्या एकूण १६ देशांच्या मतदानात फक्त पाकिस्तान आणि बांगलादेशने समर्थनाचे मत दिले आणि उर्वरित १४ देशांनी याचा विरोध केला. दररोज सरासरी एका हिंदूची हत्या करणाऱ्या बांगलादेशींना भारतात येणाऱ्या त्यांच्या क्रिकेट चमूच्या सुरक्षेची काळजी आहे, म्हणे! खरे तर आम्हीच बांगलादेशासोबत खेळणार नाही, पाकिस्तानप्रमाणे त्यांच्यासोबतही औपचारिक वागणूक ठेवू ही भूमिका भारतीय क्रिकेटनेच घ्यायला हवी होती. पण, आपल्या मनावर 'सुविचार' पक्के कोरलेले असल्यामुळे, उदारमतवादी भूमिका घेणाऱ्या भारतापुढे बांगलादेश अडेलतट्टूपणा करतोय. परिणामी, आंतरराष्ट्रीय क्रिकेट राजकारणात बांगलादेशचाच 'खेला होबे'!

९८५०३३९२४०

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# एकनाथ शिंदे म्हणजे उद्धव ठाकरे नाहीत

मुंबई महापालिकेत तब्बल २५ वर्षांनी भाजपची सत्ता येताना दिसत आहे. खऱ्या अर्थाने उद्धव ठाकरे आणि त्यांच्या शिवसेनेची सत्ता खालसा झाली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजप हा सर्वांत मोठा पक्ष म्हणून निवडून आला आहे. पण बहुमतासाठी आवश्यक २५ जागा कमी पडल्याने युतीतला मित्रपक्ष एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची भाजपला मदत घ्यावी लागते आहे. पण मुंबईचा महापौर भाजपचाच होणार हे पक्के. 'देवाची कृपा झाली तर आमचा महापौर बसेल' असे बोलून उद्धव ठाकरे यांनी खळबळ उडवून दिली खरी. शिंदे यांनीही आपले नगरसेवक हॉटेलमध्ये ठेवून सनसनाटी पसरवली. पण काहीही झाले तरी एकनाथ शिंदे हे 'उद्धव ठाकरे' नाहीत. देवेंद्र फडणवीस आणि भाजप यासारख्या विश्वासार्ह मित्रपक्षाशी गद्दारी करणे म्हणजे स्वत:साठी खड्डा खोदणे आहे हे त्यांना छान कळते. शरद पवारांनी २०१९ मध्ये मुख्यमंत्रिपदाचे गाजर दाखवताच उद्धव ठाकरे धावत सुटले होते. शिंदे हे त्यातले नाहीत. ते ताणून धरू शकतात. पण तुटू देणार नाहीत. 'माझा बाप चोरला' अशी ओरड उद्धव ठाकरे नेहमीच करतात. मात्र बाळासाहेबांचा खरा वारस एकनाथ शिंदेच आहेत. त्यांनी ते कृतीने दाखवूनही दिले आहे. 'ठाकरे ब्रॅण्ड'चा बॅण्ड वाजला आहे. त्यामुळे मीडियामध्ये कशाही बातम्या रंगून येऊ द्या. महापौर भाजपचाच होणार. गुंतवणूकदारांच्या जागतिक परिषदेसाठी देवेंद्र फडणवीस दावोसला गेले आहेत. २४ जानेवारीला ते भारतात येतील. त्यानंतर हालचाली वाढतील. देवाभाऊ म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सामर्थ्यशाली नेतृत्वाने हा चमत्कार घडवला आहे. देवाभाऊ नसते तर? साधी गोष्ट नव्हे. जन्माने नागपूरकर असलेल्या फडणवीसांनी मुंबई जिंकवून दाखवली आहे. लोकसभा निवडणुकीतल्या धक्क्यानंतर फडणवीसांनी विधानसभा जिंकली. नंतर नगर परिषद निवडणुका जिंकल्या आणि आता महापालिका. पुढच्या महिन्यात जिल्हा परिषद निवडणुका आहेत.

मुस्लिम व्होट बँकेवर विश्वास ठेवणे उद्धव ठाकरे यांच्या अंगलट आले. मुख्यमंत्री होण्याच्या स्वार्थापायी ठाकरेंनी हिंदुत्व सोडले. हिंदू सोडून जातील म्हणून 'सेक्युलर' बनले. मुस्लिम, दलित आणि मराठी माणूस या फॉर्म्युल्यावर आपण निवडणूक काढू असा ठाकरेंना विश्वास होता. पण मुस्लिम मतदारांची एक स्पेशालिटी आहे. जेव्हा पर्याय उपलब्ध असतो तेव्हा ते मुस्लिम पर्याय निवडतात. पर्याय नसेल तर ते भाजपविरोधकाला निवडतात. विधानसभेत त्यांना उद्धव ठाकरे यांच्या रूपात पर्याय सापडला. मात्र आता महापालिका निवडणुकीत त्यांना एमआयएम पक्षाच्या रूपात पर्याय सापडला होता. मुसलमान आपल्यासोबत नाहीत हे ठाकरेंना उमगले तेव्हा उशीर झाला होता. मालेगावमध्ये ६१ जागांवर मुस्लिम उमेदवार निवडून आले. छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमने ३३ जागा जिंकल्या. हिंदूंनी अंतर्मुख होऊन विचार करावा असे हे निकाल आहेत. ठाकरे असा विचार करू शकत नाहीत. त्यांना फक्त मुंबई खिशात पाहिजे होती. मुंबई पाहिजे म्हणजे मुंबईची तिजोरी पाहिजे. मराठी माणूस वाचवायचा आहे हे त्यांचे बोलणे शुद्ध भंकसपणा होता. मुंबई महापालिकेचे वर्षाचे बजेट ७५ हजार कोटी रुपये आहे. त्याशिवाय, केंद्र सरकारचा निधी म्हणून विविध योजनांसाठी ५० हजार कोटी रुपये या महापालिकेला दरवर्षी येतात. म्हणजे एकट्या मुंबई महानगर प्रदेशात वर्षाला दोन हजार कोटी रुपये खर्चायला मिळतात. म्हणूनच सारी मारामारी या सोन्याच्या कोंबडीसाठी असते. या निवडणुकीत फडणवीस यांनी विकास हाच अजेंडा पुढे केला. विकासाच्या नावावर मतं मागितली. ठाकरेंनी मराठीच्या अस्मितेचा इश्यू केला. त्यासाठी राज ठाकरे या आपल्या भावाला सोबत घेतले. पण मराठी माणूस आता शहाणा झाला आहे हे दोन्ही भाऊ विसरले. राज ठाकरेंनी गौतम अदानी या उद्योगपतीवर हल्लाबोल करून काय मिळवले? हाही प्रश्न आहेच. मुंबई हे कॉस्मोपॉलिटन शहर आहे. साऱ्या जातिधर्माची माणसे इथे पोटासाठी येतात. इथे तामिळ मतदारही चांगल्या संख्येने आहेत. त्यांचा नेता भाजपचे अण्णामलाई प्रचारासाठी आले होते. राज ठाकरेंनी 'रसमलाई' म्हणत त्याची टिंगल उडवली. राज ठाकरे यांच्या सभांना गर्दी होते. मात्र ही गर्दी मतांमध्ये परिवर्तित होत नाही हा नेहमीच अनुभव आहे. या वेळीही तसेच घडले. अवघ्या ६ जागांवर मनसेला समाधान मानावे लागले. २० वर्षांनंतर एकत्र आलेले हे भाऊ आता किती दिवस एकत्र राहतात तेच पाहायचे. राज यांच्याऐवजी उद्धव ठाकरेंनी काँग्रेसला सोबत घेतले असते तर निकाल काही वेगळे असते. आताही लातूर, कोल्हापूर, परभणी, चंद्रपूर अशा शहरांमध्ये काँग्रेसने आपले अस्तित्व दाखवले. पण उद्धव यांना आपल्या शक्तीचा मोठा अहंकार होता. ते मुख्यमंत्री असतानाच्या अडीच वर्षांच्या काळात महाराष्ट्राला त्याचे दर्शन झाले. कंगना राणावत ही प्रसिद्ध अभिनेत्री तेव्हा उद्धवना म्हणाली होती, ''आज मेरा घर टूटा है. कल तेरा घमंड टूटेगा.' तिची शापवाणी खरी ठरली. उद्धव यांच्या हातातल्या सत्तेच्या ठिकऱ्या उडाल्या. नियतीचा खेळ पाहा. उद्धव आज एकदम रिकामे झाले आहेत. चार वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना एक इशारा दिला होता. ''तुम्ही म्हणजे मराठी नाही, तुम्ही म्हणजे मुंबई नाही, तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही.'' आता 'तुम्ही म्हणजे बाळासाहेब ठाकरेसुद्धा नाही' हे मुंबईच्या मतदारांनी दाखवून दिले आहे. मुंबई जिंकणं सोपं नव्हतं. स्थापनेच्या ४५ वर्षांनंतर भाजपच्या हातात मुंबई महापालिका आली आहे. हिंदुत्वाचा ब्रॅण्ड आणि विकासाचा अजेंडा या जोरावर फडणवीस यांनी हे यश कमावलं. फडणवीस यांनी केवळ ठाकरेंना संपवले नाही तर शरद पवार नावाचे संस्थानही खालसा केले. यावेळी नरेंद्र मोदी किंवा अमित शाह यापैकी कोणीही प्रचाराला आले नव्हते. आपल्या टीमच्या जोरावर फडणवीस यांनी मुंबई जिंकवून दिली. निवडणुका जिंकवून देणारा मुख्यमंत्री अशी फडणवीस यांची ख्याती झाली आहे. सध्या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना यासाठी ओळखले जाते. त्या जोडीला आता फडणवीस आले आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी राज्याचा विकास आणि पक्षाचा विस्तार केला. मोदींनी केले तेच फडणवीस करीत आहेत. विकासपुरुषाचा अजेंडा आहे. मुंबईतला धारावीचा प्रकल्प मार्गी लागला, बुलेट ट्रेन धावू लागली तर फडणवीस यांची राजकीय उंची किती वाढेल याची कल्पनाच करवत नाही.



९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वसंत पंचमी आणि त्याचे महत्त्व

भारतातील धार्मिक आणि सामाजिक-सांस्कृतिक परंपरांचा अगदी थोडासा अनुभव असलेल्या व्यक्तीलाही हे ठावूक आहे की, वसंत पंचमी हा सण संपूर्ण देशभर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हिंदू समाजासाठी हा सण कुटुंबीय व मित्रमंडळींच्या आनंदी पुनर्मिलनाचा दिवस असतो.

**धार्मिक व ज्योतिषशास्त्रीय महत्त्व** : हिंदू उपासना परंपरेच्या अभ्यासकांसाठी आणि भारतीय ज्योतिषशास्त्राच्या जाणकारांसाठी वसंत पंचमी हा अत्यंत शुभ दिवस आहे. धार्मिक दृष्टिकोनातून, हा माघ नवरात्र कालावधीतील देवीपूजेचा मुख्य दिवस मानला जातो. ज्योतिषशास्त्राच्या दृष्टिकोनातून, हा दिवस एवढा शुभ मानला जातो की कितीही अमंगलकारी योग जरी असले तरीही उपनयन, विवाह आणि इतर शुभ कार्य या दिवशी कोणत्याही संकोचाशिवाय करता येतात.

**निसर्गाच्या दृष्टीने खऱ्या नववर्षाचा प्रारंभ** : जर आपण निसर्गशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला, तर वसंत पंचमी हा वसंत ऋतूच्या आगमनाचा उत्सव आहे.

ख्रिश्चन, पारशी, इस्लाम धर्मीयांची नवीन वर्षे ऐतिहासिक कारणांमुळे वेगवेगळ्या वेळी येतात. मात्र, हिंदू नववर्ष (चैत्र महिन्यातील गुढीपाडवा) हे खऱ्या अर्थाने निसर्गनियमांवर आधारित आहे, कारण वसंत हा पहिला ऋतू आहे आणि मेष राशी ही हिंदू आणि पाश्चात्त्य दोन्ही ज्योतिषशास्त्रांमध्ये पहिली राशी मानली जाते.

**वसंताचा सर्वोच्च दर्जा का?** : प्रश्न पडतो की ऋतूंचा चक्राकार प्रवास असताना वसंतालाच प्रथम क्रमांक का दिला जातो? त्याचे उत्तर असे की, वसंत ऋतूला निसर्गशास्त्रीय दृष्टिकोनातून विशेष स्थान आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळ्यामुळे ज्याचे अस्तित्व मावळते, ते वसंताच्या आगमनाने पुन्हा फुलते आणि जिवंत होते.

**वसंत आणि निसर्ग** : उन्हाळ्यात जळलेली पाने, पावसाळ्ययात कुजलेली पाने आणि हिवाळ्यात सुकून गळून गेलेली पाने वसंत ऋतूत पुन्हा नवीन अंकुर धारण करतात. पक्षी, विशेषतः कोकिळ, जी हिवाळ्यात गप्प असते, ती वसंत ऋतूमध्ये गोड गाणे गाऊ लागते. म्हणूनच संस्कृत सुभाषितात म्हटले आहे --

**काकः कृष्णः पिकः कृष्णः को भेदः पिककाकयोः।**
**वसंतकाले संप्राप्ते काकः काकः पिकः पिकः॥**

(कावळा आणि कोकिळ दोघेही काळे असतात, पण त्यांच्यातील फरक वसंत ऋतूत सहज कळतो -- कारण कोकिळेचा आवाज गोड असतो आणि कावळा करकस ओरडतो.)

## वाचक पत्रे

**मानवी जीवनावर परिणाम** : फक्त निसर्गावरच नव्हे, तर मानवी मनोवृत्तीवरही वसंत ऋतूचा प्रभाव पडतो.

**शारीरिक आणि भावनिक प्रभाव** : हिवाळ्यात संथ झालेली जीवनशक्ती वसंत ऋतूमध्ये पुन्हा जागृत होते. म्हणूनच वसंत पंचमीला मदन पंचमी असेही म्हणतात, कारण हा दिवस प्रेम आणि सौंदर्याचे प्रतीक आहे.

**बौद्धिक आणि आर्थिक प्रभाव** : लेखक, विचारवंत आणि व्यापारी हिवाळ्यातील मरगळ झटकून नवीन जोमाने कार्यरत होतात. म्हणून वसंत पंचमीला सरस्वती पंचमी (विद्येची देवी) आणि श्री पंचमी (संपत्तीची देवी लक्ष्मी) असेही म्हटले जाते.

**सामाजिक आणि धार्मिक प्रभाव** : वसंत पंचमी हा परोपकारी कार्यांचा सण आहे. शंकराचार्यजींनीही म्हटले आहे-

**वसंतवल्लोकहितं चरन्तः॥**

(वसंत ऋतूप्रमाणे सत्पुरुष नि:स्वार्थपणे समाजकल्याणासाठी कार्य करतात.)

**वसंताचे आध्यात्मिक शिक्षण** : वसंत फक्त निसर्गाच्या पुनरुत्थानाचा साक्षीदार नाही, तर तो आध्यात्मिक गुरूही आहे.

**आत्म्याचे अमरत्व** : भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात --

**वासांसि जीर्णानि यथा विहाय - नवानि गृह्णाति नरोऽपराणि॥**

(जुन्या वस्त्रांचा त्याग करून माणूस नवीन वस्त्रे परिधान करतो, त्याचप्रमाणे आत्मा जुने शरीर सोडून नवीन शरीर धारण करतो.)

वसंत ऋतूमध्ये गळून पडलेली जुनी पाने नवी पालवी धारण करतात, त्याचप्रमाणे शरीराचा नाश होतो, पण आत्मा अजरामर असतो.

**वसंत पंचमी आणि वसंत ऋतू** : प्रश्न पडतो की वसंत ऋतू चैत्र महिन्यात सुरू होतो, मग वसंत पंचमी माघ महिन्यात का साजरी करतात?

उत्तर सोपे आहे - हिंदू परंपरेत कोणत्याही गोष्टीचा हिशेब केवळ प्रकट झाल्यानंतर केला जात नाही, तर त्याच्या गर्भधारणेपासून केला जातो.

जसे गर्भधारणेपासून बाळाच्या अस्तित्वाची नोंद केली जाते, तसेच वसंत पंचमी हा वसंत ऋतूच्या आगमनाचा पूर्वसूचक दिवस आहे. गीतेच्या दहाव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात-

**ऋतूनां कुसुमाकरः॥**

(ऋतूंमध्ये मी वसंत आहे, कारण तो सृष्टीला फुलवतो.)

**निष्कर्ष** : वसंत पंचमी हा फक्त एक सण नाही, तर निसर्गाच्या पुनरुज्जीवनाचा आणि आध्यात्मिक शिकवणीचा संदेश देणारा दिवस आहे.

भगवंत वसंताप्रमाणे आपले जीवनही सतत नवा जोम, नवी उमेद आणि नव्या आशेने भरू दे.

*(शंकराचार्य भारती कृष्ण तीर्थ यांचा इंग्रजी लेख 'वसंत पंचमी ॲण्ड इट्स सिग्नीफिकन्स'चा मराठी अनुवाद)*

**श्रीकांत देशपांडे**

(विश्वस्त : श्री विश्व पुनर्निर्माण संघ, जगद्गुरू परिसर, तेलंगखेडी, नागपूर)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### डॉ. अभिजित जगताप यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या सिनेटपदी निवड

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

डॉ. अभिजीत जगताप यांची नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या सिनेटवर नाम निर्देशीत सदस्य पदी निवड झालेली आहे. डॉ. जगताप हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे आरोग्य अधिकारी तथा आरोग्य संकुल समन्वयक म्हणून कार्यरत असून आरोग्य व शिक्षण क्षेत्राचा त्यांना पंचवीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते प्र. कुलगुरू डॉ. दामा,कुलसचिव डॉ. अतुल लकडे व इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. येत्या काळात दोन्ही विद्यापीठाच्या माध्यमातून सोलापूर शहर व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना आरोग्यक्षेत्रातील अनेक नवीन अभ्यासक्रम उपलब्ध व्हावेत या करता प्रयत्न करणार असल्याचचा मानस डॉ. जगताप यांनी व्यक्त केला असून त्यांच्या निवडी बद्दल समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



### भरधाव कार अपघातात ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

सिव्हील चौक परिसरात भरधाव व निष्काळजीपणे चालवलेल्या कारच्या धडकेत ७३ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात अज्ञात कारचालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दगडू सखाराम बनसोडे (वय ७३) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते सिव्हील चौकातील चिराग हॉटेलजवळील सार्वजनिक रस्त्यावरून पोटफाडी चौकाच्या दिशेने चालत जात होते. त्याच वेळी कार क्रमांक एमएच १३ सी एस २८२० वरील अज्ञात चालकाने वाहन भरधाव वेगाने व हयगयीने चालवून त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात बनसोडे यांच्या डोक्याला व संपूर्ण शरीराला गंभीर दुखापत होऊन ते गंभीर जखमी झाले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.याप्रकरणी मृताचे पुत्र अनिल दगडू बनसोडे (वय ४८, रा. सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, सिव्हील हॉस्पिटल पाठीमागे, सोलापूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २१ जानेवारी रोजी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास जेलरोड पोलीस करीत असून अज्ञात कारचालकाचा शोध सुरू आहे.






### सर्वंकष वाचन करण्याचे अभूतपूर्व फायदे; थोर साहित्यिक नितीन वैद्य यांचे प्रतिपादन

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

वाचन करणे हे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता सर्वंकष वाचन करण्याचे अभूतपूर्व असे फायदे असून वाचनाने आपल्या जाणिवा समृद्ध होत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक नितीन वैद्य यांनी केले. सिद्धेश्वर पेठ येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे, तालुका ग्रंथपाल धोंडीराम जेऊरकर, वृषाली हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती .जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा बाबत माहिती देऊन सर्व सार्वजनिक ग्रंथालयांनी यानिमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कुंडलिक मोरे यांनी मराठी भाषा समृद्ध करण्यात ग्रंथालयाचे खूप मोठे योगदान असून मराठी भाषा संवर्धनात सर्वांनी उत्स्फूर्तपणे पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.सूत्रसंचालन प्रमोद पाटील तर आभार प्रदर्शन संजय ढेरे, नियोजन प्रदीप गाडे यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने वाचकांची उपस्थिती होती.

# सोलापूर-तुळजापूर महामार्गावरील उळेगावच्या 'त्या' पुलाचे लवकरच लोकार्पण

**दै. 'तरूण भारत'च्या वृत्तमालिकेला यश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

२०१४-१५ साली सोलापूर-धुळे या चारपदरी महामार्गाची निर्मिती झाली खरी मात्र तत्कालिन प्रकल्प संचालकांकडून महामार्गावरील उळेगावचा पुल पाडलाच गेला नाही; या उळेगावच्या अरूंद पुलामुळे अनेक वाहनधारकांना अंदाज यायचा नाही आणि दोन वाहने एकत्र पुलावर आली की, अपघात होवून काहीजणांना जीव गमवावा लागला तर काहीजण जखमीही झाले आहेत. यामुळे दैनिक 'तरुण भारत'च्या माध्यमातून यासाठी वृत्तमालिका प्रकाशित केल्यावर गतवर्षीचे प्रकल्प संचालक राकेश जावदे यांनी मनावर घेऊन या पुलाचे काम गतवर्षी चालू केले आणि आता ते काम शेवटच्या टप्प्यात आल्याने वाहनधारकांतून समाधानाचे वातावरण पसरले आहे.

गेल्या ४ ते ५ वर्षात या पुलावर अनेक अपघात झाले आहेत. काही वाहनांतील मालाचेही म ोठे नुकसान झाले आहे. याच पुलावरील एका अपघातातील ट्रकने पेट घेतल्याने त्यांचीही मोठी आर्थिक हानी झाली होती. एकंदरीत, या अरूंद पुलाचा दूरदूरवरून आलेल्या वाहनधारकांना अंदाज येत नसल्याने असे अपघात होत होते. वारंवार अपघात होत असल्याने याबाबत विविध प्रसार माध्यमांबरोबर दैनिक तरूण भारतनेही वृत्तमालिका लावली होती. यामुळे या महामार्गाचे प्रकल्प संचालक राकेश जावदे यांनी दिल्लीवरून या पुलाच्या निर्मितीची मंजुरी घेतली आणि ऐन पावसाळ्यातच याचे कामही सुरू केले होते. मात्र पावसाळ्यात या ओढ्याला सतत महापूर येत असल्याने याचे काम जवळपास ३ महिने थांबले होते. गेल्या महिन्यापासून याचे काम गतीने चालू असून, येत्या २-३ महिन्यात याचे काम पूर्णत्वास जाणार असल्याची माहिती महामार्ग कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून मिळाली. हा पुल बांधण्यात येत असल्याने अनेक वाहनधारकांनी दै. 'तरूण भारत'शी बोलताना समाधान व्यक्त केले.






## चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेस सावित्री फातीमा उपक्रमशिल शाळा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

द फिरदोस महिला शिक्षण व समाज सेवा संस्था संचलित चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेस शिक्षक भारती संघटनेच्यावतीने सावित्री फातीमा उपक्रमशिल शाळा म्हणून संघटनेच्या राज्यअध्यक्ष अशोक बेलसुरे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी शिक्षक आमदार कपिल पाटील होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी कादर शेख उपस्थित होते. यावेळी शिक्षक भारती संघटने जिल्हा अध्यक्ष सुजितकुमार कारमोरे, उपाध्यक्ष रियाजअहमद अत्तार आदी उपस्थित होते. हे पुरस्कार शाळेचे संस्थापक बशीर बागवान व शिक्षकांनी प्रम ुख पाहुण्यांच्या हस्ते स्वीकारला. शाळेस पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. जे.बी. बागबान व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

## जिल्हा परिषदच्यावतीने गायक मोहम्मद अयाज यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा परिषद मराठा सेवा संघ यांच्या विद्यमाने राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त महागायक विजेते तथा सोलापूर जिल्हा परिषदचे ब्रँड अम्बेस्डर मोहंम्मद अयाज यांचा जिल्हा परिषदेतील यशवंतराव चव्हाण सभागृहात सत्कार करण्यात आला.

अयाज यांनी आपल्या सुरेल आवाजात जय जय महाराष्ट्र माझा हे राज्य गीत गाऊन स्वराज्य जनक छत्रपती शिवाजी महाराज व मा जिजाऊ यांना अभिवादन केले. सभागृहात बसलेल्या माय माऊलीसाठी तू कितनी अच्छी है ओ मा तू कितनी अच्छी है हे गीत गाऊन समस्त माय माऊलींना भारवून टाकले. यावेळेस मोहम्मद यांचा जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते मोहम्मद अयाज यांना मानपत्र शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, जिल्हा ग्रामीण विकास प्रकल्प संचालक राजशेखर जगताप, अमोल जाधव, मुख्य लेखा अधिकारी मीनाक्षी वाकडे, शिक्षणाधिकारी कादर शेख, कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, गटविकास अधिकारी मनोज राऊत, महाराष्ट्र मराठा सेवा संघाचे अध्यक्ष अविनाश गोडसे आदी उपस्थित होते.

## सव्वा कोटीची फसवणूक केलेल्या गुन्ह्यातील आरोपींचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

गुप्तधन काढून देतो म्हणून फसवणूक केलेल्या गुन्ह्यातील आरोपींचा जामीन मंजूर झाला आहे.

थोडक्यात यात हकीकत अशी की, राजू विनायक आडम यांनी तारीख ५ आक्टोंबर २०२५ रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन गुन्हा दाखल झाला होता. फिर्यादीने ५ सप्टेंबर २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान आरोपी मोहम्मद कादर शेख व त्याचे साथीदार इम्रान, तमीम कुरेशी, आयुब रचभरे, सचिन गायकवाड, दाउद प्रठाण, लक्ष्मण वाघमारे यांनी फिर्यादीची फसवणुक करण्याचा कट करून, गुप्त धनाचा हंडा काढून देण्याचे अमिष दाखवून, काहीतरी द्रव्य पिण्यास देवून जादुटोणा केला व त्याकरीता त्यांच्याकडून वेळोवेळी रक्कम रुपये १ कोटी २६ लाख ३४ हजार ६००/-रू घेतले व फिर्यादीस काहीएक चिजवस्तू न देता फसवणुक केलेली आहे. फिर्यादवरूनन भारतीय दंड संहिता व महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम दाखल केला होता. तसेच या सर्व आरोपींविरुद्ध जेल रोड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आरोपींना १७ आक्टोबर २०२५ रोजी अटक करण्यात आली व मेहरबान कोर्टासमोर हजर करण्यात आले होते. तेंव्हापासून सदरचे आरोपी हे न्यायालयीन कोठडीत होते. त्यानतंर आरोपी सचिन गायकवाड यांच्या वतीने ॲड. डी.एन व एन.एन. भडंगे यांच्यामार्फत जामीन अर्ज ठेवण्यात आला होता. त्यामध्ये मे.कोर्टासमोर, जामीन हा नियम आहे तुरुंग हा अपवाद आहे व केवळ आरोप गंभीर आहेत म्हणून जामीन नकारनेयोग्य नाही तसेच आरोपी दोषी ठरेपर्यंत तो निर्दोष मानला जातो. तपास पूर्ण झाल्यानंतर कोठडी आवश्यक राहत नाही, अशा प्रकारचे नामदार सुप्रीम कोर्ट दिल्ली यांचे निवाडे आरोपींना जामीन मिळण्याकरता मेहरबान कोर्टासमोर आरोपीच्या वतीने सादर करून आरोपींना जामीन देण्यात यावा असा युक्तिवाद ॲड. भडंगे यांच्यामार्फत करण्यात आला. मेहरबान कोर्टानी सदरचा व्यक्तिवाद ग्रहमानुन आरोपीला रक्कम रुपये २० हजार इतक्या रकमेच्या जामीनावर आरोपी गायकवाड यांची मुक्तता मे.ज्युडीशियल मॅझिस्ट्रेट वर्ग एक व्हि.ए.कुलकर्णी यांनी१७ जानेवारी २०२६ रोजी केली यात आरोपीच्या वतीने ॲड.डी.एन. व एन.एन.भडंगे, ॲड. योगेश.पवार, ॲड.दिपाली. गायकवाड, ॲड.झेबा.सय्यद व वसिम शेख यांनी पाहिले.



## बालाजी अमाईन्स 'सस्टेनेबिलिटी लीडर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

बालाजी अमाईन्स लिमिटेडला शाश्वत विकास क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीकडून प्रतिष्ठित 'सस्टेनेबिलिटी लीडर ऑफ द इयर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

FICCI ही भारतातील एक जुनी व नामांकित औद्योगिक संघटनेची स्थापना १९२७ मध्ये झाली. भारतीय उद्योगांचे प्रतिनिधित्व करत ही संस्था सरकारसोबत समन्वय साधून आर्थिक विकास, व्यापार, गुंतवणूक आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. FICCI केमिकल्स अँड पेट्रोकेमिकल्स अवॉर्ड्स हा पुरस्कार सोहळा फेडरेशन हाऊस, नवी दिल्ली येथे पार पडला. 'सस्टेनेबिलिटी लीडर ऑफ द इयर' हा पुरस्कार बालाजी अम ईन्सला मिळाले असून, याच श्रेणीत रिलायन्स इंडस्ट्रीज आणि ट्रान्सपेक इंडस्ट्री लिमिटेड यांनाही या पुरस्काराने गौरविण्यात आले. बालाजी स्पेशालिटी केमिकल्सचे संचालक जी. हेमंत रेड्डी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. बालाजी अमाईन्सची स्थापना १९८८ साली झाली असून कंपनीने सुरुवातीला धाराशिव जिल्ह्यातील तामलवाडी येथे एका प्रकल्पाद्वारे अलिफॅटिक अमाईन्स उत्पादनास सुरुवात केली होती. गेल्या तीन दशकांत कंपनीने अमाईन्स, डेरिव्हेटिव्हज आणि स्पेशालिटी केमिकल्स क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वासार्ह उत्पादक म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. सध्या कंपनीचे महाराष्ट्र व तेलंगणा राज्यात एकूण चार उत्पादन प्रकल्प कार्यरत असून ५० हून अधिक देशांमध्ये उत्पादनांची निर्यात केली जाते. ही कंपनी ९० टक्के सांडपाण्याचे शुद्धीकरण करून पुनर्वापर करते व केवळ १० टक्के ताज्या पाण्याचा वापर करते. आपल्या वीज गरजेचा मोठा भाग कंपनी स्वतःच्या सौर व पवन ऊर्जा प्रकल्पांतून पूर्ण केला जातो, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात मोठी घट झाली आहे. तसेच, हायड्रोजन वायूचा पुनर्वापर स्वच्छ इंधन म्हणून केला जातो व ७५ टक्के पुनर्वापरयोग्य पॅकेजिंग साहित्य वापरले जाते.

**आम्ही केलेल्या प्रयत्नांची पावती : रेड्डी**

डी. राम रेड्डी म्हणाले, हा पुरस्कार म्हणजे स्वच्छ आणि हरित पर्यावरणासाठी आम्ही केलेल्या प्रयत्नांची पावती आहे. आमचे अध्यक्ष ए. प्रताप रेड्डी यांच्या दूरदृष्टीमुळेच आम्हाला अत्याधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामग्रीमध्ये गुंतवणूक करुन पर्यावरणावर होवू शकणारे दुष्परिणाम कमी करता आले. आम्ही राबवलेले पर्यावरणपूरक उपक्रम इतर उद्योगांसाठी आदर्श ठरतील.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

रे.द.नं. १९/२०२३
नि.नं.- २२

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन साहेब यांच्या कोर्टात**

**वैजिनाथ सोमनाथ गुडे वगैरे २** — **वादी / डि.एच**
विरुध्द
**जुबेदा महमद सय्यद वगैरे ३** — **प्रतिवादी / जे.डी.**

**३) जमीर महमद सय्यद,**
वय - ४८ वर्षे, धंदा - व्यापार,
रा. १५५०, सुभाष नगर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर — **प्रतिवादी / जे.डी.**

यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी, वादी वैजिनाथ सोमनाथ गुडे वगैरे २ यांनी जुबेदा महमद सय्यद वगैरे ३ यांचे विरूध्द बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो. बार्शी श्रीमती आर.एम. कंटे यांचे न्यायालयात रे.मु.नं. ५३५/१९९४ मधील दि. २९/०७/२०१२ रोजीचे हुकूमनाम्याची बजावणी होऊन मिळणेसाठी दरखास्त दाखल केली आहे त्यामध्ये तुम्ही जमीर महमद सय्यद हे जे.डी. प्र.वादी नं. ३ म्हणून सामील असून तुम्हास दरखास्तीतील पत्यावर नोटीस पाठविली असता तुम्हास नमूद पत्यावर नोटीस बजावणी तुम्ही जागेवर मिळून न आल्याने व तुमचा निश्चित ठावठिकाणा मिळून येत नाही या कारणाने झालेली नाही सबब तुम्हास या जाहीर प्रसिध्दीकरण नोटीसद्वारे कळविणेत येते की, तुम्ही नियुक्त दि. ०२/२/२०२६ रोजी अथवा हे जाहीर समन्स प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत वकीलामार्फत अगर स्वतः मे. कोर्टात हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर प्रमाणे तुम्ही म्हणणे न मांडलेस मे. कोर्ट तुमचेविरूध्द पुढील एकतर्फी चौकशीचा हुकूम करतील व प्रकरण निकाली करतील याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण माझ्या आदेशाने दिले. ता. २२/०१/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, बार्शी**

## हुंड्यासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

लग्नानंतर तीन महिन्यांतच विवाहितेला माहेरहून पाच लाख रुपये आणण्याची मागणी करत शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. फरीदा सोहेब शेख (वय ३०, रा. नवीन घरकुल, कुंभारी) लग्नानंतर तीन महिन्यापासून कुंभारी येथील सासरी नांदत असताना, माहेरकडून योग्य मानपान झाला नाही, असा आरोप करत आरोपींनी वारंवार हुंड्याची मागणी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. ''तुझ्या माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये, मला कपाट कारखाना टाकायचा आहे,'' असे म्हणत पती सोहेब शेख, सासू राबिया, सासरे अयुब, दीर सोहेज व जाऊ साबरीन यांनी फिर्यादीस हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-प्रोक्योरमेंट**

**एसयूआर/सीनियर डीएमएम/टी.क्र. 96255816, दिनांक: 20/01/2026 ई-निविदा सूचना**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय स्टोअर्स कार्यालय, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/ कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे: 01. निविदा क्रमांक: 96255816, 02. वर्णन: संलग्न तांत्रिक वैशिष्ट्यांनुसार इलेक्ट्रिकली चालित, रोटरी स्क्रू, एअर-कूल्ड, मायक्रोप्रोसेसर आधारित स्टेशनरी एअर कॉम्प्रेसर 500 सीएफएम 10 किलो/सेमी2 चा पुरवठा, स्थापना, कमिशनिंग आणि चाचणी. 03. प्रमाण: 2 संख्या, 04. बयाणा रक्कम ठेव (INR): रु. 1,16,460.00 निविदा समाप्तीची तारीख आणि वेळ: 02/02/2026 सकाळी 11:30 वाजता www.ireps.gov.in वर. संभाव्य निविदाधारकांना निविदा समाप्तीच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रके लक्षात येतील. वेबसाइट: www.ireps.gov.in.

**वरिष्ठ विभागीय साहित्य व्यवस्थापक**
**सोलापूर**

**धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे जामगांव (पा), ता. बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने आमचे खालील सही करणारे पक्षकार कळवू इच्छितात की,

डि. सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे जामगांव (पा) येथील शेतजमीन ग.नं. ७०, ७१, १३८ या मिळकती आमचे अशिल सुमित महेंद्र सातपुते, रोहीत महेंद्र सातपुते व अनिता महेंद्र सातपुते, रा. जामगांव (पा), ता. बार्शी यांचे एकत्र हिंदु कुटूंबाच्या अविभक्त अशा शेतजमीनी आहेत. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलाचे कायदेशीर हक्क हिस्से आहेत असे असताना आमचे अशिल नं.१, २ चे वडिल म्हणजेच अशिल नं.३ चे पती महेंद्र भिमराव सातपुते हे त्यांचे वडिलांचे ऐकून तसेच सदर मिळकती सदर महेंद्र यांचे वडिल भिमराव संदीपान सातपुते यांचे नावावर असलेचा गैरफायदा घेऊन सदर मिळकती भिमराव सातपुते हे विक्री करणार असलेचे बोलत आहेत, तशी गावात चर्चा चालू असलेची आमचे अशिलास खात्रीशीर माहिती मिळालेली आहे. सदर मिळकतीत आमचे अशिलाचे कायदेशीर हक्क हिस्से अबाधीत आहेत. आमचे कुटूंबामध्ये कौटुंबीक मतभेद असलेने त्याचा राग मनात धरुन तसेच आमचे अशिलाचे कायदेशीर हक्क बुडविण्याचे हेतुने व आमचे अशिलांना भूमीहिन करण्याचे हेतुने सदर महेंद्र भिमराव सातपुते व भिमराव संदीपान सातपुते हे संगनमताने गैरकृत्य करण्याची शक्यता आहे

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीसंबंधाने भिमराव संदीपान सातपुते, रा. जामगांव (पा) ता. बार्शी यांचेशी कोणीही कसलाही, खरेदी-विक्रीचा व्यवहार वा दस्त करु नये याउपर केलेस तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, आमचे अशिलाचे कायदेशीर हक्काची जाणिव व्हावी व कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. २२/०१/२०२६

**सही/-**
**श्री. प्रसाद जे. कुलकर्णी, ॲडव्होकेट**
**बी.एस.एल., एलएल.बी.**
**लक्ष्मीनृसिंह, कासारवाडी रोड,**
**सिध्देश्वर नगर बार्शी ता. बार्शी**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

**जाहीर नोटीस**

**दस्तऐवज गहाळ झाल्याबाबत**

तमाम सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांम याद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद मालमत्तेशी संबंधित काही मूळ दस्तऐवज प्रवासादरम्यान गहाळ / हरवलेले असून श्री. रमेश मलकप्पा पत्तार, रा. मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, यांचे संबंधित मालमत्तेचे काही मूळ दस्ताऐवज अंदाजे दिनांक १५/१२/२०२५ रोजी. दुपारी सुमारे २.०० वाजण्याच्या सुमारास सारस्वती चौक परिसर, सोलापूर येथे प्रवासादरम्यान गहाळ झाले आहेत. यासंदर्भात सोलापूर सिटी पोलीस, फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे दिनांक २१/०१/२०२६ रोजी ऑनलाइन गहाळ दस्तऐवज नोंद (Lost Documents Report) दाखन्न करण्यात आलेली आहे. सदर दस्तऐवजांचा सखोल शोध घेण्यात आला असूनही ते अद्याप सापडलेले नाहीत.

**गहाळ झालेले मूळ दस्तऐवजांची यादी :**

खरेदीखत (Sale Deed) सन २०१२,
**दस्तऐवज क्रमांक** : ३३/२०१२, **दिनांक** : ०३/०१/२०१२
**खरेदीदार** : श्री. मधुकर रामण्णा विभूते, **विक्रेता** : श्री. बादशहा काशिम सुतार
वरील खरेदीखताचा संपूर्ण मूळ दस्तऐवज संच गहाळ झाला आहे.
खरेदीखत (Sale Deed) सन २०१८ शी संबंधित RR पावत्या,
**दस्तऐवज क्रमांक** : ३९०८/२०१८, **दिनांक** : १२/११/२०१८
**खरेदीदार** : श्री. रमेश मलकप्पा पत्तार, **विक्रेता** : श्री. मधुकर रामण्णा विभूते

सदर खरेदीखत उपलब्ध असून फक्त RR पावती, Stamp Duty पावती. Registration Fee पावती, Document Handling Charges पावती व GRN / Challan गहाळ झाले आहेत.

वरील सर्व दस्तऐवज प्रवासादरम्यान गहाळ झाले असून सदर दस्तऐवज कोणाम सापडल्यास त्यांनी तात्काळ खाली नमूद पत्त्यावर संपर्क साधावा. सदर दस्तऐवजांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर करू नये, तसेच त्याबाबत कोणताही व्यवहार, खरेदी-विक्री, तारण, हस्तांतरण किंवा दावा करू नये, अशी सर्वसामान्य नागरिकांना सूचना देण्यात येत आहे. तसेच, वरील दस्तऐवजांबावत किंवा संबंधित मालमत्तेबाबत कोणास काही हक्क, दावा किंवा हरकत असल्यास, त्यांनी ही हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमूद वकिलांकडे लेखी स्वरूपात सादर करावी. विहित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, कोणाचाही दावा अथवा हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**जाहीर नोटीस दिनांक** : २२/०१/२०२६
**ठिकाण** : सोलापूर

**सही/-**
**ॲड. व्हनगोंडे जी.एस.**
**(बी.ए., एल.एल.बी.)**
**रजि. नं. महा.२७८१/२००९**
**कार्या-सिव्हील आणि क्रिमिनील कोर्टासमोर**
**मंगळवेढा, मो. नं.९७६५९५८८२५**

**बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, १४/०८/२०२४ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, १४/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा-टाकळी सिकंदर.** **कर्जदार/कायदेशीर वारस** **१. श्रीमती जयश्री संजय यादव** **२. श्री. यश संजय यादव** **३. श्री जय संजय यादव** श्री. संजय अशोक यादव यांचे कायदेशीर वारस यशराज ट्रेडर्सचे प्रो.प्रा निवासी पत्ता :- गट क्रमांक २९५, घर क्रमांक ९८०, शाम नगर, कारखाना (पुलुज) रोड टाकळी सिकंदा ता. मोहोळ, जि. सोलापूर. दुकानाचा पत्ता :- एम/एस यशराज ट्रेडर्स - प्रा. संजय अशोक यादव **जामीनदार:-** **४ श्री.ज्योतिरा जालिबदार जाधव** मु.पो. फुलचिंचोली, ता. पंढरपूर जि. सोलापूर. **५. समाधान सदाशिव गायकवाड.** मु.पो. फुलचिंचोली ता.पंढरपूर जि.सोलापूर. | **सुरक्षाः -** श्री. संजयकुमार अशोक यादव, गट क्रमांक २९५, घर क्रमांक ९८०, शाम नगर, कारखाना (पुलूज) रोड, टाकळी सिकंदर यांच्या नावावरील मालमत्तेच्या सर्व भागाचे नोंदणीकृत गहाणखत. श्री. संजयकुमार अशोक यादव यांच्या नावावर असलेल्या ४९५० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जागेसह बांधकाम क्षेत्र. चतुःसिमा खालीलप्रमाणे :- पूर्व : पुलूज रोड, पश्चिम : कालवा, दक्षिण : गट क्रमांक २९४/१/१, उत्तर : गट क्रमांक २९६ | **खात्यातील शिल्लक :** रु. १०,१३,१९४.९२/- + **असमायोजित व्याज :** रु. ४,१५,५८२.००/- + **दंडात्मक व्याजः** रु. २८,१५८.०० **एकूण** = १४,५६,९३४.९२/- (रुपये चौदा लाख छप्पन्न हजार नऊशे चौतीस रुपये आणि ब्याण्णव पैसे फक्त) **सांकेतिक ताबा दिनांक :** १४/०१/२०२६ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 14/01/2026**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ज्या गोष्टी नियंत्रणात नाही, त्याची काळजी नाही : अर्शदीप

**नागपूर :** ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणात नाही, त्याची काळजी करण्याची गरज नाही, असे भारतीय गोलंदाज अर्शदीप सिंग म्हणाला. अर्शदीप कोणाचेही मन न दुखावता किंवा शक्तीशाली लोकांना नाराज न करता आपले मत व्यक्त करतो. जसा मी भारतीय संघातून आत व बाहेर होत असतो, त्याचे काही फायदेही आहेत. माझा चेंडूही इन आणि आउट जातो. त्यामुळे मी त्याचा आनंद घेत आहे. निवडीअभावी चेंडू दोन्ही बाजूंनी स्विंग करण्याच्या आपल्या क्षमतेवर थोडाही परिणाम झालेला नाही, असे अर्शदीप हसत म्हणाला, ७३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १११ बळी घेणारा आणि टी-२० फॉरमॅटमधील भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज असलेला अर्शदीप, गत काही महिन्यांत संघाच्या संयोजनासाठी अनेकदा संघाबाहेर राहिला व जुलै २०२४ मध्ये गंभीरने पदभार स्वीकारल्यापासून तो चर्चेचा विषय राहिला आहे.

### दुखापतग्रस्त तितास साधूच्या जागी जिंतीमणी कलिताची निवड

**नवी दिल्ली :** गुजरात जायण्ट्सने गुरुवारी दुखापतग्रस्त तितास साधूच्या जागी महिला प्रीमियर लीगच्या उर्वरित हंगामासाठी वेगवान गोलंदाज जिंतीमणी कलिताची निवड केली आहे. साधू या डब्ल्यूपीएल हंगामापूर्वी दिल्ली कॅपिटल्सकडून जायण्ट्स संघात सहभागी झाली होती, परंतु २१ वर्षीय खेळाडूने आतापर्यंत एकही सामना खेळलेला नाही. कलिता मुंबई इंडियन्सकडून जायण्ट्सच्या संघात आली आहे व मुंबी संघासाठी तिने १३ डब्ल्यूपीएल सामने खेळले आहेत. २२ वर्षीय कलिता १० लाख रुपयांना जायण्ट्स संघात सहभागी झाली आहे.

### वरुण चेंडूचा जादूगार : गावस्कर



**नागपूर :** वरुण चक्रवर्ती चेंडूचा जादूगार आहे. हा जादुई फिरकीपटू आपल्या फसव्या गोलंदाजीने व अनोख्या विविधतेने फलंदाजांना गोंधळात टाकत आहे, असे दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर म्हणाले. बुधवारी येथे न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात भारताच्या विजयात चक्रवर्तीने महत्त्वाच्या क्षणी दोन बळी टिपले. वरुण थोडासा अनफिट दिसत होता, पण ते समजण्यासारखे आहे. जेव्हा फलंदाज जोरदार फटकेबाजी करत होते, तेव्हा त्याने दोन बळी टिपले, याचा इकॉनॉमी रेट खूप चांगला होता व त्याची देहबोली सुद्धा चांगली होती, असेही ते म्हणाले. मार्करने वरुणला दोन षट्कार मारले, परंतु या गोष्टीने तो अजिबात विचलित दिसत नव्हता आणि हे नेहमीच एक खूप चांगले लक्षण असते. तो एक जादूगार आहे, यात शंका नाही. तो उत्कृष्ट गोलंदाजी करतो, असेही ते म्हणाले.

### अमर्याद अधिकारांबद्दलचे सत्य स्पष्ट होईल : गंभीर

**नागुपूर :** भारतीय संघाचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी संघ निवडीमध्ये आपल्याला अमर्याद अधिकार असल्याची सर्वमान्य धारणा फेटाळून लावली आहे. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी आपले पद पंतप्रधानांनंतरची सर्वात कठीण नोकरी असल्याचे वर्णन केल्यानंतर, आपल्याच लोकांकडून विरोध होत असल्याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. स्वतः एक क्रिकेटचे मोठे चाहते असलेल्या थरूर यांनी नागपूरमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यापूर्वी गंभीरसोबत एक सेल्फी शेअर केला आणि सततच्या टीकेला सामोरे जाऊनही भारताचा हा माजी सलामीवीर ज्या पद्धतीने आपले सध्याचे काम करत आहे, त्याबद्दल कौतुक व्यक्त केले. नागपूरमध्ये, माझे जुने मित्र यांच्यासोबत एक चांगली व मनमोकळी चर्चा झाली, त्यांच्याकडे पंतप्रधानांनंतर भारतातील सर्वात कठीण नोकरी आहे! लाखो लोक दररोज त्यांच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत.

# बांगलादेशचा संघ भारतात खेळणार नाही

**बांगलादेश टी-२० विश्वचषकाच्या भूमिकेवर ठाम • आयसीसीकडून न्यायाची आशा • स्कॉटलंडच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा**

♦ **ढाका, २२ जानेवारी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) स्थळ बदलाची मागणी फेटाळल्यानंतर, बांगलादेशने गुरुवारी पुढील महिन्यात भारतात होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी आपला राष्ट्रीय संघ पाठवण्यास नकार दिला. त्यामुळे स्कॉटलंडसाठी त्या देशाची जागा घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



बांगलादेशच्या क्रिकेटपटूंचा भारतात खेळण्यास नकार

बांगलादेशने एकतर भारतात प्रवास करण्यास सहमती द्यावी किंवा बदली होण्याचा धोका पत्करावा, कारण भारतात खेळाडू, अधिकारी किंवा चाहत्यांच्या सुरक्षेला कोणताही विश्वसनीय धोका नाही.असा इशारा आयसीसीने बुधवारी दिला होता.

आपला निर्णय घेण्यासाठी देशाला गुरुवारपर्यंतची मुदत देण्यात आली होती. ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेसाठी संघांच्या क्रमवारीनुसार स्कॉटलंडचा क्रमांक लागतो.

तथापि,आयसीसीचे मूल्यांकन आम्हाला मान्य नाही, अशी घोषणा बांगलादेशचे क्रीडा सल्लागार आसिफ नझरुल यांनी केली. ही घोषणा करण्यापूर्वी नझरुल यांनी राष्ट्रीय संघाच्या खेळाडूंसोबतच्या बैठकीत ही कठोर भूमिका घेतली.

आमच्या क्रिकेटपटूंनी विश्वचषकासाठी पात्र ठरण्यासाठी कठोर परिश्रम घेतले असले तरी, भारतात खेळण्याबाबतचा सुरक्षेचा धोका कायम आहे. ही चिंता केवळ काल्पनिक विश्लेषणावर आधारित नाही, असे नझरुल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, आणि बांगलादेशचा संघ भारतात खेळणार नाही असे जाहीर केले.

भारत आमच्या संपूर्ण संघाची, पत्रकारांची आणि प्रेक्षकांची सुरक्षा सुनिश्चित करू शकतात याची आम्हाला खात्री नाही, असेही ते म्हणाले.

आम्ही अजूनही आशा सोडलेली नाही; आमचा संघ तयार आहे. आयसीसी आमच्या खऱ्या सुरक्षा धोक्यांचा विचार करून आम्हाला श्रीलंकेत खेळण्याची परवानगी देऊन न्याय देईल शी आम्हाला अपेक्षा आहे, असेही ते म्हणाले.

> **खेळाडूंना भेटून निर्णय**
>
> आम्ही खेळाडूंना भेटून या निर्णयामागील संदर्भ आणि सरकारची भूमिका समजावून सांगितली. हा एक गोपनीय संवाद असल्याने, खेळाडूंना मोकळेपणाने बोलता यावे यासाठी त्यांनी काय सांगितले याचे तपशील उघड केले जाणार नाहीत, परंतु त्यांना परिस्थिती समजली असे वाटले, असे नझरुल यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. बांगलादेश हा जवळपास २०० दशलक्ष क्रिकेटप्रेमी असलेला एक मोठा लोकसंख्या असलेला देश आहे. जर आयसीसीने आम्हाला सामावून घेतले नाही, तर ते जागतिक क्रिकेटसाठी एक मोठे नुकसान आणि यजमान देशाचे अपयश ठरेल,'' असे ते म्हणाले. दरम्यान, माजी कर्णधार तमीम इक्बाल आणि सध्याचा कसोटी कर्णधार नजमुल हुसेन शांतो या प्रमुख खेळाडूंनी बीसीबी आणि सरकार या दोन्हीकडील प्रशासकांनी क्रिकेटपटूंच्या कल्याणाला प्राधान्य द्यावे अशी मागणी केली होती.

बांगलादेशला भारतात चार सामने खेळायचे आहेत (तीन कोलकातामध्ये आणि एक मुंबईत). बीसीसीआयच्या सूचनेनुसार वेगवान गोलंदाज मुस्तफिझुर रहमानला आयपीएलमधून बाहेर काढल्यानंतर देशाने सुरक्षेच्या चिंतेचा मुद्दा उपस्थित केला होता.

आयसीसीने बुधवारी बांगलादेशच्या सुरक्षाविषयक चिंता स्वीकारण्यास नकार दिला. बांगलादेश क्रिकेट मंडळ स्पर्धेतील आपला सहभाग एका 'एका खेळाडूच्या देशांतर्गत लीगमध्ये सहभागाशी संबंधित एकाच, वेगळ्या व असंबंधित घटनेशी वारंवार जोडून पाहत आहे, असे आयसीसीने म्हटले आहे.

बांगलादेश संघाच्या सुरक्षेला गंभीरपणे बाधा पोहोचवणारे कोणतेही स्वतंत्र सुरक्षा निष्कर्ष नसल्यामुळे आयसीसी सामने स्थलांतरित करू शकत नाही, असे आयसीसीने म्हटले.

असे केल्यास इतर संघ आणि जगभरातील चाहत्यांसाठी महत्त्वपूर्ण लॉजिस्टिक आणि वेळापत्रकाशी संबंधित परिणाम होतील व त्या संबंधित आव्हाने सुद्धा निर्माण होतील, त्यामुळे आयसीसी प्रशासनाची तटस्थता, निष्पक्षता आणि अखंडता धोक्यात येईल, असेही त्यात म्हटले. (वृत्तसंस्था)



रिंकू सिंगचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये स्ट्राइक रेट १९०.९२ आहे. त्याच्या २० चेंडूंतील नाबाद ४४ धावांनी बुधवारी भारताला विजय मिळवून दिला

# रिंकू सिंग फिनिशर म्हणून महत्त्वपूर्ण

♦ **रायपूर, २२ जानेवारी**

रिंकू सिंगने भारताचा फिनिशर म्हणून आपले महत्त्व सिद्ध केले व तो या भूमिकेतच अधिक रमतो. काही महिन्यांच्या अंतरावर टी-२० विश्वचषक आहे, त्या दृष्टीने त्याने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात कमालीची कामगिरी केली, त्यालरा डेथ ओव्हर्समध्ये प्रभाव पाडण्यासाठी जास्त वेळ लागला नाही.

रिंकू अजिबूत नम्रता दाखवत नाही. तो क्वचितच स्कूप, रॅम्प किंवा रिव्हर्स हिट्स खेळतो, असे नागपूरमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात ३५ चेंडूत ८४ धावा करणारा अभिषेक शर्मा म्हणाला. रिंकू सिंगचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये स्ट्राइक रेट १९०.९२ आहे. हेच रिंकू सिंगलाही लागू होते,. त्याच्या २० चेंडूंतील नाबाद ४४ धावांनी बुधवारी भारताच्या डावाला शानदार शेवट दिला. सप्टेंबरमध्ये आशिया चषक जिंकणाऱ्या स्पर्धेत त्याने खेळलेल्या एकमेव चेंडूवर चौकार मारल्यानंतर, रिंकू ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत बहुतेक वेळा बेंचवरच बसून होता. तो एका सामन्यात खेळला, परंतु त्यात त्याला फलंदाजीची संधी मिळाली नाही. ८ नोव्हेंबर रोजी ब्रिस्बेनमध्ये झालेला तो सामना त्याचा भारताकडून खेळलेला शेवटचा सामना होता, जोपर्यंत त्याने बुधवारी रात्री २० चेंडूंमध्ये नाबाद ४४ धावांची सामना फिरवणारी खेळी करून शानदार पुनरागमन केले. त्याच्या खेळीमुळे न्यूझीलंड संघासाठी २३८ धावांचे लक्ष्य ावाक्याबाहेरचे ठरले.

यापूर्वी, शुभमन गिल सलामीच्या फळीत स्थिरावल्यामुळे, रिंकूला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देणे कठीण झाले होते. (वृत्तसंस्था)




# राज्यस्तरीय मर्दानी कलेत जिजाऊ गुरुकुल खांडवीला उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ जानेवारी-**

भंडारा जिल्हा अष्टे डू मर्दानी आखाडा असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी भवन, पवनी (जि. भंडारा) येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय शिवकालीन अष्टे डू मर्दानी आखाडा स्पर्धेत जिजाऊ गुरुकुल खांडवी येथील विद्यार्थ्यांनी १४ व १७ वर्षांखालील गटात उपविजेतेपद संपादिले.

या प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये जिजाऊ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याची, शिस्तीची आणि मर्दानी कलेतील उत्कृष्टतेची छाप उमटवत ही कामगरी केली. त्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिवा वर्षा घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम, फिजिकल कोच जे. बी. शिंदे, क्रीडाप्रमुख गणेश वडेकर, प्रशिक्षक अय्याज शेख आदींनी अभिनंदन व कौतुक करीत व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी केलेले विद्यार्थी :** १४ वर्षांखालील : राजवर्धन पारेकर. १७ वर्षांखालील : प्रथमेश भजनावळे, आर्यन गाडेकर, स्वागत शेळके.

# नवीन वर्षात सोलापूरला दोन आंतरराज्य क्रिकेट सामने

**पार्कवर आजपासून महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा; ३० जानेवारीला पाँडिचेरीविरुद्ध सामना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर शुक्रवारपासून महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा असा २३ वर्षाखालील मुलांच्या कर्नल सी के नायुडू चषकातील एलिट क गटाचा चौथ्या फेरीचा सामना सुरू होणार असून जिल्हा क्रिकेट संघटनेचे वतीने संपूर्ण जय्यत तयारी करण्यात आली असून गुरुवारी शेवटचा सराव पार पडला. या सामन्यापाठोपाठ महाराष्ट्राचा दुसरा सामना देखील ३० जानेवारीपासून पाँडिचेरी संघासोबत होणार असल्याचे जिल्हा क्रिकेट संघटनेचे वतीने कळविण्यात आले आहे.



आज होणारा सामना हा महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असून जिंकणे प्रथम उद्दिष्ट असणार आहे तसेच जास्तीत जास्त गुण मिळवणे हा उद्देश.

या चषक/स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे सामन्यात नाणेफेक न होता पाहुण्या संघाला ते प्रथम गोलंदाजी करणार की फलंदाजी हे ठरविण्याचा अधिकार. त्यामुळे महाराष्ट्राच्या संघाला घरच्या मैदानावर व उत्तम खेळपट्टीवर काय करावे लागणार हे पाहुणा संघ ठरविणार.

मागील ३ सामन्यात १ विजयासह २८ गुण मिळवून महाराष्ट्र संघ गटात संयुक्त दुसऱ्या (३)क्रमांकावर असून तिन्ही सामन्यात उत्तम फलंदाजी केलेला नीरज जोशी (२ शतकासह ३३३ धावा) याने रणजी सामन्यात पुण्यात पदार्पण केले असल्याने त्याची उणीव भरून काढणे हे कप्तान सचिन धस चे कौशल्यावर अवलंबून असणार आहे. सचिन धस ने देखील कप्तान पदाला साजेशी अशी फलंदाजी करत १ शतक, २ अर्धशतक सह २६९ धावा केल्या आहेत. पाठोपाठ अनिरुद्ध साबळे (एकेक शतक, अर्धशतक) २४२ धावा तर भरवशाचा फलंदाज दिग्विजय पाटील ने देखील (एकेक शतक अर्धशतक) १८३ धावा केल्या आहेत.

गोलंदाजीची बाजू देखील राजवर्धन हंगरगेकर आणि शुभम मेड यांनी प्रत्येकी १० बळी घेत उत्तमपणे सांभाळली असून वैभव दारकुंडे ८ बळी मिळविण्यात यशस्वी झाला आहे. महाराष्ट्र संघाला प्रशिक्षक माजी रणजी खेळाडू निरंजन गोडबोले यांचे उत्तम मार्गदर्शन लाभत असून त्यांचे सोबतीला फलंदाजी प्रशिक्षक म्हणून माजी रणजी कर्णधार निखिल पराडकर, गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून माजी रणजी खेळाडू अनुपम संकलेचा, क्षेत्ररक्षण प्रशिक्षक मोहसीन सय्यद यांचे देखील सहकार्य लाभत आहे. संघासमवेत फिजियो म्हणून डॉ.संदीप गायकवाड तर स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग कोच विनोद यादव तसेच मसाजर म्हणून प्रीतम उमतर आणि व्यवस्थापक म्हणून मोहम्मद पूनावाला तर सचिन माने हे व्हिडिओ ॲनलिस्ट आणि अक्षय साखरे साईड आर्मर म्हणून आहेत. या सामन्यासाठी अँटी करप्शन ऑफिसर म्हणून सुयोग चौधरी काम पाहणार आहेत.



### नागम्मा बजे हिची खेलो इंडिया गेम्ससाठी निवड

**अक्कलकोट दि २२ जानेवारी-**

तालुक्यातील सदलापूर येथील बांबू उडी खेळाडू नागम्मा रवींद्र बजे हिची खेलो इंडिया गेम्ससाठी निवड झाली आहे. १५ जानेवारी रोजी मेंगलोर अल्वास येथे झालेल्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी गेम्स मध्ये अल्फोन्सा कॉलेज पाला म हात्मा गांधी युनिव्हर्सिटी कडून नागम्मा हिने सहभाग घेतला होता. त्या खेळात बेस्ट ऑफ सिक्स मध्ये नाव पटकावून खेलो इंडिया गेम्स साठी निवड झाली. नगमा ही आता तात्या टोपे स्टेडियम भोपाल मध्य प्रदेश येथे प्रशिक्षण घेत आहे. तिला प्रशिक्षक घनश्याम यादव आणि आंतरराष्ट्रीय क्युबा देशातील कोच मार्गदर्शन करत आहेत.

# खुल्या गटात दहा वर्षीय श्रेयस कुदळे विजेता

**पांडुरंग पैकेकरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा**

**13 वर्षाखालील गटात समरजीत देशमुख अजिंक्य**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

सुंदर मल्टीपर्पज हॉल येथे झालेल्या व संतोष पैकेकरी यांनी वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रयोजन केलेल्या पांडुरंग पैकेकरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटातले पाहिले तीन क्रमांक श्रेयस् कुदळे, अधिराज म्हेत्रे,देवदत्त पटवर्धन या १० वर्षीय खेळाडूंनी पटकावले. वयाने व अनुभवाने वरीष्ठ असलेल्या अनेक खेळाडूंवर मात करीत त्यांनी हा इतिहास घडवला आहे

या स्पर्धेचा बक्षीस समारंभ प्राईड हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुमित मोरे, सुशीलकुमार शिंदे भा.वी.इंग्लिश मिडीयमचे अध्यक्ष संतोष पैकेकरी, मिराबाई पैकेकरी, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन सचिव शरद नाईक पूनम पैकेकरी, विठ्ठल पैकेकरी, गुरुनाथ सोनटकले, सुनंदा सोनटकले, प्रशांत पिसे, सचिन चव्हाण तसेच विजयी बाल खेळाडूंच्या माता मोनिका कुदळे, धनश्री पटवर्धन यांच्या हस्ते संपन्न झाला.

वरील सर्व विजयी खेळाडूंचे अभिनंदन करत कौतुक संस्थेचे अध्यक्ष मधुकर नाईक,अर्जुन कदम,शिरीष नाईक, नीता तांबोळकर, राजु रजपूत, युवराज पंतुवले, शैलेंद्र नाईक, नितीन बोंडगे व अनिरुद्ध नाईक यांनी केले आहे. ही स्पर्धा श्री रमा जगदीश बहुद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने संपन्न झाली.

**गुणानुक्रमे अंतिम निकाल असे**

**सहा वर्षाखालील :** ऋषभ पमनानी, श्रद्धा हाके, ऋषभ कोरे, आरव पाटील, श्लोक भोसले, नीव नावंदर, अंश बत्तीन, श्रवण हक्के, आहान चंदनशिवे, समर्थ पोवाडे, श्रीपाद मांडवे

**नऊ वर्षाखालील:** नमन रंगरेज, विराज धोंगडे, आर्यन गांधी, श्रेयस हाके, आरव चव्हाण, प्रज्ञेश काबरा, सिद्धार्थ शेळके, आयुष बडवणे, हर्षा क्षीरसागर, श्लोक सुरवसे, श्रेया पैकेकरी

**दहा वर्षाखालील :** नैतिक होटकर, प्रज्ञेश महाडकर, प्रथम मुदगी, शशांक जमादार, हर्ष मुसळे, आदित्य जानगवळी, ओजस्वी बोराळे, श्लोक सदाफुले, मयूर स्वामी, स्वनिक खडतकर, कसबे समृद्धी.

**तेरा वर्षाखालील :** समरजीत देशमुख, वेदांत मुसळे, अभिर देशपांडे, मल्हार वाघे, विहान कोंगारी, आयुष्य जानगवळी, सुभान शेख, हर्षिता भोसले, वेदांत पवार, प्रज्वल वाघमारे, विहानराज पतकी, यशवर्धन मोरे, सृष्टी मुसळे, रामकृष्ण बडवणे, श्रीरंग पैकेकरी, शिवतेज मोटे, सम्यक सावंत, अदिती इनानी, वेदांत बिटला, श्लोक चौधरी, प्रतिक हलमल्ली.

**१९ वर्षाखालील :** सार्थक उंबरे, गणेश पवार, आकाश मगई, नागेश राजमाने, प्रथमेश रेवतगाव, श्रेयस इंगळे, विराज बुरले, अब्बास पाटील, वैष्णवी जाधव,, गौरव पाटील, सुप्रीत घनाते, वर्षा काळे, तारक चिंचोळकर, साक्षी पाटील, अथर्व बसर्गीकर.

**खुला :** श्रेयस कुदळे, आधिराज म्हेत्रे, देवदत्त पटवर्धन, स्वप्निल हदगल, आरुष कंदले, चंद्रशेखर बसर्गीकर, अभिजीत संगा, नियन कंदीकटला, प्रांजल वाघमारे, सानिध्य जमादार, निनाद कुलकर्णी.



# बार्शीची राष्ट्रीय सुवर्णपदक विजेती बुद्धिबळपटू सान्वी गोरे हिचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२२ जानेवारी**

रांची (झारखंड) येथे झालेल्या ६९व्या शालेय राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या ७ वी मध्ये शिकणाऱ्या सान्वी दत्तात्रय गोरे हिने सुवर्ण पदक पटकाविले. तसेच सांघिक स्पर्धेत महाराष्ट्रास उपविजेतेपद मिळवून दिले. या यशामध्ये सान्वीच्या पालकांचाही खूप मोठा वाटा आहे. तिच्या या कामगरीबद्दल वखारिया विद्यालय उपळे दु.चे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या हस्ते तिचा सत्कार केला. त्यावेळी महाराष्ट्र विद्यालयातील बुद्धिबळ खेळाचे संघ व्यवस्थापक अतुल नलगे सान्वीचे आजोबा, वडील, आई, आजी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दक्षिणमध्ये दिग्गजांची उमेदवारी अवैद्य

## उमेदवारी मिळविण्यात आमदार देशमुख समर्थकांची बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२२ जानेवारी**

दक्षिणमधील जिल्हा परीषदेच्या ६ जागांसाठी ७३ तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी १४५ उमेदवारी अर्ज दाखल झाली आहेत. या अर्जांची छाननी गुरूवारी झाली. भाजपाकडून इच्छुक उमेदवारांना पक्षाकडून दोन दोन एबी फॉर्म देण्यात आल्याने छाननीकडे सर्वांचे लक्ष लागून राहीले होते.



यावेळी आमदार सुभाष देशमुख व माजी आमदार दिलीप माने यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. माने व देशमुख गटाकडून एबी फॉर्म मिळाल्यानंतर अधिकृत उमेदवारी कोणाची असणार? याविषयी चर्चा सुरू होती.

छाननी दरम्यान निवडणुक निर्णय अधिकारी अंजली मरोड यांनी भाजपाचे जिल्हाध्यक्ष यांच्याकडून उमेदवारांच्या नावांची यादी मागितली. त्यावेळी माने गटातील अनेक उमेदवारांची नावे गायब झाली. तर देशमुख गटाच्या उमेदवारांची नावे अधिकृत करण्यात आली. त्यामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतलेल्या हत्तूर गटातील माने गटातील माजी सभापती इंदुमती अलगोंडा पाटील, माजी जिल्हा परीषद सदस्य सुरेश हसापूरे व सिध्देश्वर साखर कारखान्याचे संचालक शिवानंद पाटील यांचे चिरंजिव यांची उमेदवारी गायब होऊन देशमुख गटातील उज्वला हविनाळे, पंचप्पा धनशेटी व संदीप टेळे यांची नावे अंतीम करण्यात आली. भाजपाच्या उमेदवाराला भाजपा इच्छुकांकडून हरकत घेण्यात आली.

दक्षिणमधील तीन जिल्हा परीषद व सहा पंचायत समीती गणातील उमेदवार निवडीचा अधिकार आमदार देशमुख यांना मिळाला. त्यानुसार सर्व उमेदवार निवडण्यात आले. मात्र मंद्रूप पंचायत समिती गणासाठी मळसिध्द मुगळे, रेवणसिध्द मेंडगुदले व हर्षवर्धन देशमुख यांच्यामध्ये चुरस होती. देशमुख यांच्याकडे एबी फॉर्म नसल्यामुळे त्यांचा अर्ज अवैद्य ठरला.

तर मुगळे व मेंडगुदले यांच्या अर्जावरील हरकतीवर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड यांनी मुगळे यांची उमेदवारी वैद्य ठरविले.

त्यामुळे आमदार कल्याणशेटी गटातील मुगळे हे एकमेव उमेदवार दक्षिणच्या रिंगणात राहीले. आमदार देशमुख गटाकडून मुगळे यांची उमेदवारी अवैद्य ठरविण्यासाठी ताकद लावण्यात आली. मात्र मुगळे यांनीही साम, दाम व दंड वापरून अखेरपर्यंत उमेदवारी मिळविण्यात यशस्वी झाले. त्यामुळे मुगळे यांची उमेदवारी आमदार देशमुख गटासाठी धक्का मानण्यात येत आहे. भाजपाकडून अधिक मतदान देणार्या गावातील उमेदवारांना डावलण्यात आल्याने मंद्रुप, भंडारकवठे व हत्तूर गावाम धून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. २७ जानेवारीला अर्ज माघार घेण्याचा अखेरचा दिवस असल्याने त्याच दिवशी अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.







# माजी पंतप्रधानाच्या दौऱ्यामुळे 'चंद्रभागा' झाली चकाचक

● ऐरव्ही फेरीवाल्यांच्या गर्दीमुळे साधे चालणे देखील मुश्किल होत असलेला मंदिर परिसर देखील घेत होता मोकळा श्वास..!

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ जानेवारी -**

देशाचे माजी पंतप्रधान एच.डी.दैवेगौडा यांचा गुरुवारी पंढरपूर दौरा होता. विठ्ठलाचे दर्शन तसेच चंद्रभागा नदीची पूजा त्यांच्या हस्ते करण्यात आल्या मुळे येथील चंद्रभागा नदीची सकाळ पासूनच पालिकेच्या वतीने स्वच्छता करण्यात आली. त्यामुळे नियमित प्रदक्षिणा करणाऱ्या मंडळींना चंद्रभागेचे स्वच्छ वाळवंट पाहून आश्चर्याचा सुखद धक्का बसल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

देशाचे माजी पंतप्रधान एच.डी.देवेगौडा यांनी पंढरपूरात येवून आज विठुरायाचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिरसमितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज ओसेकर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी माजी पंतप्रधान देवेगौडा यांच्या समवेत त्यांचे कुटुंबिय देखील उपस्थित होते. दरम्यान देवेगौडा यांच्या पंढरपूर भेटीत चंद्रभागेच्या वाळवंटाला देखील ते भेट देणार होते. त्यामुळे पालिकेच्या वतीने गुरुवारी सकाळ पासूनच चंद्रभागेच्या स्वच्छतेचे काम हाती घेण्यात आलेले होते. वाळवंटाची स्वच्छता तसेच नदीपात्रातील कपडे,निर्माल्य, आदींची देखील स्वच्छता करण्यात आली. या बरोबरच पात्राच्या तिरावरील शेवाळे, गाळ सदृश्य माती देखील काढण्यात आली. वाळवंट स्वच्छतेसाठी सफाई कर्मचाऱ्यांबरोबरच साठलेला कचरा उचलण्यासाठी दोन जेसीबी, पोकलँन तसेच टिपरची देखील खास व्यवस्था करण्यात आलेली होती. सकाळ पासुन दुपार पर्यंत हे काम सलग सुरु असल्याचे दिसत होते. सुमारे आठ ते दहा टिपर कचरा उचलण्यात आल्याची माहिती स्वच्छतेच्या कामावरील अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

**मंदिर परिसर देखील स्वच्छ आणि दिसत होता मोकळा :** ऐरव्ही येथील विठ्ठल मंदिर परिसरात फेरीवाले, रस्त्याच्या कडेला बसुन विक्री करणारी मंडळी, हातगाड्यावरुन विक्री करणारे लोक यांची मांदियाळी असते. त्यामुळे मंदिर परिसरातील कायमस्वरुपी दुकानदारांना याचा त्रास सहन करावा लागत असतो. पालिका, पोलिस यांचे व्हीआयपी, व्हीव्हीआयपी मंडळी येणार असतील तरच मंदिर परिसरातील अशा फेरीवाले, विक्रेते लोकांवर कारवाईचा बडगा उगारला जातो. गुरुवारी देखील माजी पंतप्रधान देवेगौडा येणार म्हणून मंदिर परिसर मोकळा करण्यात आलेला होता. ऐरव्ही गर्दी तसेच अशा फेरीवाले मंडळींच्या अतिक्रमणामुळे मंदिर परिसरातून चालणे देखील शक्य होत नाही. मात्र आज मंदिर परिसर अगदी मोकळा वाटत होता. शहरात देखील जागोजागी तसेच चंद्रभागेच्या वाळवंटातसुध्दा माजी पंतप्रधानाच्या दौऱ्यामुळे पोलिसाचा फौजफाटा दिसत होता.



# उंबरेपागे विद्यालयाचा चित्रकला ग्रेड परिक्षेचा शंभर टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२३ जानेवारी-**

उंबरे पागे येथील विद्या विकास मंदिर या प्रशालेचा चित्रकला ग्रेड परिक्षेचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

गेल्या अनेक वर्षांची ही उज्वल यशाची परंपरा यावर्षीही जोपासल्याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षक संजय भोसले यांचे संस्थाध्यक्ष राजाराम नरसाळे, ज्ञानदेव ढोबळे, सचिव बी. बी.पाटील, मुख्याध्यापक एस.के. पाटील व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. ए ग्रेड मध्ये आठ विद्यार्थी, बी ग्रेडमध्ये तेरा विद्यार्थी, सी ग्रेड मध्ये सोळा विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. एलिमेंटरीमध्ये तृप्ती तळेकर, प्रतिक्षा मुळे, देवश्री तळेकर, प्रियंका कदम, वैष्णवी भोसले, अक्षरा कानगुडे, ज्ञानेश्वरी पवार, दुर्गा कानगुडे, पायल ढोबळे, सायली इंगळे, सिध्दी कानगुडे, श्रेया गोरे तर इंटरमिजिएट परीक्षेत आकांक्षा भोसले, सानवी कानगुडे, सृष्टी पाटील, वैष्णवी कानगुडे, वैष्णवी वावरे, सोनाली हुबाले, वैष्णवी धातकुडे, गौरी सुतार, प्रगती मुजमुले या विद्यार्थांनी यश मिळवले. सर्वांना चित्रकला शिक्षक संजय भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

# मुलींना मार्गदर्शन, आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ जानेवारी-**



बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मौजे कासारवाडी येथे सुरु असलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा आज पाचवा दिवस अत्यंत उत्साहपूर्ण व सामाजिक उपयुक्त उपक्रमांनी संपन्न झाला.

आजच्या दिवशी दोन महत्त्वाचे आरोग्यविषयक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडले. यामध्ये किशोरवयीन मुलींसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यक्रम तसेच गावासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर यांचा समावेश होता. किशोरवयीन मुलींसाठी आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात डॉ. विद्याराणी टिक्के यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी किशोरवयातील शारीरिक व मानसिक बदल, संतुलित आहार, वैयक्तिक स्वच्छता, नियमित व्यायाम, योग्य झोप तसेच मानसिक आरोग्याचे महत्त्व विशद केले. मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची काळजी व स्वच्छतेबाबतही त्यांनी उपयुक्त मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा परिषद शाळेच्या दरेकर मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. शिवानी पवार हिने तर आभार वैष्णवी जाधव हिने मानले. यानंतर गावासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. ए. ढगे यांनी केले. शिबिराचे उद्घाटन सरपंच सौ. अश्विनी मंडलिक यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. के. एम. माळी यांनी केले, तर आभार कु. शिवानी पवार हिने मानले. या आरोग्य शिबिरात एकूण ११८ नागरिक व प्राथमिक शाळेतील ७३ विद्यार्थी यांनी आरोग्य तपासणी करुन घेतली. यामध्ये रक्तदाब, रक्तातील साखर, वजन-उंची (इचख) तसेच सर्वसाधारण वैद्यकीय तपासणी करण्यात आली. जगदाळे मामा हॉस्पिटल येथील डॉक्टरांनी वैद्यकीय सेवा दिली. तपासणीदरम्यान काही नागरिकांमध्ये रक्तदाब व साखरेचे प्रमाण आढळून आल्याने त्यांना पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला.

## महत्वाचे...



### सामाजिक कार्यकर्ते अझहर शेख यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २२ जानेवारी**

अक्कलकोट शहरातील नाईकवाडी गल्लीतील सामाजिक कार्यकर्ते अझहर शेख यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक संघटनांच्या वतीने तसेच नेते मंडळींच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना नेते व समता परिषदेचे माजी शहर अध्यक्ष मैनोद्दीन कोरबू, भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष ननू कोरबू, शिवसेना युवा नेते मुबारक कोरबू, पत्रकार स्वामीराव गायकवाड, नबीलाल नाईकवाडी, मोदीन कोरबू, कदीर नाईकवाडी, मक्तुम नाईकवाडी, ईफ्तेकार कोरबू ,बाबा नाईकवाडी, टिल्लू बुटलेर, सुभान नाईक, समीर नाईक , रईस शेख, सोहेल बुटलेर, सलीम शेख, सुजीन शेख, शकील नाईकवाडी आदिसह नाईकवाडी गल्ली यंग कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी शेख यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

### 'चांदापुरी'च्या ओंकारने १५ डिसेंबरपर्यंतचे बील केले जमा

**पिलीव, दि. २१ जानेवारी-**



माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याची १५ डिसेंबरपर्यंत गाळपास आलेल्या ऊसाची बिले ३ हजार ५० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असल्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी सांगितले. शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासना प्रमाणे बिले देण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. कारखाना बंद असल्यावर ऊस गाळपाची समस्या निर्माण होते.काबाडकष्ट करून शेतकऱ्यांनी मेहनत घेऊन जोपासलेल्या ऊसाला चांगला दर मिळणे तसेच गाळपास गेलेल्या ऊसाची बिले वेळेत मिळणे आवश्यक आहे.खरेतर चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी हे काम केले आहे, अशी माहिती शेतकरी अप्पासाहेब नाईकनवरे यांनी दिली.

## निधन वृत्त...



### गोविंद कुलकर्णी

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेतील निवृत्त कर्मचारी गोविंद लक्ष्मण कुलकर्णी (वय ७९) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजय, दोन मुले, दोन सूना, दोन नाती असा परिवार आहे.



# 'मराठी'चे संवर्धन काळाची गरज : प्रा.पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ जानेवारी -**

मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे. तिचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे. कारण कोणतीही भाषा ही संस्कृतीचे जतन करत असते. मराठीच्या संवर्धनासाठी तिचा दैनंदिन व्यवहारामध्ये योग्य वापर व्हावा. आज मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, तिचे संवर्धन होणे काळाची गरज असल्याचे मत श्री संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढाचे प्रा.डॉ.राजकुमार पवार यांनी व्यक्त केले.

ते सांगोला महाविद्यालयामध्ये मराठी विभाग, संगणक विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांचे संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, प्रा.डॉ.रामचंद्र पवार, प्रा.डॉ.आर.आर. ताटे उपस्थित होते. याप्रसंगी नंदा गायकवाड, अरुण बंडगर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सांस्कृतिक, कला व क्रीडा क्षेत्रामध्ये यश मिळविल्याबद्दल सेजल कवठेकर, तृप्ती सूर्यगंघ, प्रतीक्षा माने, सदानंद गजगे, प्रणव कुरूलकर, संदीप हिंगसे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पाहुण्यांचा परिचय योगिता कांबळे हिने करुन दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संतोष लोंढे यांनी केले.आभार श्रुतिका मसरे हिने मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ. नवनाथ शिंदे, प्रा.डॉ.विद्या जाधव, प्रा.ए.डी. माने, प्रा.डॉ.एम.डी.वेदपाठक , प्रा.प्राप्ती लामगुंडे, प्र.अधिक्षक विलास माने, लिपीक बापू इंगोले, राहुल ढोले, बाबू इंगोले, अमर केदार, सुनिल शिंदे व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

### बार्शीत गणेश जयंतीनिमित्त महाप्रसाद

**बार्शी, दि. २२ जानेवारी**

विविध गणेश मंडळांत आज गणेश जयंतीनिमित्त मंदिरांमध्ये श्री गणेशाची आरती करुन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रसन्नदाता गणेश मंडळ, चिंतामणी गणेश मंडळ, भवानी पेठ गणेश मंडळ, धर्माधिकारी प्लॉटमधील पेशवे युवामंच गणेश मंदिर, श्री सौख्यदाता गणेश प्रतिष्ठान आदी ठिकाणी श्री गणेश जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी श्री गणेशाचे भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर पदाधिकारी व मित्रमंडळींनी विशेष परिश्रम घेतले. भाविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे गणेश जयंती उत्सव भक्तिभावात व आनंदात यशस्वीपणे पार पडला.





# कै.राजकुमार गाडे यांच्या स्मरणार्थ आपुलकी प्रतिष्ठानला हॉस्पिटल बेड भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ जानेवारी-**

सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानने गतवर्षीपासून रुग्णांच्या सोयीसाठी ऑक्सिजन मशीन, हॉस्पिटल बेड, पाण्याची गादी आदी साहित्य अल्प दरात उपलब्ध करून दिले आहे.

आणखी कुठल्या रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी अभिनंदन गाडे यांनी पिताश्री कै.राजकुमार गाडे यांच्या स्मरणार्थ १ बेड त्याचबरोबर शिक्षक निसार इनामदार यांनी १ बेड प्रतिष्ठानला गुरुवारी भेट दिले. यावेळी आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, रमेश देशपांडे, महादेव दिवटे, सुरेश चौगुले, अच्युत फुले, डॉ. सागर कांबळे, दत्तात्रय खटकाळे, श्रीकांत देशपांडे, अरविंद डोंबे, संग्रामसिंह गायकवाड, उमेश व्हटे, प्रतिक गाडे, विक्रम अडसूळ उपस्थित होते.

यावेळी आपुलकीचे सदस्य श्रीकांत देशपांडे यांनी आपल्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त प्रतिष्ठानला २ हजार १६५ रुपयांची देणगी दिली.

# डेप्युटी कलेक्टर पवन मंगरुळे यांची द.ह.कवठेकर प्रशालेस सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ जानेवारी -**

येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द. ह.कवठेकर प्रशालेचे माजी विद्यार्थी पवन मंगरूळे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत नुकतीच डेप्युटी कलेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांनी नुकतीच आपल्या द.ह.कवठेकर प्रशालेस खास सदिच्छा भेट दिली.



द.ह.कवठेकर प्रशालेतून पवन मंगरुळे यांनी इयत्ता दहावीची परीक्षा सन २०१३ मध्ये उत्तीर्ण केली व त्यानंतर त्यांनी अकलूज येथून बीएससी ॲग्री केले. पुढे राहुरी येथे त्यांनी एम.एस.सी.ॲग्री करीत असताना एमपीएससी परीक्षेचा अभ्यास केला. प्रथम त्यांची बालसंगोपन विभागाकडे वर्ग दोन अधिकारी म्हणून नियुक्ती झाली व तदनंतरच्या परीक्षेत त्यांची डेप्युटी कलेक्टर प्रथम वर्ग अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे पाचवी ते दहावीचे शिक्षण याच प्रशालेत झाले. यावेळी त्यांनी शाळेतील आपल्या आठवणींना उजाळा दिला व आपल्या सर्व विषय शिक्षकांच्या भेटी घेतल्या. शाळेने त्यावेळी केलेल्या संस्काराबाबत व राबविलेल्या विविध उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी एमपीएससी स्पर्धा परीक्षा याबाबत मार्गदर्शन केले व मुलांचा आत्मविश्वास जागृत केला. त्यांनी परीक्षेतील हे यश स्वयंअध्ययनावर प्राप्त केले.

घरची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असताना देखील त्यावर मात करून त्यांनी हे यश प्राप्त केले त्याबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.एम.कुलकर्णी यांनी डेप्युटी कलेक्टर पवन मंगरुळे यांचा सत्कार केला.

यावेळी संस्थेचे पदाधिकारी एस.पी. कुलकर्णी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सेवानिवृत्त उप मुख्याध्यापक एम.आर. मुंढे, पर्यवेक्षक आर. एस. कुलकर्णी, ज्येष्ठ शिक्षक प्रशांत मोरे, समीर दिवाण आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# बस प्रवासादरम्यान ९.३७ लाखांचा ऐवज चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ जानेवारी**

हिंजवडी-पुणे-बार्शी या बस प्रवासादरम्यान बार्शी येथील प्रवाशाचा सुमारे ९.३७ लाख रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रमेश बजरंग चौरे (वय ६०, सेवानिवृत्त क्लार्क, रा. पराग इस्टेट, उपळाई रोड, बार्शी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. १९ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता हिंजवडी (पुणे) येथून बार्शीकडे प्रवास करत असताना ते दि. २० जानेवारी रोजी सकाळी ७ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात इसमाने सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेली आहे. चोरीस गेलेल्या ऐवजात एकूण अंदाजे ९ लाख ३७ हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असून, त्यामध्ये ३ लाख रुपये किंमतीचा सोन्याचा राणी हार, ८४ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे झुबे, ४८ हजार रुपये किंमतीची सोन्याची अंगठी, १५ हजार रुपये किंमतीचे चांदीचे ४ भार वजनाचे पायातील पैंजण, १,३५,००० रुपये किंमतीचा सोन्यांचा हार, १,५०,००० रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण, १ लाख रुपये किंमतीच्या प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या चार अंगठ्या, २० हजार रुपये किंमतीची ४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, ४ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, ३ ग्रॅम वजनाची सोन्याच्या मण्यांची ठुसी, ५० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ९ लाख ३७ हजार रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# महापौर पदाचे निघाले आरक्षण; कोण होणार विराजमान?


- विनायक कोंड्याल, नरेंद्र काळे, डॉ.किरण देशमुख, अनंत जाधव, शिवानंद पाटील, सात्विक बडवे, रंजीता चाकोते यांच्या नावांची चर्चा
- महापौर निवडीसाठी विशेष सभेची तारीख ठरणार लवकरच
- बैठकीपूर्वी किमान तीन दिवस अगोदर करावे लागणार अर्ज सादर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२२ जानेवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतर महापौर पदासाठी खुला प्रवर्ग ओपन आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. मागील निवडणुकीत ४९ जागा जिंकलेल्या भाजपाने यंदा तब्बल ८७ जागा पटकावल्या. महापौर पद हे खुला प्रवर्गासाठी आरक्षित झाले असून या पदासाठी मोठ्या प्रमाणात रस्सीखेच होणार असल्याचे चित्र आहे.

गेल्या चार टर्मपासून नगरसेवक राहिलेले विनायक कोंड्याल यांनी यंदा सर्वाधिक मताधिक्याने निवडून आले आहेत. त्यामुळे महापौर पदासाठी त्यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. आ.विजयकुमार देशमुख यांचे सुपुत्र डॉ.किरण देशमुख, नरेंद्र काळे, अनंत जाधव, शिवानंद पाटील, सात्विक बडवे, रंजीता चाकोते यांच्याही नावांची चर्चा आहे. महापौर पदासाठी इच्छुक असलेल्यांनी आपापल्या गॉडफादरकडून फिल्डिंग लावली आहे. सामाजिक समीकरणे, राजकीय गणिते यावरच आता महापौर पदाचा उमेदवार ठरणार असल्याचे दिसून येते. दरम्यान, आ.विजय देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे यांच्यात समन्वय साधून महापौर पदाचे नाव ठरविण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते.

विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त आणि सोलापूर महानगरपालिका नगरसचिव यांच्याशी विचार विनिमय केल्यानंतर पोट नियम (१) अन्वये विशेष सभा बैठक बोलाविले जाणार आहे. या बैठकीच्या किमान पूर्ण तीन दिवस आधी या पदासाठी नामनिर्देशन सादर करता येईल, अशा रीतीने तारीख निश्चित करण्यात येईल. विशेष म्हणजे, बोलावलेली विशेष बैठक रद्द किंवा तहकूब करता येणार नाही.




| यंदाचे पक्षीय बलाबल | |
|---|---|
| भाजपा | ८७ |
| एमआयएम | ०८ |
| शिवसेना (शिंदे) | ०४ |
| काँग्रेस | ०२ |
| राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) | ०१ |
| एकूण | १०२ |

| सन २००२ पासूनचे महापौर व आरक्षण | |
|---|---|
| २००२ | नलिनी चंदेले (सर्वसाधारण महिला) |
| २००५ | विठ्ठल जाधव (ओबीसी पुरुष) |
| २००७ | अरुणा वाकसे (ओबीसी महिला) |
| २००९ | आरिफ शेख (सर्वसाधारण पुरुष) |
| २०१२ | अलका राठोड (ओबीसी महिला) |
| २०१४ | सुशीला आबुटे (एससी महिला) |
| २०१७ | शोभा बनशेट्टी (सर्वसाधारण महिला) |
| २०१९ | श्रीकांचना यन्नम (ओबीसी महिला) |
| २०२६ | .... (खुला प्रवर्ग) |



### प्रदेश स्तरावर ठरणार निर्णय : पालकमंत्री गोरे

सोलापूर महापौरपद सर्वसाधारण गटासाठी आरक्षित झालेले आहे. त्यामुळे महापौरपदावर कोणाला संधी द्यायची? याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रदेश भाजप स्तरावर ठरणार आहे, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.



### पक्षाचा आदेश शिरसांवद्य

महापौरपदासाठी इच्छुकांची नावे पालकमंत्री जयकुमार गोरे हे प्रदेश भाजपाला कळवणार आहेत. प्रदेश स्तरावरुन घेतलेला निर्णय, पक्षाचा आदेश सर्वांना शिरसावंद्य राहील, असे सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

# निवडणूक प्रचार साहित्याचे प्रमाणीकरण करणे आवश्यक : जिल्हाधिकारी आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत ११ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. या निवडणुकीत सहभागी होणाऱ्या सर्व उमेदवारांनी प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी त्या जाहिरातींचे प्रमाणीकरण जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून करून घेणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्पष्ट केले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भातील सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. यामध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृहातील जाहिराती, सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडिओ-व्हिज्युअल डिस्प्ले), ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, समाजमाध्यमे (सोशल मीडिया) आदींचा समावेश आहे, असेही त्यांनी सांगितले.

**माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती याप्रमाणे**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली. यात पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्यासह संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार यांचा समावेश आहे.

**पाच दिवस आधी अर्ज**

प्रस्तावित जाहिरात प्रसारित किंवा प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. सोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील प्रत जोडावी, राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

## 'या' शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट मिळावी

**सोलापूर :** इयत्ता बारावी व इयत्ता दहावीची २ फेब्रुवारीपासून प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होत आहेत. ४ फेब्रुवारी व ५ फेब्रुवारी रोजी बऱ्याच शाळा, महाविद्यालयात या परीक्षा असल्याने विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता इयत्ता दहावी व बारावी वर्गावर अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक कर्तव्यातून सूट द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाने जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, राज्य उपाध्यक्ष रमेश लोखंडे, प्रा. युवराज भोसले, रवी देवकर, नितीन गायकवाड उपस्थित होते.

# मंगळवेढा : अर्ज छाननीत २५ अर्ज अवैध

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.२२ जानेवारी-**

मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी दि.२२ जानेवारी रोजी करण्यात आली. एकूण १८२ अर्ज दाखल झाले असून, त्यापैकी १५७ अर्ज वैध ठरले आहेत. उर्वरित २५ अर्ज अवैध घोषित करण्यात आले. जिल्हा परिषद गटांसाठी १० आणि पंचायत समिती गणांसाठी १५ अर्ज अवैध झाल्याने उमेदवारांमध्ये चर्चेचे विषय निर्माण झाले आहेत.



जिल्हा परिषद गटांची स्थितीजिल्हा परिषदेच्या चार गटांसाठी एकूण ६२ अर्ज दाखल झाले होते. यापैकी ५२ अर्ज वैध आणि १० अर्ज अवैध ठरले. गटनिहाय तपशील याप्रमाणे; संत दामाजीनगर गट : एकूण २० अर्ज दाखल. वैध अर्ज १५, अवैध अर्ज ५. या गटात सर्वाधिक अवैध अर्ज नोंदवले गेले असून, उमेदवारांच्या कागदपत्रांमधील त्रुटी कारणीभूत ठरल्या.

हुलजंती गट : एकूण ६ अर्ज. वैध अर्ज ५, अवैध अर्ज १. हा गट तुलनेने शांत राहिला. लक्ष्मी दहिवडी गट : एकूण १७ अर्ज. वैध अर्ज १४, अवैध अर्ज ३. येथेही काही उमेदवारांचे अर्ज नामंजूर झाले. भोसे गट : एकूण १९ अर्ज. वैध अर्ज १८, अवैध अर्ज १. हा गट सर्वाधिक स्पर्धात्मक ठरला. या गटांतील अवैध अर्ज मुख्यतः आधारकार्ड, शपथपत्र किंवा निवास प्रमाणपत्रातील त्रुटींमुळे अवैध ठरले.

पंचायत समितीच्या ८ गणांसाठी एकूण १२० अर्ज दाखल झाले. यापैकी १०५ वैध आणि १५ अवैध अर्ज ठरले. गणनिहाय माहिती याप्रमाणे; संत दामाजीनगर : एकूण ७ अर्ज. वैध अर्ज ४, अवैध अर्ज ३. बोराळे : एकूण १२ अर्ज. वैध अर्ज ११, अवैध अर्ज १. हुलजंती : एकूण १५ अर्ज. वैध अर्ज १४, अवैध अर्ज १. मरवडे : एकूण १० अर्ज. वैध अर्ज ६, अवैध अर्ज ४.

संत चोखामेळानगर : एकूण १० अर्ज. वैध अर्ज १०, अवैध अर्ज ०. लक्ष्मी दहिवडी : एकूण २६ अर्ज. वैध अर्ज २२, अवैध अर्ज ४. भोसे : एकूण २१ अर्ज. वैध अर्ज २०, अवैध अर्ज १. रड्डे : एकूण १९ अर्ज. वैध अर्ज १८, अवैध अर्ज १. पंचायत समिती गणांतील अवैध अर्जांमध्येही शपथपत्रातील चुका, वय प्रमाणपत्र आणि इतर कागदोपत्रांची कमतरता प्रमुख कारणे होती.

**तीव्र स्पर्धा आणि नवीन चेहरे**

मंगळवेढा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात तीव्र स्पर्धा अपेक्षित आहे. संत दामाजीनगर आणि लक्ष्मी दहिवडीसारख्या गटांत पूर्वीच्या निवडणुकांप्रमाणेच चुरस राहील. पावसाळ्यातील पूरसदृश रस्ते, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि शिक्षण सुविधा हे प्रमुख विषय ठरतील. यंदाच्या निवडणुकीत नवीन चेहरे उदयास येऊ शकतात, असे यानिमित्ताने सांगण्यात येते.

# भाजपातील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर

### अलगोंड, हसापुरे, पाटलांना बसला फटका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ जानेवारी-**

दक्षिण विधानसभा मतदारसंघात असलेल्या जिल्हा परिषद हत्तुर गटात भारतीय जनता पार्टीमधील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली असून बाजार समितीच्या माजी सभापती तथा संचालिका इंदुमती अलगोंड-पाटील, बाजार समितीचे संचालक सुरेश हसापुरे आणि शिवानंद पाटील यांना त्याचा फटका बसला आहे.

दिलीप माने गटाचे हत्तुर जिल्हा परिषद मतदार संघात इंदुमती अलगोंडा यांनी भारतीय जनता पार्टी तर्फे तसेच हत्तुर गणात सुरेश हसापुरे आणि औराद गणात शिवानंद पाटील यांनी भाजपपक्षाकडून उमेदवारी दाखल केली होती. भारतीय जनता पार्टीकडून या गटात आणि गणात दोन्हीकडच्या उमेदवारांना पक्षाने एबी फॉर्म दिले होते. परंतु जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांचे पत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना प्राप्त झाले. पण ते पत्र दुपारी चार वाजून ४९ मिनिटांनी आल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला की ज्या उमेदवारांनी सर्वात अगोदर उमेदवारी अर्ज दाखल केला त्याला पक्षाचा उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आले.

उमेदवारी अर्ज छाननीमध्ये आमदार सुभाष देशमुख समर्थक उज्वला अनिल हविनाळे यांना भारतीय जनता पार्टीचा एबी फॉर्म ग्राह्य धरण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यामुळे इंदुमती अलगोंडा या आता अपक्ष झाल्या आहेत. हत्तूर पंचायत समिती गणाचे उमेदवार सुरेश हसापुरे आणि शिवानंद पाटील यांच्या ऐवजी सुभाष देशमुख समर्थक संदीप टेळे, पंचप्पा धनशेट्टी उमेदवारांचे एबी फॉर्म ग्राह्य धरण्यात आले. आ. देशमुख यांनी हत्तूर जिल्हा परिषद मतदारसंघात उमेदवारी देण्यात आपले वर्चस्व राखले आहे. दिलीप माने गटाच्या इंदुमती अलगोंडा-पाटील यांना भाजपची उमेदवारी मिळवण्यात त्या अपयशी ठरल्या आहेत.

# माळशिरसमध्ये भाजपाचे शक्तिप्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२२ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यात प्रथमच भाजपने प्रचंड शक्तिप्रदर्शन करीत पंचायत समिती व जिल्हा परिषद उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल केले. माजी आमदार राम सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप प्रथमच पंचायत समिती व जिल्ह्य परिषद निवडणुकीत पुर्ण ताकदनिशी उतरला आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मांडवे येथून माळशिरस तहसील कार्यालयापर्यंत चारचाकी गाड्यांची रॅली काढण्यात आली. तालुक्यात ९ जिल्हा परिषद गट व १८ पंचायत समिती गण आहेत. इच्छुकांनी आजपर्यंत केलेले कार्य, जातीय समीकरणे जुळवून उमेदवारी देण्यात आले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील देशात तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्यात भाजपाचे सरकार आहे. नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुकीतही भाजपाने मुसंडी मारली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही भाजपा दैदिप्यमान यश संपादन करेल, असा विश्वास माजी आमदार राम सातपुते यांनी व्यक्त केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना जि.प.चे माजी अध्यक्ष फत्तेसिंह माने पाटील, माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्यासह शरद मोरे, हनुमंत सूळ, बाजीराव काटकर, शरद मदने, ज्योती माने, राजकुमार पाटील, नाथा लवटे, बाळासाहेब सरगर, बाळासाहेब वावरे, सुजय माने, नितीन मोहिते, संजय देशमुख, सोमनाथ भोसले, गणेश पाटील आदी उपस्थित होते.



# माढा पं.स. १४ गणातील १६९ अर्जांपैकी ७ उमेदवारी अर्ज नामंजूर

### जि.प.गटातील सर्व अर्ज मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**माढा,दि.२२ जानेवारी-**

माढा तालुक्यातील ७ जिल्हा परिषद व १४ पंचायत समिती गणासाठी २४६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. जिल्हा परिषद ७ गटासाठी ७७अर्ज दाखल झाले असून छाननी प्रक्रियेत ते सर्व अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.



१४ पंचायत समिती घरासाठी घरासाठी गणासाठी १६९ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून त्यातील ७ अर्ज छाननी मध्ये नामंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे पंचायत समिती गणासाठी १६२ उमेदवारी अर्ज राहिले आहेत. अर्ज नामंजूर झालेले गण व उमेदवाराचे नाव - सोनाली संदिप माने (रांजणी गण), जयश्री सुर्यकांत खरात (टेंभुर्णी गण), अशोक प्रल्हाद वाघमारे (भोसरे गण), शुभम नवनाथ फुगे (अपक्ष पिंपळनेर गण), हुंबे विष्णू महादेव (अपक्ष बेंबळे गण), संजय विठ्ठल शिंदे (कुर्डु गण), पाटील आकाश बबनराव (अकोले खुर्द गण), तुतारी अवैध, घड्याळ वैध. शर्मिला विलास उबाळे यांनी माझ्या नामनिर्देशनपत्रात हस्त दोषातील चुकीने गट क्रमांक ७ ऐवजी गण क्रमांक १४ मध्ये धरले गेले, ते गट क्रमांक ७ भोसरे यामध्ये धरण्यात येऊन सदर नामनिर्देशन पत्र वैध करण्यात यावे, असा छानिनी वेळी तोंडी युक्तिवाद करण्यात आला.

भोसरी गटासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या अश्विनी योगेश दळवी यांचे सुचक रामचंद्र चांगदेव गोडगे यांनी शर्मिला विलास उबाळे यांचा उमेदवारी अर्ज गण क्रमांक १४ भोसरी मध्ये असून गट क्रमांक ७ भोसरेमध्ये घेण्यात येऊ नये. असा हरकत अर्ज सादर केला. याविषयी प्रांत अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी जयश्री आव्हाड यांनी अर्जातील तांत्रिक अडचण लक्षात घेता रामचंद्र चांगदेव गोडगे यांनी केलेला अर्ज फेटाळला असून शर्मिला विलास उबाळे यांचा अर्ज वैध ठरवला आहे.

**जि.प. व पंचायत समिती निवडणूक**

# जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी घेतली व्हिसीद्वारे बैठक

### काटेकोरपणे नियोजन करण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सोलापूर जिल्ह्यातील एक जिल्हा परिषद व अकरा पंचायत समित्यांसाठी दिनांक १६ ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत उमेदवारी अर्ज विक्री व दाखल करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया अत्यंत काटेकोरपणे पार पडली.



निवडणूक प्रशासनाने पोलीस विभागाशी समन्वय साधून प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयात आवश्यक सुरक्षा व शिस्तबद्ध व्यवस्था केली होती. उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख यांचा सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी तसेच पोलीस विभागाशी चांगला समन्वय होता. या कालावधीत कोणत्याही कार्यालयात गडबड, गोंधळ किंवा अनुचित प्रकार घडलेला नाही. उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवार व कार्यकर्त्यांनी निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या वेळेचे काटेकोर पालन केले. शेवटच्या दोन दिवसांत अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवार त्यांच्यासोबत कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली असली तरी सर्व प्रक्रिया शांततेत पार पडली. शेवटच्या दिवशी कोणत्याही प्रकारे गर्दीवर नियंत्रण ठेवून गोंधळ होणार नाही याची दक्षता महसूल व पोलीस प्रशासनाने घेतली.

**स्वतंत्र बैठक व मार्गदर्शक सूचना**

जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित अधिकारी यांनी स्वतंत्र बैठक घेऊन आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेत शिस्तबद्धता व पारदर्शकता राखली गेली. यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल तथा ग्रामपंचायत निवडणूक शाखा प्रमुख संतोषकुमार देशमुख यांच्यासह सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तसेच निवडणूक कामकाजाशी संबंधित अधिकारी यांची उपस्थिती होती.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्वीकृत सदस्य पदासाठी होतेय मोठी रस्सीखेच. !

तभा वृत्तसेवा

लातूर , दि. २२ जानेवारी : लातूर शहर महानगरपालिकेत निवडल्या जाणाऱ्या एकूण सात स्वीकृत नगरसेवक पदासाठी काँग्रेस आणि भाजपच्या इच्छुकांकडून मोठी रस्सीखेच होत असल्याचे दिसत आहे.

लातूर मनपात एकूण ७० नगरसेवक आहेत. त्याप्रमाणात येथे सात जणांना स्वीकृत सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे. लातुरात काँग्रेसचे पाच तर भाजपचे दोन स्वीकृत नगरसेवक निवडले जाणार आहेत. दोन्ही प्रमुख पक्षांकडून या पदासाठी आपल्यालाच समाधी मिळावी अशी मागणी दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून केली जाताना पाहायला मिळत आहे. त्याकरिता अनेकांनी आपआपल्या पध्दतीने लॉबिंगही करणे सुरु केले आहे. यावेळच्या मनपा निवडणुकीत भाजप – काँग्रेसकडून अनेक इच्छुकांना संख्येअभावी उमेदवारी देणे शक्य झाले नव्हते. त्यामुळे ऐन निवडणुकीत नाराज कार्यकर्त्यांचे बंड शमवण्याची पाळी पक्षनेत्यांवर आली होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात. वर्षानुवर्षे पक्षासाठी खस्ता खाणाऱ्या कार्यकर्त्यांनी पक्षाकडून एखाद्या पदाची अभिलाषा बाळगणे गैर नाही. परंतु पक्षही कार्यकर्त्याच्या कार्याचा आवाका पाहून त्याबाबत निर्णय घेत असतो.लातूर मनपात स्वीकृत सदस्य म्हणून आपल्याला संधी देण्यात यावी,अशी मागणी अनेकांनी आपआपल्या पक्षाच्या नेत्यांकडे केल्याचे दिसत आहे. आता प्रत्यक्षात कोणाला संधी मिळते हे काळच सांगणार आहे.



# लातूरचे महापौरपद प्रथमच एससी महिला प्रवर्गासाठी आरक्षित

## आ. अमित देशमुख महापौर पदाची संधी कोणाला देणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ जानेवारी : लातूर शहर महानगरपालिकेचे महापौर पद प्रथमच अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी आरक्षित झाले आहे. लातूर मनपात काँग्रेस – वंचित आघाडीला बहुमत मिळाल्याने आ. अमित देशमुख महापौर पदासाठी कोणत्या नावाला प्राधान्य देतात याकडे लातूरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौर पदांचे आरक्षण गुरुवारी मुंबईत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आले. आजच्या महापौर पदाच्या आरक्षणाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून होते. आरक्षणाबद्दल अनेक तर्क लावले जात होते. त्या सर्व तर्कांना आता पूर्णविराम मिळाला आहे. लातूर शहर मनपाचे महापौर दर्प अनुसूचित जाती प्रवर्गाच्या महिलेसाठी राखीव झाले आहे. लातूर शहरातील प्रभाग क्रमांक १०, १२ व १३ मधून निवडून आलेल्या नगरसेविकांपैकी कोणाला महापौर पदाची संधी मिळते ? याची उत्सुकता लातूरकरांना लागली आहे.

विशेष म्हणजे लातूर महानगरपालिकेत काँग्रेसचे स्पष्ट बहुमत असून काँग्रेस सोबत आघाडी करून पाच जागा लढवून त्यापैकी चार जागा जिंकलेल्या वंचित बहुजन आघाडीकडेही या प्रवर्गाच्या दोन महिला सदस्य असल्याने महापौर पदाची उत्सुकता वाढली आहे. वंचित बहुजन आघाडीकडून विजयी झालेल्या नगरसेविकेला महापौर पदावर काम करण्याची संधी मिळण्याची शक्यता खूप कमी असल्याचेही बोलले जात आहे. लातूर मनपावर आ. अमित देशमुख यांचे निर्विवाद वर्चस्व असल्याने ते ज्या उमेदवाराचे नाव निश्र्चित करतील तो उमेदवार महापौर असणार आहे. शहरातील प्रभाग क्रमांक दहा मधून निवडून आलेल्या सौ. कांचन दीपरत्न अजनीकर यांची नगरसेवकपदाची दुसरी टर्म असून त्यांचा शैक्षणिक आलेख पाहता महापौरपदासाठी त्यांच्या नावावर एकमत होण्याची शक्यताही काँग्रेसच्या वर्तुळातून वर्तवली जात आहे.




लातूर शहर मनपाची ही तिसरी सार्वत्रिक निवडणूक होती. या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ७० पैकी ६५ जागा लढवून तब्बल ४३ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. तसेच काँग्रेसने वंचितसोबत आघाडी करून त्यांना पाच जागा सोडल्या होत्या. त्यापैकी चार जागेवर वंचितचे उमेदवार विजयी झाल्याने काँग्रेस – वंचितच एकूण ४७ नगरसेवक मनपात कार्यरत झाले आहेत. वंचितच्या सहकार्यामुळे लातुरात काँग्रेसला अनेक जागांचा फायदा झाल्याने आ. अमित देशमुख मनपाच्या सत्तेत वंचित समाधानकारक वाटा देतील असे दिसून येत आहे. काँग्रेसच्या या नेत्रदीपक विजयात वंचितांचा निश्र्चितच मोलाचा वाटा राहिला आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या प्रथम महापौर म्हणून काँग्रेसच्या स्मिता खानापुरे यांनी काम पाहिले आहे. त्यांचा अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर अख्तर मिस्त्री – शेख याना महापौर पदाची संधी देण्यात अली. मात्र ते आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नसल्याने एक वर्षासाठी ड. दीपक सूळ यांना एक वर्षासाठी महापौर पदाची संधी देण्यात आली. २०१७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत लातुरात भाजपने बहुमत संपादन केले. काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या सुरेश पवारांना अडीच वर्षे महापौर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पुढील अडीच वर्षाच्या महापौर पदाच्या निवडीत लातुरात नाट्यमय घडामोडी घडून काँग्रेसचे विक्रांत गोजमगुंडे महापौर तर भाजपाचे चंद्रकांत बिराजदार उपमहापौर झाले होते. मनपा पदाधिकाऱ्यांची २०२२ मध्ये संपल्यानंतर तेव्हापासून आतापर्यंत मनपावर प्रशासक राज होते. मनपाचा कारभार आता नूतन पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला जाणार आहे.

# जि.प.,पं.स. निवडणुकीसाठी १ हजार ५५० अर्ज

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ : जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याकरिता अनेक इच्छुकांनी शेवटच्या दिवसाचा मूहुर्त साधला . लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी आणि पंचायत समितीच्या ११८ गणासाठी एकूण १ हजार ५५० अर्ज दाखल झाले आहेत.

सर्वाधिक अर्ज हे उदगीर तालुक्यातून दाखल झाले आहेत. इच्छुकांची संख्या अधिक असल्याने हा आकडा वाढला असला तरी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी काय चित्र राहणार हे पहावे लागणार आहे. नगरपालिका आणि महापालिकेनंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तब्बल ९ वर्षानंतर या होत असल्याने इच्छुकांची संख्याही मोठी आहे. ज्या पक्षासाठी आपण वर्षानुवर्षे काम करतोय त्या पक्षाकडून पक्षाकडून उमेदवारी मिळणार या आशेवर अनेकांनी अर्जाची खरेदी तर केली होती पण भरण्यासाठी 'वेट अण्ड वॉच'च्या भूमिकेत अनेकजण होते. बुधवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सकाळपासूनच निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाबाहेर इच्छुकांनी गर्दी केली होती. त्यामुळे दुपारी ३ नंतरही इच्छुकांची गर्दी ही कार्यालय परिसरात होती. जिल्ह्यातील पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी ९५२ तर जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी ५९८ अर्ज दाखल झाले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जिल्हा परिषदेचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. जिल्हा परिषदेला जिल्ह्याचे मिनी मंत्रालय म्हणूनही ओळखले जाते. जिल्ह्याच्या विकासात जिल्हा परिषदांचे योगदान महत्वपूर्ण असते. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थेवर ताबा मिळवण्यासाठी काँग्रेस – भाजपचे नेते प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतात. ही निवडणूकही अपेक्षेप्रमाणे चुरशीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## थोडक्यात...

### तीन महिन्याची रक्कम एकत्रित येणार ?

लातूर : महानगरपालिका निवडणुकीवर परिणाम पहाता निवडणूक आयोगाने डिसेंबर महिन्याचा हप्ता देण्यास मंजुरी दिली. डिसेंबरचा हप्ता मिळाला पण जानेवारी महिन्याचा हप्ता देण्यास नकार देण्यात आला. पण अद्यापही अनेक लाडक्या बहिणींचा नोव्हेंबर आणि डिसेंबरचा हप्ता रखडला आहे. त्यासाठी लाडक्या बहिणी रस्त्यावर उतरल्या आहेत. लवकरच जानेवारी महिन्याच्या हप्त्यासोबतच नोव्हेंबर आणि डिसेंबरची थकित रक्कम (एकूण ४५०० रुपये) जमा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, या संदर्भात अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये अस्वस्थता कायम आहे.

### श्र्वसनविकार तज्ज्ञांच्या विभागीय परिषदेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर : मराठवाड्यातील श्र्वसनविकार तज्ज्ञ व फिजिशियन यांची विभागीय परिषद दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूरच्या अंबाजोगाई रोडवरील हॉटेल कार्निवल येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती परिषदेचे संयोजक डॉ. रमेश भराटे यांनी दिली.

वाढते प्रदूषण, औद्योगीकरण, वाढते तापमान व हवामानातील वारंवार होणारे बदल यामुळे मानवी आरोग्यावर अनेक परिणाम होत आहेत. विशेषतः श्र्वसनविकार दमा, हृदय रोग, फुफ्फुसाचे कॅन्सर इत्यादी गंभीर आजारांचे प्रमाण वाढत असून या आजारांचे वेळीच निदान व उपचार होणे आवश्यक असते. या आजारांचे निदान करण्यासाठी अद्यावत तंत्रज्ञान उपयुक्त ठरत आहे. तसेच श्र्वसनविकार तज्ञ यांनी हे अद्यावत ज्ञान आत्मसात करून त्याचा वापर रुग्णांना करावा, यासाठी ही परिषद महाराष्ट्र चेस्ट सोसायटी, एपीआय लातूर, एसोसिएशन ऑफ मेडिकल स्पेशालिटी आयएमए महाराष्ट्र व यशोदा हॉस्पिटल हैदराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला देशातील नामवंत डॉक्टर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

श्र्वसन विकार तज्ञ डॉक्टरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. संतोष कुलकर्णी, डॉ. नागार्जुन मात्र, डॉ. हमीद चौधरी, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. प्रेमकिशोर तोष्णीवाल, डॉ. गोपीकिशन भराडिया, डॉ. अशोक गानू, डॉ. राजेश पाटील, डॉ. चंद्रकांत

### पुजा रोकडेचा सत्कार

तभा वृत्तसेवा

रेणापूर, दि. २२ जानेवारी : येथील शिवाजी महाविद्यालयाच्या पुजा रोकडे या विद्यार्थिनींने वाद-विवाद स्पर्धेत वैयक्तिक प्रथम पारितोषिक पटकाविल्या बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश यादव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जनविकास वरिष्ठ महाविद्यालय बनसारोळा ( ता.केज ) येथे नुकतीच वाद विवाद स्पर्धा संपन्न झाली . या स्पर्धेत येथील शिवाजी महाविद्यालयाची कु. पुजा रोकडे या विद्यार्थीनीने वैयक्तिक प्रथम पारितोषिक मिळवले आहे. तीन हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. प्राचार्य डॉ. यादव यांनी कु. पुजा रोकडे हिचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा दिल्या . यावेळी

अभ्यासबरोबर तिने विविध स्पर्धेत भाग घेऊन स्वतः बरोबरच महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

या कार्यक्रमाला वादविवाद मंडळाचे प्रमुख डॉ.जयद्रथ जाधव, उपप्राचार्य डॉ.पी.आर.शिंदे, डॉ. गणेश नागरगोजे, वादविवाद मंडळातील डॉ. नांदे एस.एम., डॉ.क्रांती मोरे आणि डॉ. शाम लेंडवे, डॉ.आर.सी.जाधव, डॉ. अर्जुन कसबे, डॉ.रामदास खोकले,डॉ. शंकर यादव, डॉ. भुजबळ मनोज, डॉ.उमाकांत कांबळे, डॉ.ज्ञानदेव राऊत,डॉ. अनिल ठेंगे, डॉ. प्रकाश कुलाळ यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## ग्रंथभेट योजनेसाठी प्रकाशित ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ : जानेवारी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकत्ता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी ' ग्रंथभेट' योजनेतंर्गत सन २०२५ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येणार येतात.

या योजनेतंर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रथांची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या ' शासनमान्य ग्रंथ निवड यादी' मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२५ कॅलेंडर वर्षात दि. १ जानेवारी, २०२५ ते दि. ३१ डिसेंबर, २०२५ प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

# सेवालयाच्या विद्यार्थ्यांनी पटकावली ३१ पारितोषिके

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२२: महाराष्ट्र शासनाच्या महिला बालविकास विभागाने बाभळगावच्या पोलीस प्रशिक्षण मैदानावर घेतलेल्या चाचा नेहरू बाल महोत्सवात हासेगावच्या सेवालयातील एचआयव्ही एड्स संक्रमित विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारांत बक्षिसांची अक्षरशः लूट केली. विविध प्रकारांमध्ये तब्बल ३१ पारितोषिके पटकावली आहेत.

या महोत्सवात जिल्ह्यातील इतर बालगृहांतील बालकांनी देखील सहभाग नोंदविला होता. यात सेवालय प्रकल्पातीलच मुले एचआयव्ही एड्स संक्रमित आहेत. या महोत्सवात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात सेवालय बालगृहातील ही एचआयव्ही एड्स संक्रमित बालके विशेष होती. तरीही सर्वांपेक्षा वरचढ कला प्रकार सादर

सेवालयाचे प्रमुख प्रा. रवी बापटले यांच्या मार्गदर्शनात सेवालयातील विद्यार्थ्यांना अष्टपैलू बनण्याचे धडे सेवालयात दाखल होताच मागील २० वर्षापासून देण्यात येत आहेत. येथील विद्यार्थी शेतातील कामांसह शाळेतही उच्च गुणवत्ता निर्माण करीत आहेत. अनेक विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी नीटचीही तयारी करीत आहेत. विद्यापीठ युवक महोत्सवात अनेक विद्यार्थी राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचले आहेत. सेवालयाच्या हॅप्पी म्यूझिक शोचे दूरदर्शनवरही सादरीकरण झाले आहे. दरवर्षी बाल महोत्सवात पारितोषिकांची लूट करण्यात सेवालयाचेच विद्यार्थी अग्रभागी असतात.

अन्य बालगृहातील सामान्य बालकांसोबत विविध स्पर्धा करुन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके पटकावली आहेत. त्यात १३ प्रथम पारितोषिके पटकावली. यामध्ये बुद्धिबळ, सामूहिक नृत्य, एकल गायन, रांगोळी, लांब उडी, धावणे, संगीत खुर्ची, चित्रकला, लिंबू चमचा, दोरी उडी या कलांचा समावेश होता. याच विद्यार्थ्यांनी तब्बल ९ पारितोषिके द्वितीय क्रमांकाची पटकावली आहेत. त्यात धावणे, रिले, थाळीफेक, दोरी उडी, लिंबू चमचा, संगीत खुर्ची, निबंध स्पर्धा या क्रीडा प्रकारांचा समावेश होता.

तृतीय क्रमांकाची तीन पारितोषिके तब्बल ९ पटकावली आहेत. त्यामध्ये संगीत खुर्ची, दोरी उडी, लिंबू चमचा, फॅन्सी ड्रेस, सामूहिक नृत्य यांचा समावेश होता. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक बनावे : पोनि. शिंदे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ : सायबर गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी सतर्क राहा, अनोळखी लिंक उघडू नका, संशयास्पद फोन कॉल्स किंवा मेसेजकडे दुर्लक्ष करा. बँक तपशील, पासवर्ड, ओटीपी किंवा इतर कोणतीही वैयक्तिक माहिती कोणाशीही शेअर करू नका. कारण, यातून तुमची फसवणूक होऊ शकते. विद्यार्थ्यांनी जागरूक राहून जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी केले.

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात सायबर क्राईम, महिला सुरक्षा आणि व्यसनमुक्ती या विषयांवर मार्गदर्शन करत गुरुवारी प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये,संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य प्रा. कविता केंद्रे, संस्थेच्या संचालक अश्विनी केंद्रे, स्वाती घुले यांच्यासह वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते यांची

### आमदार पवारांनी दिली निष्ठावंताना उमेदवारीची पावती

# पक्षासाठी काम करणाऱ्यांनाच संधी

तभा वृत्तसेवा

औसा दि. २२ जानेवारी – होवू घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर उमेदवार निवडीतून पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना आ. अभिमन्यू पवार यांनी प्राधान्य देत राजकीय वर्तुळात स्पष्ट आणि ठोस संदेश दिला आहे. पक्ष संघटन, निष्ठा आणि तळागाळातील कार्यकर्त्यांचा सन्मान या त्रिसूत्रीवर या निवडणुकीसाठी उमेदवारीची रचना केली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

औसा विधानसभा मतदारसंघातील १२ जिल्हा परिषद व २४ पंचायत समिती अशा एकूण ३६ उमेदवारांपैकी तब्बल ३० उमेदवार पक्षाचे जुने, निष्ठावान कार्यकर्ते आहेत. ४ उमेदवार नव्याने पक्षात प्रवेश केलेले आहेत, तर केवळ १ उमेदवार अराजकीय पार्श्र्वभूमीचा आहे. या निवडीतून पक्षासाठी काम



करणाऱ्यांनाच संधी असा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.

पक्षाच्या पहिल्या फळीतील संतोष मुक्ता, काकासाहेब मोरे, ज्ञानेश्र्वर वाकडे, परमेश्र्वर धुमाळ, युवराज बिराजदार, अजय साळुंके, भागवत कांबळे, दिगंबर घोडके आणि शिवशरण पाटील या नऊ प्रमुख व अनुभवी कार्यकर्त्यांच्या दीर्घकालीन निष्ठेला न्याय देण्यात आला आहे. त्यामुळे पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून संघटन अधिक मजबूत होत आहे.

याचबरोबर रवीकुमार चिलमे, श्रीधर जाधव, राम बिराजदार, अमोल पाटील, नेताजी इंगळे, बालाजी माने यांच्यासह दहा पेक्षा अधिक युवा कार्यकर्त्यांना उमेदवारी देत आ. अभिमन्यू पवार यांनी नव्या पिढीलाही नेतृत्वाची संधी दिली आहे. यामुळे पक्षात नवचैतन्य निर्माण झाले असून तरुण कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

भाजपमध्ये बूथ यंत्रणेला अत्यंत महत्त्वाचे स्थान मानले जाते. त्याच धर्तीवर सदाशिव स्वामी आणि प्रतीक पाटील यांच्यासारख्या बूथ पातळीवर सातत्याने आणि निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. 'कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा आधार आहे' हे या निवडीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अशा या मजबूत संघटनाच्या जोरावर पक्ष अधिक आत्मविश्र्वासाने निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# मोबाईल हिसकावून नेणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २२ जानेवारी : लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकारी – कर्मचाऱ्यांनी धडाकेबाज कामगिरी करत मोबाईल हिसकावून नेणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. चोरट्यांकडून तब्बल ४ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**लातूर शहरात मोबाईल चोरी व मोबाईल हिसकावून नेण्याच्या घटनांवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे मार्गदर्शनात एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या पथकाने केलेली ही कारवाई अत्यंत उल्लेखनीय ठरली आहे. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही विश्र्लेषण, गोपनीय माहिती आणि जलद कारवाईच्या जोरावर पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत गुन्हा उघडकीस आणत आरोपींना जेरबंद केले असून, मोठ्या प्रमाणावर चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक बाळासाहेब विष्णु डोंगरे हे मॉर्निंग वॉक ला गेले असता अज्ञात चोरट्यांनी मोटारसायकलवरून येऊन त्यांचा मोबाईल हिसकावून नेला होता. या घटनेने चोरटे आता पोलिसांनाही सोडत नाहीत असे बोलले जात होते.**

**या चोरी प्रकरणी विकास बाळु राठोड,**



**प्रजापती मुरलीधर सोनवणे यांच्यासह आणखी एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. या आरोपींकडून बाळासाहेब डोंगरे यांचा हिसकावून नेलेला मोबाईल, इतर १६ मोबाईल फोन (किंमत अंदाजे २,५०,०००/– रुपये), गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल, मोबाईल लॉक तोडण्यासाठी वापरण्यात आलेला कॉम्प्युटर संच असा एकूण सुमारे ४ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**तसेच आरोपींनी यापूर्वीही अशाच प्रकारचे अनेक गुन्हे केल्याची कबुली दिली असून, जप्त करण्यात आलेल्या मोबाईलच्या आधारे संबंधित मोबाईल धारकांचा शोध घेऊन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यामुळे शहरातील अनेक मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा होण्याची दाट शक्यता आहे.**

**ही संपूर्ण कारवाई एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चवरे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि खंदारे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश पोगुलवार, डीबी पथकाचे सपोउपनि बेल्लाळे, पोलीस अमलदार भोसले, हस्के, जाधव, डोंगरे यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.**

### निवडणूक रणधुमाळीला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

वलांडी **दि. २२ जानेवारी** : देवणी तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी गुरुवारी (दि. २२) उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया शांततेत पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पूर्ण झाली. छाननीअंती जिल्हा परिषदेचे दोन तर पंचायत समितीचे १७ असे एकूण १९ उमेदवारी अर्ज अपात्र ठरले आहेत.

देवणी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तीन जागांसाठी एकूण २९ उमेदवारांनी ३६ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीनंतर त्यापैकी दोन अर्ज अपात्र ठरले असून २७ अर्ज वैध ठरले आहेत. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नसणे व तांत्रिक त्रुटी ही अपात्रतेची प्रमुख कारणे असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रम व प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरात आंदोलनांवर तात्पुरती बंदी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जानेवारी-**

'हिंद-दी-चादर' कार्यक्रम तसेच भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त नांदेड शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून आंदोलनात्मक कार्यक्रमांवर तात्पुरती बंदी घालण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी 'हिंद-दी-चादर' हा कार्यक्रम होणार असून दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा राष्ट्रीय कार्यक्रम पार पडणार आहे. या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या दृष्टीने सदर आदेश लागू करण्यात आला आहे.

या आदेशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, जिल्हाधिकारी कार्यालय, महात्मा गांधी पुतळा, तहसील कार्यालय नांदेड, पोलीस अधीक्षक कार्यालय, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, शासकीय वैद्यकीय रुग्णालय वजिराबाद, शासकीय विश्रामगृह, अण्णाभाऊ साठे चौक, कुसुम सभागृह, रेल्वे स्टेशनकडे जाणारा रस्ता, एस.टी. ओव्हर ब्रिज, पोलीस उप महानिरीक्षक नांदेड परीक्षेत्र कार्यालय, मोटार परिवहन विभाग, वन विभाग, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, दूध डेअरी, रेल्वे डिव्हिजन, समाज कल्याण कार्यालय आदी परिसरांतील मुख्य रस्त्यांवर दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत उपोषण, आत्मदहन, धरणे, मोर्चे, रॅली, रास्ता रोको आदी आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

संबंधितांना नोटीस बजावून म्हणणे ऐकून घेण्यास पुरेसा अवधी उपलब्ध नसल्याने, आणीबाणीच्या परिस्थितीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (२) नुसार हा एकतर्फी आदेश निर्गमित करण्यात आला आहे. हा आदेश दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

**हिंद-दी-चादर'' कार्यक्रमानिमित्त नांदेड शहरातील आठवडी बाजार २५ जानेवारी रोजी बंद**

हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहीदी समागम राज्यस्तरीय समिती यांच्या मार्गदर्शनाखाली शीख, सिखलकरी, बंजारा-लमान, मोहियाल, सिंधी तसेच इतर सर्व समाजांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील मोदी मैदान, आसरजन येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमास देशातील पंजाब तसेच इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नांदेड शहरातील मोदी मैदान, रेस्ट हाऊस परिसर, सचखंड गुरुद्वारा, गुरु गोविंद सिंगजी विमानतळ, बसस्थानक, जुना मोंढा परिसर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी मार्केट ॲण्ड फेअर ॲक्ट, १८६२ मधील कलम ५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सदर आठवडी बाजार सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी भरविण्यात यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

**'हिंद-दी-चादर' कार्यक्रमानिमित्त २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड शहरात वाहतूक नियमन**

हिंद-दी-चादर या कार्यक्रमानिमित्त दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात देशातील व राज्यातील अनेक अतिमहत्वाचे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये केंद्रीय गृहमंत्री मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश आहे. हे सर्व मान्यवर नांदेड येथील मोदी मैदान येथे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास देश-विदेशातून मोठ्या प्रमाणावर भाविक दाखल होणार असल्याने नांदेड शहरात वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरातील शांतता, सुव्यवस्था व वाहतुकीचे सुरळीत नियोजन राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतूक नियमनाबाबत अधिसूचना निर्गमित केली आहे.

या कालावधीत व्हीव्हीआयपी दौऱ्यादरम्यान तात्पुरत्या स्वरूपात आसना ब्रिजशंकरराव चव्हाण चौकगुरुद्वारा मालटेकडी रोडमालटेकडी ओव्हरब्रिज, नमस्कार चौक ते नाईक चौक, अण्णाभाऊ साठे पुतळा, हिंगोली गेट ओव्हरब्रिज, चिखलवाडी चौक, आय.टी. आय. ते अण्णाभाऊ साठे पुतळा, अण्णाभाऊ साठे पुतळा ते नाईक चौक (आनंदनगरकडे), हिंगोली गेट अंडरब्रिज ते अण्णाभाऊ साठे पुतळा, चिखलवाडी ते हिंगोली गेट ओव्हर/ अंडरब्रिज, चिखलवाडी ते गुरुद्वारा हनुमान मंदिरभगतसिंग चौक, बर्की चौक ते जुना मोंढा मार्गे वजिराबाद, कविता हॉटेल ते जुना मोंढा कौठा, एम.जी. हेक्टर शोरूम ते साई कमान कौठा, भगतसिंग चौक ते श्रीराम चौक (पूर्व बाजू), अहिल्यादेवी होळकर चौकमामा चौक, बी.डी.डी.एस. ऑफिस ते मामा चौकश्रीराम चौक, लिंबगाव ते वाघी रोडहसापूर मार्ग (कार्यक्रमास येणारी वाहने वगळून), रविनगर ते नागार्जुन शाळा तसेच कौठा चौकी ते रविनगर, बसवेश्वर पुतळा ते अहिल्याबाई होळकर चौकपदमजासिटीभगतसिंग चौक हे मार्ग वाहतुकीस बंद राहणार आहेत.

वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग म्हणून चिखलवाडीअण्णाभाऊ साठे पुतळानाईक चौककडे जाणारी वाहतूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, कोर्टाच्या पाठीमागून हिंगोली गेट अंडरब्रिज मार्गे गोकुळनगरकडे वळविण्यात येईल. तसेच वजिराबाद चौकआय.टी. आपनवीन मोंढामहादेव दाल मिल मार्ग, महादेव दाल मिल रोड क्रमांक २६, शिवाजी महाराज पुतळारेल्वे स्टेशनहिंगोली गेट, बसवेश्वर चौक ते लातूर फाटा, लिंबगावभवानी चौकछत्रपती चौक मार्गे वाहतूक सुरू राहील.

नागरिकांनी दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतुकीस अडथळा होऊ नये यासाठी प्रशासनाने जाहीर केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

## अखंड हरिनाम सप्ताहात आमदार भिमराव केराम यांची सदिच्छा भेट

**किनवट -** मौजे आंदबोरी (ता. किनवट, जि. नांदेड) येथे दिनांक १३ ते २० जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह उत्सवात किनवटमाहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भिमराव केराम यांनी दिलेली सदिच्छा भेट दिली. याच वेळी आपले गाव हरित व स्वच्छ गाव या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात आमदार भिमराव केराम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून जमा केलेल्या निधीतून गावाच्या प्रमुख मार्गावर दुतर्फा ५० नारळाची झाडे व इतर १० झाडे, अशी एकूण ६० झाडे लावण्यात आली. झाडांच्या संरक्षणासाठी ग्रीन नेट बसविण्यात आले असून त्यांची निगा राखण्याची जबाबदारीही निश्चित करण्यात आली आहे. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या हरिभक्त परायण ह. भ. प. नारायण महाराज महादापूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनासाठी आमदार भिमराव केराम यांची प्रमुख उपस्थिती होती. कीर्तनातून भक्ती, एकात्मता व समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला. आमदार केराम यांनी कीर्तनाचा आस्वाद घेत उपस्थित भाविकांशी संवाद साधत गावकऱ्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले. अखंड हरिनाम सप्ताहात केवळ भक्ती उपक्रमच नव्हे तर प्लास्टिकमुक्त सप्ताह, ग्रामस्वच्छता अभियान यांसारखे सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. प्लास्टिक साहित्याचा वापर टाळून गावकऱ्यांनी स्वतःची भांडी आणून भोजन केल्याने पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला गेला. ग्रामस्वच्छता अभियानात संपूर्ण गाव स्वच्छ करण्यात आले.

या सर्व उपक्रमांमध्ये गावचे सरपंच, ग्रामसेवक, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक, कर्मचारी वर्ग, भजनी मंडळ, महिला मंडळ यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नवयुवक मित्र मंडळ, आंदबोरी यांनी उत्कृष्ट नियोजन व परिश्रम घेतले. आमदार भिमराव केराम यांच्या उपस्थितीने आणि मार्गदर्शनाने अखंड हरिनाम सप्ताह भक्ती, सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संवर्धन यांचा आदर्श संगम ठरला असून परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## देगलूर शिवजन्मोत्सव समिती २०२६ जाहीर

**देगलूर**-येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, देगलूर येथे दि. २१ जानेवारी रोजी (बुधवारी) श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोउत्सव २०२६ च्या बैठकीचे आयोजन करण्यात होते. या बैठकीत सर्वानुमते नामदेव पाटील थडके देगावकर यांची श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव समिती २०२६ च्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षापदासह समितीतील विविध पदांची निवड करण्यात आली. त्यात उपाध्यक्षपदी गजानन पाटील नागराळकर व ओमकार उल्लेवार, सचिवपदी राजू देशमुख ढोसणीकर, कोषाध्यक्षपदी डॉ. सुनील जाधव तर कार्याध्यक्षपदी ड. अंकुशराजे जाधव यांची निवड करण्यात आली. तसेच स्वागताध्यक्षपदी खालेद पटेल, संघटकपदी बालाजी पाटील अंदेगाववाडीकर, सहसचिवपदी विशाल पवार, सहकोषाध्यक्षपदी संजय कांबळे, सहसंघटकपदी शेख असलम तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून राजीव ताटे यांची निवड करण्यात आली. शिवस्मारक मार्गदर्शन समितीत अध्यक्ष ड. अंकुश देसाई देगावकर, २०२५ शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष मंगल पाटील, सचिव राजू पाटील मलकापुरकर यांच्यासह नितेश पाटील भोकसखेडकर, विठ्ठलराव भोसले, व्यंकट कांबळे, संतोष पाटील येरगीकर, नितेश पाटील, चंद्रकांत मोरे, अनिल कदम, जनार्दन पाटील बिरादार, दिलीप भडके व उमाकांत भुताळे यांची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर सदस्य म्हणून दत्ता पाटील केरुरे, शहाजी बाबरे, सूर्यकांत येलबुगडे, सुनील थडके, गोविंद वट्टमवार, अनिरुद्ध देशमुख व गोविंद पाटील अंदेगावे यांची निवड करून कार्यकारिणी पूर्ण करण्यात आली. या वेळी ड. अंकुश देसाई देगावकर यांचे मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित होते. यावेळी शिवस्मारक समितीचे अध्यक्ष ड. अंकुश देसाई देगावकर, शशांक पाटील, जयदीप वरखिंडे, बालाजी पाटील इब्राहिमपुरकर, गजानन पाटील मुजळगेकर, आकाश वडजे, अत्री पाटील, गोविंदराव केरुरे, पांडुरंग पाटील, पांडुरंग थडके, नवनाथ पाटील, सदाशिव शिंदे, नरेंद्र पाळेकर, दिलीप थडके, संदीप शिंदे, दिगंबर जाधव, बंटी जाधव यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

## मुदखेड येथे हभप सुनील महाराज आष्टीकर यांची भागवत कथा

**मुदखेड**-महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कथाकार, भागवताचार्य परमपूज्य हभप सुनील महाराज आष्टीकर यांची मुदखेड येथे दिनांक ३१ जानेवारीपासून श्रीमद् भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. श्री गणपती मंदिर कलशारोहण द्वितीय वर्धापनदिनानिमित्त परमपूज्य सद्गुरू नराशाम महाराज येवतीकर यांच्या कृपाआशीर्वादाने मुदखेड मोंढा भागातील सुभाष गंज येथे हभप भागवताचार्य सुनील महाराज आष्टीकर यांच्या अमृतवाणीतून दिनांक ३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान दुपारी एक ते चार या वेळात श्रीमद् भागवत कथा होणार आहे. दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता हभप सुनील महाराज आष्टीकर यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.या सर्व धार्मिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुदखेड येथील समस्त गावकरी मंडळी परिश्रम घेत आहेत.



## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत श्री. साईबाबा निवासी अपंग विद्यालयाचे वर्चस्व

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २२ जानेवारी-**

जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत श्री. साईबाबा निवासी अपंग विद्यालय, हदगांव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचे नाव उज्वल केले आहे. विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पदकांवर आपले वर्चस्व सिद्ध केले.

या स्पर्धेत विद्यालयाच्या युवराज खरसकर हा १०० मिटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक तर कु. दुर्गा रॅपनवाड ५० मीटर धावणे व समर्थ पोटे लगोरी या खेळत प्रथम क्रमांक या विद्यार्थ्यांनी पटकावले. दिव्यांग असूनही जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी आपली क्षमता सिद्ध केली.



या यशामागे विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. बी. पाळेकर, तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन व परिश्रम मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देत योग्य प्रशिक्षण दिल्यामुळे हे यश मिळाले असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

विद्यालयाच्या या नेत्रदीपक कामगिरीबद्दल पालक, शिक्षणप्रेमी व परिसरातील नागरिकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, भविष्यातही राज्य व राष्ट्रीय स्तरावर अशीच कामगिरी घडवावी अश्या शुभेच्छा दिल्या जात आहेत अशी माहिती शाळेचे अधीक्षक भूषण नरवाडे यांनी प्रसार माध्यमाना दिली.

## अवैध मूरुम व रेतीची भोकरमध्ये सर्रास वाहतूक;महसूलचे दूर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २२ जानेवारी-**

शहरातून भरदिवसा मूरुमाची व अवैध रेतीची वाहतूक सर्रास होत असून भोकर महसूल यंत्रणा याकडे कमालीचे दूर्लक्ष करीत आहे. अवैध मूरुम व रेती वाहतूकीवर महसूल प्रशासनाकडून आळा घालण्यात यावा अशी मागणी होत आहे.

भोकर शहरात मागील काही दिवसापासून मूरुम गौनखनिजाची अवैधरित्या उत्खनन सूरु आहे भोकर महसूल विभाग मात्र याकडे साफ दूर्लक्ष करित आहे. गौणखनिजाचे उत्खनन होवू नये अवैध रेतीची वाहतूक होवू नये याकरिता महसूल विभागाकडून पथके नेमण्यात आल्याची माहिती आहे पण सदरील पथक कूठे असते हे मात्र कळत नाही नावालाच पथक नेमले कि काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. पथक कार्यरत असताना मूरुम व रेतीची वाहतूक होते कशी हा प्रश्न निर्माण झाला आहे. अवैध गौनखनिजाची वाहतूक करणारी मंडळी हि महसूल कर्मचाऱ्यांशी हातमिळवणी करुन आपला व्यवसाय सूरु केल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. अर्थिक हितसंबध असल्यानेच हा प्रकार सर्रास सूरु असल्याचे उघड दिसून येते यामूळे शासनाचा लाखोंचा महसूल बूडत आहे.महसूलच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी होत असलेल्या गौनखनिजच्या उत्खननाकडे कानाडोळा करित असल्याने मूरुम व रेती माफीयांचे मनोबल वाढले आहे.भर दिवसा हायवा ट्रॅक्टर या वाहनाद्वारे शहरातून मूरुमाची व रेतीची सर्रास वाहतूक होत असल्याचे दिसून येते भोकरचे महसूल अधिकारी याकडे जाणून बूजून दूर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास येते. महसूल विभागाने सर्व सामान्य नागरीकांची कामे प्रलंबित ठेवत जो दाम देईल त्यांची कामे करण्याचा सपाटा सूरु ठेवल्याचे पहावयास मिळत आहे.वरिष्ठांनी भोकर शहरात सूरु असलेल्या अवैध मूरुम व रेती वाहतूकीकडे लक्ष घालून होत असलेल्या वाहतूकीवर आळा घालावा व अवैध मूरुम रेती वाहतूक करित असलेल्या वाहनावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही : आ. बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड,दि. २२ जानेवारी-**

सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड पुनर्वसन योजनेअंतर्गत भायेगाव व किकी या दोन्ही गावातील अंतर्गत सीसी रस्ते व नाली बांधकाम या कामाचा भूमिपूजन सोहळा दिनांक २२ जानेवारी रोजी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते पार पडला्. यावेळी बोलताना बोंढारकर म्हणाले की भायेगाव व किकी ही गावे मी दत्तक घेतल्यासारखे आहेत या गावांना मी विकास कामासाठी निधी कधीच कमी पडू देणार नाही असे मत आमदार बोंढारकर यांनी व्यक्त केले.

नांदेड तालुक्यातील व शहरानजीक असलेल्या भायेगाव येथील विकास कामाच्या भूमिपूजन सोहळा दिनांक २२ जानेवारी रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड पुनर्वसन अंतर्गत सीसी रस्ते व नाली बांधकामासाठी ८४ लाख एवढा निधी

दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी दिला. व येथील कामाचे भूमिपूजन सोहळा ग्रामस्थांच्या उपस्थित पार पडला.

यावेळी बोलताना आमदार बोंढारकर म्हणाले की हे गाव मी दत्तक घेतल्यासारखे आहे म्हणून येथे विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. यावेळी ग्रामपंचायत सरपंच सविता खोसडे, उद्धव पाटील शिंदे, सुहास खराणे, शिवाजी कदम, सुदीन बागल, गंगाधर खोसडे,उत्तम खोसडे, विठ्ठल खोसडे ,संभाजी खोसडे ,पांडुरंग कोचार, मारोती खोसडे, प्रभू पाटील कोल्हे, शिवानंद पाटील खोसडे, राजु खोसडे,गौतम भालेराव,बाबुराव कोल्हे, शंकर कोल्हे, माधव कोल्हे, दत्ता पाटील शिंदे, नारायण देशमुख, रामराव निळकंठ, उमाताई खोसडे यांच्यासह गावकऱ्यांची मोठी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी पाटील भायेगावकर यांनी केले. तसेच यावेळी किकी गावातही सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड पुनर्वसन योजनेअंतर्गत १ कोटी ८ लाख रुपये एवढा निधी आमदार बोंढारकर यांनी दिला. यावेळी या सोहळ्याचे अध्यक्ष बाबुराव देशमुख , ग्रामपंचायतचे सरपंच रवी देशमुख, व्यंकट देशमुख, अर्जुन देशमुख, शिवाजी तेलंगे, आदी उपस्थित होते.

## कृऊबा समितीमधील अवैध गाळे बांधकाम पणन संचालकांनी दिले कारवाईचे निर्देश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ जानेवारी-**

कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड मध्ये असलेल्या व्यापारी गाळयांचे लिलावाव्दारे वाटपास कलम १२ (१) चे उल्लंघण करणे, ना.वा.श.म.न.पा. ने दिलेल्या बांधकाम परवान्याचे उल्लंघन करुन नकाशा रहीत बांधकाम, प्रति नं. १ यांनी दिलेल्या मंजुरीपत्र जा.क्र. ६२२१/२०२४ दि.१३/९/२०२४ चे पालन न करणे, बांधकामाच्या निविदेत / टेंडर मंजुरीचे दि. २५ सप्टेंबर २०२४ चे पत्राचे उल्लंघन करणे, कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड मुख्य व उपबाजारातील भुखंड भाडेपट्याने न देता अप्रत्यक्षपणे विक्री करणे, गाळे लिलावासंदर्भात प्रसिद्ध दैनीकात जाहीर प्रगटन न देणे, नियम व अटीचे पालन न करता गाळे विक्री करणे, नवीन व्यापारी गाळे बांधणे, परवानगी तळमजल्याची असतांना पहिला मजला बांधणे कृषी उत्पन्न बाजार समितीने घेतलेल्या ठरावाची प्रती न देणे अशा अनेक नियमांना तिलांजली देऊन कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडच्या मोकळया भूखंडाचे लचके तोडणाऱ्यावर कायदेशीा कारवाई करावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा ॲड. प्रमोद नरवाडे यांनी दिला होता. या निवेदनाची दखल घेत राज्याचे पणन संचालक मोहन निंबाळकर यांनी या संदर्भाने कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा उपनिबंधकांना दिले आहेत.

या संदर्भाने तक्रार केजल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने जि माहिती दिली ती संश्यास्पद व अपूर्ण उत्तरे देण्यात आली असल्याचे अूड. प्रमोद नरवाडे यांनी निवेदात नमुद केले आहे.

एस.बी.आय. बैंक नवा मोंढा, च्या पुर्वेस तळमजला आणि पहिला मजला असे बांधकाम करण्यात आले आहे. त्यासंबंधी ज्या दैनिकामध्ये जाहीर प्रगटन टाकण्यात आले होते त्या संबंधीची माहिती अपूर्ण आहे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका नांदेड चा बांधकाम परवाना क्र.५२८ दि. १५/०३/२०१२ ची अंतरिम मंजुरी प्रमाणपत्र देण्यात आले असुन त्याला १३ वर्ष पुर्ण झाले आहेत त्यासाठी फक्त १ वर्षाची मुदत असते ती १५/४/२०१३ ला संपललेली आहे. मंजुरी पेक्षा जास्त प्रमाणात व्यापारी गाळण्यात बांधण्यात आले आहेत.

त्यातच बांधकाम परवान्याविषयी कोणताही सबळ पुरावा त्यांच्या उत्तरात दिलेला नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडचे व्यापारी गाळे बांधकाम संदर्भात निधीचा पुरवठा आणि त्या खर्चाबाबत जे पुरावे दिले आहेत ते दि. ०१/०८/२०२४ चे आहेत. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांच्या मंजुरी आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेने दिलेलया बांधकाम परवान्याच्या कालावधीमध्ये फरक स्पष्ट दिसत आहे.

त्यामुळे हे बांधकाम शेतकऱ्याच्या विकासासाठी आणि सोई सुविधेसाठी गाळयाचे बांधकाम केले नसुन सर्व संचालकांनी स्वतःच्या स्वार्थसाठी आणि आर्थिक लाभमिळवण्यासाठी व्यापारी गाळयाचे बांधकाम केले असुन कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडच्या मोकळया भुखंडामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या तळमजला आणि पहिला मजला यासंपुर्ण गाळयांची आपण सविस्तर चौकशी करावी आणि संबंधीत संचालक व सचिव यांच्याविरोधात कायदेशीर कार्यवाही करावी अन्यथा शेतकऱ्यांच्या हितासाठी सनदशिर मार्गाने आंदोलन उपोषण करण्यात येईल याउपरही न्याय न मिळाल्यास उच्च न्यायालयात दाद मागण्याचा ईशारा ॲड. प्रमोद नरवाडे यांनी निवेदनाद्वारे दिला होता या निवेदनाची दखल घेत राज्याचे पणन संचालक मोहन निंबाळकर यांनी बाजार समितीचे नियंत्रक अधिकारी असलेने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७, बाजार समिती सेवानियम, उपविधी. याबाबतचे शासननिर्णय व परीपत्रकान्वये आवश्यक ती कार्यवाही करावी व संबधितांना परस्पर तसे कळविण्यात यावे असे निर्देश दिले आहेत.

## बळीराजा शेत पानंद रस्ते विशेष अभियानाचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २२ जानेवारी-**

किनवटमाहूर विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या बळीराजा शेत पानंद रस्ते विशेष अभियानाचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या विशेष अभियानाचे उद्घाटन आ.भिमराव केराम यांच्या हस्ते करण्यात आले.

या अभियानाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत जाण्यासाठी पक्क्या व सर्वहंगामी रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. याअंतर्गत पानंद रस्त्यांचे सर्वेक्षण, नकाशांकन व पुनर्स्थापना करण्यात येणार असून, अतिक्रमणमुक्त शेत रस्त्यांसाठी स्वतंत्र विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

या अभियानामुळे शेतमाल वाहतुकीसाठी लागणारा वेळ व खर्चात लक्षणीय बचत होणार आहे. पावसाळ्यातही शेतात जाण्यास अडथळे येऊ नयेत, यासाठी सर्व ऋतूंमध्ये वापरता येतील असे रस्ते विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच ग्रामस्तरावर शेत रस्त्यांचा समन्वयित व नियोजनबद्ध विकास साधण्यात येणार आहे.

कृषी यंत्रसामग्रीचा वापर सुलभ होऊन आधुनिक शेतीला चालना मिळेल. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी मजबूत पायाभूत सुविधा निर्माण होणार असून, गावाच्या सर्वांगीण विकासात शेत रस्त्यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

या कार्यक्रमप्रसंगी बोलताना आमदार भिमरावजी केराम यांनी सांगितले की, शेतकरी आणि प्रशासन यांच्या परस्पर समन्वयातून या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी केली जाईल. शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करून त्यांचे जीवनमान उंचावणे हेच या अभियानाचे अंतिम ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उद्घाटनप्रसंगी आमदार भिमराव केराम यांचे स्वीय सहाय्यक प्रकाश कुडमते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विशेष अभियानामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी दूर होऊन ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

**भोकर नगरपरिषद, भोकर जि. नांदेड**
मुख्य प्रशासकीय इमारत
साईबाबा पेट्रोलपंप समोर, नांदेड रोड, भोकर ता. भोकर जि. नांदेड-४३१८०१
Email: - cobhokargmail.com दुरध्वनी क्रमांक कार्यालय (०२४६७) २२२२९९-२२३३९९

जा.क्र. ३८९ दिनांक : २२ जानेवारी २०२५

**ई-निविदा सूचना**
**(स्वच्छता विभाग)**
**(२०२५-२६)**

मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि.नांदेड यांच्या वतीने भोकर नगरपरिषद अंतर्गत भोकर शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प नगर परिषद भोकर येथे जुन्या माचलेल्या कचऱ्याचे शास्त्रोक्तरित्या (बायोमायनींग प्रक्रियेव्दारे) विल्हेवाट लावणे या कामाकरिता ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. दि. २३/०१/२०२६ ते ३०/०१/२०२६ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

दिनांक २२/०१/२०२६

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद भोकर**
**जि. नांदेड**

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## खामकरवाडी-बावी शिवारात विद्युत वाहिनी वायर चोरी

### अडीच लाखांचा मुद्देमाल लंपास; गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जानेवारी -**

येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खामकरवाडी ते बावी शिवार परिसरात अज्ञात चोरट्यांनी सेरेंटीका कंपनीच्या विद्युत वाहिनीच्या ॲल्युमिनियम वायरची मोठ्या प्रमाणावर चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या चोरीत सुमारे २ लाख ५० हजार रूपये किमतीचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजल्यापासून ते दि.१७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपर्यंतच्या दरम्यान खामकरवाडी ते बावी शिवारात बसविण्यात आलेली सेरेंटीका कंपनीची L59 DOG कंडक्टर ॲल्युमिनियम विद्युत वाहिनी वायर (सुमारे १,००० मीटर) अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी फिर्यादी आरीफ हशन दारुवाले (वय ३३ वर्षे), रा. तेरखेडा, ता. वाशी, जि. धाराशिव यांनी दि. २१ जानेवारी २०२६ रोजी येरमाळा पोलीस ठाण्यात प्रथम खबर दिली.

त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# सोलापूर-धुळे महामार्गावरील टायर लुटीचा गुन्हा उघड; ८.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

### दोघे आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जानेवारी -**

दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरून कंटेनरमधून नवीन टायर घेऊन जाणाऱ्या ट्रक चालक रामजी शोभनाथ यादव यांच्यावर लक्ष्मी पारधी पिढी, तेरखेडा परिसरात लुटीचा प्रकार घडला होता. या गंभीर गुन्ह्याचा पर्दाफाश करत स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव पथकाने मोठी कामगिरी बजावली असून तब्बल ८ लाख २८ हजार ६५९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश आले आहे.

सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार (स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव) यांनी पथकाला विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दि.२१ जानेवारी २०२६ रोजी स्थागुशाचे पथक पेट्रोलिंग करीत असताना अनिल मच्छींद्र पवार (वय ३४, रा. लक्ष्मी पारधी पिढी, तेरखेडा) हा संशयित इसम तेरखेडा गावात आल्याची गुप्त माहिती मिळाली. त्याच्याकडे असलेली मोटारसायकल चोरीची असल्याचे तसेच चोरीतील टायर व इतर मुद्देमाल जंगल परिसरात लपवून ठेवल्याची माहिती प्राप्त झाली.

पोलीस पथकाने संशयिताचा शोध घेत असताना तो पथकास पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र पोलिसांनी शिताफीने त्याला ताब्यात घेतले. त्याच्यासोबत असलेल्या दुसऱ्या इसमासही पकडण्यात आले. चौकशीत त्यांनी आपली नावे अनिल मच्छींद्र पवार



व नाना तानाजी शिंदे (वय २७, रा. भिकारसारोळा, ता. व जि. धाराशिव) अशी सांगितली.

सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या आरोपींना विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता, त्यांनी इतर दोन साथीदारांसह सोलापूर-धुळे महामार्गावरून जाणाऱ्या कंटेनरमधून नवीन टायर चोरी केल्याची तसेच पानगाव येथे चोरी केल्याची कबुली दिली.

याशिवाय वाशी, बेंबळी, येरमाळा व भादा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अनेक मोटारसायकली चोरून आणल्याचेही त्यांनी मान्य केले.

आरोपींच्या माहितीनुसार पोलीस पथकाने लक्ष्मी पारधी पिढीच्या पाठीमागील जंगल परिसरात छापा टाकून तेथून २९ नवीन टायर, ४ चोरीच्या मोटारसायकली, गुन्ह्यातील रोख रक्कम, गुन्हा करताना वापरलेले चारचाकी वाहन असा एकूण ८ लाख २८ हजार ६५९ रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके, पोलीस हवालदार विनोद जानराव, नितीन जाधवर, बबन जाधवर, चालक पोलीस हवालदार महबूब अरब व रोहित दंडनाईक यांनी विशेष सहभाग नोंदवला.

## कानेगाव येथे महिलांसाठी हळदीकुंकू व सक्षमीकरण जाणीव-जागृती कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथे दि. २१ जानेवारी २०२६ रोजी महिला सक्षमीकरण व सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने महिला बहुउद्देशीय केंद्र, कानेगाव व धान फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी हळदीकुंकू तसेच सामाजिक, आर्थिक व कायदेविषयक साक्षरता आणि स्वावलंबी विकास जाणीव-जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून कमला काटे, सुप्रीया अडसूळे व मुलायम शेख उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शन अन्नपूर्णा धेंडे (विभागीय कार्यालय, धान फाउंडेशन, सोलापूर) यांनी केले. या कार्यक्रमास कानेगाव व परिसरातील बहुसंख्य महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना माहितीपूर्ण मार्गदर्शनासह सन्मान व प्रेरणा मिळाल्याची भावना सहभागी महिलांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचा समारोप द्रौपदी माने (महिला बहुउद्देशीय केंद्र प्रमुख) यांनी आभार प्रदर्शन करून केला. त्यांनी उपस्थित सर्व मान्यवर, धान फाउंडेशन, सोलापूर तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सहभागी महिलांचे आभार मानले.

## लोहारा शहरात मोफत पशूचिकित्सा शिबिरातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि सेवा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ जानेवारी -**

लोहारा शहरातील शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्राचार्य डॉ. शेषेराव जावळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या निवासी शिबिराअंतर्गत मंगळवार, दि.२१ जानेवारी रोजी मोफत पशूचिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरात गाय व म्हैस यांच्या वंध्यत्व तपासणी व निवारण, विविध लसीकरण, वासरांना जंतुनाशक औषधांचे वाटप तसेच गाई-म्हशींना औषधयुक्त भरवण करण्यात आले. शेतकऱ्यांना दुधाळ जनावरांचे आजार, त्यांची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना या विषयावर सविस्तर मार्गदर्शन व चर्चाही करण्यात आली.

शिबिरासाठी डॉ. आकाश गुजेवाड, पशूवैद्यकीय अधिकारी, लोहारा तसेच शकील शेख, सहाय्यक यांनी आपली मोलाची सेवा बजावली. शेतकऱ्यांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. बालाजी राजोळे, प्रा. भैरवनाथ मोटे, प्रविण पाटील (चेअरमन, वि.का.से.सो. मार्डी) तसेच परमेश्वर कदम यांनी विशेष सहकार्य केले.

शिबिरास गावातील शेतकरी व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परंडा तालुक्यात उमेदवारी अर्जांच्या अखेरच्या दिवशी मोठी गर्दी; प्रशासनाची धावपळ

### जिल्हा परिषदेच्या पाच गटासाठी ९२...

### पंचायत समितीचे दहा गणासाठी १४८ उमेदवारांचे उमेदवारी अर्ज पात्र ...




**आप्पासाहेब शिंदे**
**परंडा, दि.२२ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी मंगळवार, दि.२१ जानेवारी रोजी परंडा तालुक्यात मोठी गर्दी पाहायला मिळाली. तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृह परिसरात जिल्हा परिषदेच्या ५ गटांसाठी व पंचायत समितीच्या १० गणांसाठी सर्वपक्षीय तसेच अपक्ष इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल केल्याने प्रशासनाची चांगलीच धांदल उडाली.

#### जिल्हा परिषद गटनिहाय अर्ज व उमेदवार संख्या...

शेळगाव : अर्ज २१, उमेदवार १३, आनाळा : अर्ज १२, उमेदवार ११, जवळा (नि.) : अर्ज २३, उमेदवार १९, डोंजा : अर्ज १८, उमेदवार १४, लोणी : अर्ज १८, उमेदवार १४.

**एकूण : अर्ज ९२, उमेदवार ७१**

#### पंचायत समिती गणनिहाय अर्ज व उमेदवार संख्या...

चिंचपूर (बु.) : अर्ज २०, उमेदवार १७, शेळगाव : अर्ज ६, उमेदवार ५, आनाळा : अर्ज ९, उमेदवार ७, खासापुरी : अर्ज १३, उमेदवार ९, जवळा (नि.) : अर्ज १७, उमेदवार १४, सिरसाव : अर्ज १५, उमेदवार १३, डोंजा : अर्ज १२, उमेदवार ११, सोनारी : अर्ज १७, उमेदवार १२, वडणेर : अर्ज २५, उमेदवार १६, लोणी : अर्ज १४, उमेदवार १२.

**एकूण : अर्ज १४८, उमेदवार ११६**

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अधिकृत वेळ दुपारी ३ वाजेपर्यंत असली तरी प्रत्यक्षात रात्री उशिरापर्यंत अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू होती. शेवटच्या क्षणापर्यंत उमेदवार, त्यांचे समर्थक, विविध पक्षांचे कार्यकर्ते व प्रतिनिधी वस्तीगृह परिसरात गर्दी करून अर्ज भरण्याच्या गडबडीत गुंतले होते.

दि.१६ जानेवारी ते २१ जानेवारी या कालावधीत परंडा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ५ गटांसाठी एकूण ७१ उमेदवारांनी ९२ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

तर पंचायत समितीच्या १० गणांसाठी ११६ उमेदवारांनी तब्बल १४८ उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, बुधवार दि. २२ जानेवारी रोजी सर्व उमेदवारांच्या अर्जांची छाननी करण्यात आली असून, सर्व उमेदवारी अर्ज पात्र ठरले आहेत, अशी माहिती निवडणूक प्रशासनाने दिली.

आता माघार व पुढील निवडणूक प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जि.प. निवडणुकीत धनगर समाजाला डावलल्याने तुळजापूर तालुक्यात भाजपविरोधात तीव्र संताप


**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपने धनगर समाजातील एकाही कार्यकर्त्याला उमेदवारी न दिल्याने तालुक्यातील सकल धनगर समाजात तीव्र असंतोष पसरला आहे. या निर्णयाचा फटका येत्या जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

तुळजापूर तालुक्यातील धनगर समाज हा कायम भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिलेला आहे. तालुक्यातील धनगर समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या विधानसभा निवडणूक प्रचारात सक्रिय सहभाग घेतला होता. तसेच ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी धनगर समाजाच्या वतीने अनेक आंदोलनेही करण्यात आली आहेत. असे असतानाही, तालुक्यात मोठ्या संख्येने असलेल्या धनगर समाजाला भाजपने जिल्हा परिषद निवडणुकीत पूर्णपणे डावलल्याचा आरोप करण्यात येत आहे.

तालुक्यातील एकूण ९ जिल्हा परिषद गटांपैकी एकाही गटात भाजपने धनगर समाजाच्या कार्यकर्त्याला उमेदवारी दिलेली नाही. केवळ पंचायत समितीच्या काही गणांपुरतीच धनगर समाजाची बोळवण करण्यात आल्याचा आरोप समाज बांधवांकडून होत आहे. यापूर्वी नगरपालिका निवडणुकीतही नळदुर्ग शहरात भाजपने धनगर समाजातील एकाही कार्यकर्त्याला उमेदवारी दिली नव्हती. हाच पॅटर्न आता जिल्हा परिषद निवडणुकीतही कायम राहिल्याने आश्चर्य आणि नाराजी व्यक्त केली जात आहे.

तुळजापूर तालुक्यातील काटगाव जिल्हा परिषद गटातून राम जवान तसेच जळकोट जिल्हा परिषद गटातून गणेश सोनटक्के यांनी भाजपकडून उमेदवारी मागितली होती. मात्र या दोघांनाही भाजपने डावलल्याचा आरोप करण्यात आला आहे. जळकोट पंचायत समिती गणातून आशिष सोनटक्के यांना उमेदवारी देण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात सोनटक्के यांनी जिल्हा परिषद गटासाठी इच्छुकता दर्शवली होती, असेही समाज बांधवांचे म्हणणे आहे.



२०१९ आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राम जवान यांनी तुळजापूर तालुका विधानसभा मतदारसंघात भाजपचा उमेदवार निवडून यावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले. मात्र त्या निष्ठेचे फळ जिल्हा परिषद निवडणुकीत मिळाले नसल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर तुळजापूर तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने भाजपच्या या भूमिकेचा जाहीर निषेध करण्यात आला आहे. तालुक्यात मोठ्या संख्येने असणाऱ्या धनगर समाजाला जिल्हा परिषद निवडणुकीत का डावलण्यात आले? असा थेट सवाल समाजाच्या वतीने उपस्थित करण्यात आला आहे.

भाजपने जिल्हा परिषद निवडणुकीत धनगर समाजाला एकही उमेदवारी न देता केवळ पंचायत समितीच्या दोन गणांपुरती मर्यादित उमेदवारी दिल्याने समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. परिणामी, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपविरोधी मतदान करण्याचा निर्णय सकल धनगर समाजाने घेतल्याचे सांगण्यात येत असून, याचा थेट परिणाम तुळजापूर तालुक्यातील भाजपच्या निवडणूक गणितावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## लोहारा शहरात मोफत पशूचिकित्सा शिबिरातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ जानेवारी -**

लोहारा शहरातील शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्राचार्य डॉ. शेषेराव जावळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या निवासी शिबिराअंतर्गत, मंगळवार, दि.२१ जानेवारी रोजी मोफत पशूचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात गाय व म्हैस यांचे वंध्यत्व तपासणी व निवारण, विविध लसीकरण, वासरांना जंतुनाशक औषधे वाटप, तसेच गाई-म्हशींना औषधयुक्त भरवण करण्यात आले. यासोबत शेतकऱ्यांना दुधाळ जनावरांचे आजार, त्यांची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना यावर सविस्तर मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली. शिबिरासाठी डॉ. आकाश गुजेवाड, पशूवैद्यकीय अधिकारी, लोहारा तसेच श्री. शकील शेख, सहाय्यक यांनी आपली मोलाची सेवा बजावली. शेतकऱ्यांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. बालाजी राजोळे, प्रा. भैरवनाथ मोटे, प्रविण पाटील तसेच परमेश्वर कदम यांनी विशेष सहकार्य केले.

# श्री गुरु तेग बहादूर साहेबजींच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्हाभर उपक्रम राबवा : जिल्हाधिकारी पुजार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जानेवारी -**

हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांचे बलिदान संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. सर्व धर्मांप्रती समानतेची भावना आणि मानवतेसाठी त्यांनी केलेला सर्वोच्च त्याग समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्हाभर योग्य नियोजनातून विविध उपक्रम राबवावेत तसेच दि. २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमात जिल्ह्यातील संबंधित समाज बांधवांची लक्षणीय उपस्थिती राहील, असे नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

दि. २१ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून संबंधित विभागप्रमुख, तहसीलदार, गटविकास अधिकारी व नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत तसेच नांदेड येथील कार्यक्रमाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) कुंभार यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांची ऑनलाईन उपस्थिती होती. तर निवासी



उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर व जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांची प्रत्यक्ष उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी पुजार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने तालुकास्तरावर तहसीलदार, गटविकास अधिकारी व नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांनी बैठका घ्याव्यात. जिल्ह्यातील शाळा, आश्रमशाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबवावेत.

विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन, तसेच गाव व शहरांमध्ये प्रभात फेरी काढण्यात यावी. विद्यार्थ्यांना 'सरताज' यांचे गीत व माहितीपट दाखविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

नांदेड येथील कार्यक्रमासाठी श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्याशी संबंधित सिख, बंजारा, सिकलकर, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन तसेच भगत नामदेव (वारकरी) संप्रदायातील समाज बांधवांपैकी जिल्ह्यातील इच्छुक व्यक्तींची यादी तयार करावी व त्यांना कार्यक्रमास नेण्यासाठी योग्य व्यवस्था करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विशेषतः उमरगा, लोहारा व तुळजापूर तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंजारा समाज बांधव असल्याने, त्यांच्याशी संपर्क साधून गटविकास अधिकारी यांनी त्यांना नांदेड येथील कार्यक्रमासाठी प्रोत्साहित करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेच्या शाळा व विद्यालयांमध्ये गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विविध उपक्रम राबविले जात असून, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. या सर्व उपक्रमांची माहिती व छायाचित्रे संबंधित पोर्टलवर अपलोड करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी उमरगा, लोहारा व तुळजापूर तालुक्यांतून जास्तीत जास्त नागरिक नांदेड येथील कार्यक्रमास उपस्थित राहतील, यासाठी योग्य नियोजन करण्याचे आवाहन केले. जाणाऱ्यांसाठी वाहनांची व्यवस्था करावी, इच्छुकांची यादी तयार करावी तसेच समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना तालुकास्तरावर बैठकीस बोलावून त्यांच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांचा सहभाग सुनिश्चित करावा, असे त्यांनी सांगितले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) कुंभार यांनी सांगितले की, नांदेड येथील कार्यक्रमास जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिक उपस्थित राहावेत, यासाठी गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठका घेण्यात आल्या आहेत.

शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे यांनी माहिती दिली की, जिल्हा, तालुका व गावस्तरावर विविध शाळा व विद्यालयांमध्ये स्पर्धा व अन्य उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, या उपक्रमांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित केला जात आहे.

या आढावा बैठकीमुळे गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या शहीदी संदेशाचा प्रसार करण्यासाठी जिल्हाभर व्यापक व प्रभावी उपक्रम राबविण्याची दिशा निश्चित झाली आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजापूरात महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जानेवारी -**

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण अज्ञात महिलांनी गर्दीचा फायदा घेत चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी आशाबाई उर्फ चिमनाबाई दयाराम शिंदे (वय ६५ वर्षे), रा. रोहीदास नगर, भवानी रोड, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव (मूळ रा. बारामती) या दि. १८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी जात असताना गर्दीत अज्ञात महिलांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे ४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण चोरून नेले.



ही बाब लक्षात येताच आशाबाई शिंदे यांनी याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार दि. २१ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### गणेश जयंतीनिमित्त परंड्यात रक्तदान शिबिर

**परंडा, दि.२२ जानेवारी -**

परंडा शहरातील जयभवानी गणेश मंदिरात श्री गणेश जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. सालाबादप्रमाणे यंदाही विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून हा उत्सव उत्साहात पार पडला. गणेश जयंतीनिमित्त गुरुवार, दि.२२ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता भगवंत रक्तपेडी, बार्शी संस्थेच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल ५१ युवकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन परंडा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष समरजितसिंह ठाकूर, मन्नान बासले आणि मदनसिंह सद्धीवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धीरजसिंह ठाकूर यांच्यासह जयभवानी गणेश मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमास जयभवानी गणेश मंडळाचे पदाधिकारी ॲड. अनिकेत काशीद, पंकज नांगरे, प्रशांत नांगरे, जयंत काशीद, आप्पा लोकरे, कुणाल जाधव, अतुल काशीद, आकाश काशीद, सनी काशीद, आदित्य नांगरे, बॉबी काशीद, शंतनु खर्डेकर, योगेश मस्के, ओंकार काशीद, विनायक काटवटे, मयूर जाधव, सुजय जाधव, सचिन आगरकर, रोहन आगरकर तसेच इतर मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### लोहारा शहरात हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात संपन्न


**लोहारा, दि.२२ जानेवारी -**

लोहारा शहरातील शिवनगर येथील सावित्रीबाई सखी महिला ग्रुपच्या वतीने मकर संक्रांत सणानिमित्त आयोजित हळदीकुंकू कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. सालाबादप्रमाणे याही वर्षी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि सुमारे १५०० पेक्षा अधिक महिलांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. कार्यक्रमात उपस्थित महिलांना भेटवस्तू, पान, दुपारी व तिळगुळ यासह विविध पदार्थांचा वाटप करण्यात आला. यामध्ये मिरा माळी, मंगल क्षिरसागर, उर्मिला सुर्यवंशी, गुरुदेवी माळी, पुजा माळी, सुरेखा घोडके, सुजाता क्षिरसागर, मनिषा माळी, प्रणिता माळी, महादेवी माळी, माधुरी गवळी, जयश्री वाघमारे, गितांजली क्षिरसागर, माया क्षिरसागर, सुनीता फुलसुंदर, उमा माळी, मोहोर क्षिरसागर, लक्ष्मी सुतार, डॉ. छाया कडेकर, प्रा. श्रीमती माने, सुनंदा क्षिरसागर, भाग्यश्री काटे, मिना भोगाडे, मंगल क्षिरसागर, प्राजक्ता माळी, लता दुबे, दिपाली दुबे, गिता शिंदे, अंजली शिंदे, दिपाली बिराजदार यांचा समावेश होता.

### अप्पाराव कोकणे यांचे निधन

**नळदुर्ग, दि.२२ जानेवारी -**

नळदुर्ग येथील ढोर समाजातील ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्त नायब तहसिलदार अप्पाराव कोकणे यांचे



मंगळवार, दि.२१ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच नळदुर्ग शहरासह परिसरात शोककळा पसरली. दि.२२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता नळदुर्ग येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यसंस्कारास नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# तिकीटांचा खेळ : गेटकण उमेदवारांची लॉटरी; निष्ठावान कार्यकर्ते उपेक्षितच, गटबाजीला उधाण!




**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२२ जानेवारी -**

जिल्ह्यात आता निवडणुकीचं वादळ उठायला लागलंय. पण गावागावात चर्चा विकासाची नाही, तर तिकीट कुणाला दिलं? याचीच जास्त आहे. वर्षानुवर्षे पक्षासाठी झेंडे उचलणारे, सभा-मेळावे काढणारे कार्यकर्ते आज मात्र बाजूलाच उभे आहेत. तिकीट मिळालंय ते नेहमी दिसणाऱ्यांना नाही, तर 'वरच्या ओळखी' असलेल्यांनाच, अशी कुजबुज सगळीकडे आहे.

आम्ही फक्त पोस्टर लावायला आहोत का? असा सवाल आता चहाच्या टपरीपासून थेट बैठकीपर्यंत ऐकायला मिळतोय. गावातल्या लोकांना ओळख नसलेल्या माणसाच्या नावावर तिकीट दिलं गेलं, हे कुणालाच पचनी पडलेलं नाही. काम, संघर्ष, निष्ठा सगळं बाजूला ठेवून 'ज्याचा हात वर, त्यालाच तिकीट' असा कारभार सुरू असल्याची भावना आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात विविध राजकीय पक्षांत उमेदवार निवडीवरून तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. पक्षासाठी दीर्घकाळ काम करणारे निष्ठावान कार्यकर्ते डावलले जात असून, काही मोजक्या गटांतील आणि नेतृत्वाच्या जवळच्या मर्जीतील व्यक्तींनाच उमेदवारी दिली जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे जिल्हाभरात पक्षांतर्गत गटबाजी उफाळून आली आहे.

स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मते, उमेदवार निवड ही 'गेटकण' पद्धतीने होत असून कार्यकर्त्यांच्या कामाचा, जनाधाराचा किंवा सामाजिक योगदानाचा विचार केला जात नाही. अनेक ठिकाणी ज्या व्यक्तींचा थेट जनसंपर्क नाही, अशा उमेदवारांना तिकीट दिल्याने पक्षाच्या मूळ कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

या निर्णय प्रक्रियेमुळे अनेक कार्यकर्त्यांनी प्रचारापासून अलिप्त राहण्याची भूमिका घेतली असून, काही ठिकाणी बंडखोरीची शक्यता वर्तवली जात आहे. पक्ष नेतृत्वाने वेळीच दखल न घेतल्यास अंतर्गत नाराजीचा फटका थेट मतदानावर बसू शकतो, असा इशारा ज्येष्ठ कार्यकर्त्यांकडून दिला जात आहे. स्थानिक निवडणुका या कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर लढल्या जातात. मात्र अशा वेळी कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता घेतलेले निर्णय पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीस धोका निर्माण करू शकतात. अंतर्गत गटबाजी, नाराजी आणि संभाव्य बंडखोरी याचा लाभ विरोधक घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. गावागावातील जुने कार्यकर्ते सांगतात, निवडणूक ही पैसा आणि ओळखीवर नाही, तर माणसांवर जिंकली जाते. पण वर बसलेल्यांना हे कळायला तयार नाही. निवडणूक जिंकायच्या नादात त्यांनी स्वतःचं पायावर कुऱ्हाड मारलीय, असं बोललं जातंय. जिल्हा नेतृत्वाकडून मात्र सध्या सगळीकडे शांतता आहे. कुणी काही बोलत नाही, पण आतमध्ये सगळं पेटलेलं आहे. ही शांतता फार दिवस टिकणारी नाही, हे गावकऱ्यांना चांगलंच कळतंय. वेळेत ऐकून घेतलं नाही, तर ही नाराजी मतदानाच्या दिवशी मतपेटीतून बाहेर येईल, अशी ठाम भावना आहे.

आगामी काळात पक्ष नेतृत्व कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्यासाठी काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. अन्यथा, धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका केवळ बाह्य राजकीय लढाईपुरत्या मर्यादित न राहता, पक्षांतर्गत संघर्षाचे रणांगण ठरण्याची दाट शक्यता आहे.

### आम्ही केवळ झेंडे वाहण्यासाठी आहोत का ?...

जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये उमेदवार जाहीर होताच कार्यकर्त्यांनी बैठका घेत आपली नाराजी व्यक्त केली आहे. पक्षासाठी रस्त्यावर उतरून काम करणाऱ्यांना बाजूला सारून अचानक उमेदवार उभे केले जात आहेत, ही कार्यकर्त्यांवरची अन्यायकारक वागणूक आहे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. या निर्णयांमुळे कार्यकर्त्यांमध्ये केवळ नाराजी नाही, तर संताप उफाळून आला आहे. आम्ही केवळ झेंडे वाहण्यासाठी आहोत का? असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

### निष्ठावान कार्यकर्ते डावलले, गटबाजीला खुली मोकळीक...

वर्षानुवर्षे पक्षासाठी रस्त्यावर उतरून काम करणारे निष्ठावान कार्यकर्ते आज तिकीट प्रक्रियेतून अक्षरशः हद्दपार झाल्याचे चित्र आहे. उमेदवारी ठरवताना कार्य, जनाधार, सामाजिक स्वीकारार्हता या निकषांना बाजूला सारून 'गेटकण' पद्धतीने नावांची यादी तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. काही ठिकाणी तर मतदारसंघाशी फारसा संबंध नसलेल्या, पण नेतृत्वाच्या जवळच्या व्यक्तींना थेट उमेदवारी बहाल करण्यात आली आहे. त्यामुळे पक्ष संघटनेत प्रचंड अस्वस्थता पसरली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ जानेवारी -**

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील २२ वर्षीय तरुणीवर (नाव व गाव गोपनीय) लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून संबंधित तरुणाविरुद्ध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मार्च २०२५ पासून ते दि.१८ जानेवारी २०२६ रोजी पहाटे १.३० वाजण्याच्या सुमारास पीडित तरुणीला त्याच गावातील एका तरुणाने लग्नाचे आमिष दाखवत विश्वासात घेतले. त्यानंतर तिला शेतात घेऊन जाऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. या प्रकाराबाबत घरच्यांना सांगितल्यास तुला व तुझ्या कुटुंबीयांना जिवे ठार मारून टाकीन, अशी धमकी देत आरोपीने पीडितेला दहशतीखाली ठेवले असल्याचे तक्रारीत नमूद आहे. दीर्घकाळ मानसिक तणाव सहन केल्यानंतर पीडित तरुणीने अखेर धाडस दाखवत दि. २१ जानेवारी २०२६ रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात प्रथम खबरेद्वारे तक्रार दाखल केली. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास नळदुर्ग पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत असून, आरोपीच्या अटकेसाठी हालचाली सुरू आहेत.

## बंडाचे निशाण! जवळा-डोंजा गटातून माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांची 'अपक्ष' शड्डू

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२२ जानेवारी -**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत आता मोठी खळबळ उडाली आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आणि वजनदार नेते धनंजय सावंत यांनी जवळा व डोंजा गटातून आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सावंत यांच्या या निर्णयामुळे प्रस्थापित पक्षांच्या गोटात अस्वस्थता पसरली असून, निवडणुकीचे समीकरण पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून जवळा आणि डोंजा परिसरात धनंजय सावंत यांचा मोठा जनसंपर्क आहे.

जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी अनेक विकासकामांचा



डोंगर उभा केला होता. मात्र, यंदाच्या निवडणुकीत पक्षीय उमेदवारीवरून झालेल्या घडामोडींनंतर, त्यांनी 'एकला चलो रे'ची भूमिका घेत अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी समर्थकांच्या आग्रहाखातर आणि मतदारसंघाच्या विकासासाठी आपण हा निर्णय घेतल्याचे संकेत दिले.

जवळा आणि डोंजा या दोन्ही गटांत सावंतांची वैयक्तिक ताकद मोठी असल्याने, याचा फटका नेमका कोणाला बसणार, याबाबत आता राजकीय विश्लेषकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

## बावी येथील आत्महत्या प्रकरणी न्यायालयाची गंभीर दखल; सरपंचाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२२ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील बावी येथे उपसरपंचांचे पती किरण भिमराव जगताप यांनी कथित मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याप्रकरणी अखेर न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, वाशी यांनी या प्रकरणात येरमाळा पोलिसांना संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून सखोल तपास करण्याचे आदेश दिले आहेत.

३ सप्टेंबर २०२४ रोजी किरण जगताप यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेनंतर मृताच्या कुटुंबीयांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी बावी येथील सरपंचाकडून किरण जगताप यांना सातत्याने मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप केला होता. याबाबत येरमाळा पोलिस ठाण्यात वेळोवेळी तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र या तक्रारींची दखल न घेता पोलिसांनी कोणतीही ठोस कारवाई न केल्याचा आरोप कुटुंबीय व ग्रामस्थांकडून करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर मृताचे मित्र व सामाजिक कार्यकर्ते राजेश शिवाजी शिंदे यांनी ॲड. अजित एस. डोंगफोडे यांच्यामार्फत प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, वाशी न्यायालयात खाजगी तक्रार दाखल केली. या तक्रारीवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने प्राथमिकदृष्ट्या गंभीर बाबी आढळून आल्याचे नमूद करत बावी येथील सरपंच संजय मच्छिंद्र शिंदे यांच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करून सखोल तपास करण्याचे आदेश येरमाळा पोलिसांना दिले आहेत.

न्यायालयाच्या या आदेशामुळे या प्रकरणाला नव्याने गती मिळाली आहे.

## लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी इ-पिक पाहणी करण्याचे आवाहन

**लोहारा, दि.२२ जानेवारी -**

तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आपली रब्बी इ-पिक पाहणी चालू असलेल्या पाहणी अँपमधून जास्तीत जास्त प्रमाणात पूर्ण करण्याचे आवाहन तहसील कार्यालयाचे तहसीलदार रणजित कोळेकर यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी दि.२४ जानेवारी पर्यंत आपल्या जवळच्या सीएससी केंद्रावर जाऊन आपली इ-पिक पाहणी नोंदवावी, असे सांगितले आहे. या पाहणीमुळे शेतकऱ्यांचे पीक डेटा वेळेवर शासनाला मिळेल तसेच योग्य प्रकारे सवलती, मदत आणि योजना लाभ उपलब्ध करून दिले जातील.

तहसीलदार कोळेकर यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की, इ-पिक पाहणीसाठी वेळेत सहभाग घेणे अत्यंत आवश्यक असून, यामुळे प्रशासनाला रब्बी हंगामाचे योग्य नियोजन करण्यात मदत होईल.

## ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांना स्व.आ. साहेबराव आबा हंगरगेकर स्मृती साहित्य पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ जानेवारी -**

इंग्रजी संभाषण हे एक कौशल्य आहे. इतर कौशल्यांप्रमाणेच त्याच्याकडे पहायला हवे. इंग्रजीतून शालेय शिक्षणाकडे असलेला कल मराठी भाषेसमोरील आव्हान आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला, हे ठीकच आहे. मात्र आपल्या घरातून मराठी भाषेचा पूर्वीप्रमाणे अंगीकार केला जातो आहे काय? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आपल्या मुलांना शालेय शिक्षण मातृभाषेतूनच मिळायला हवे, असे ठाम मत ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांनी व्यक्त केले.

तुळजापूर येथे मंगळवारी सायंकाळी मराठवाडा साहित्य परिषद आणि स्वर्गीय साहेबराव हंगरगेकर फाउंडेशनच्या वतीने स्व. आमदार साहेबराव हंगरगेकर स्मृती साहित्य पुरस्कार देवून त्यांना गौरविण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

हा सन्मान म्हणजे मराठी भाषेसाठी योगदान दिलेल्या पूर्वासुरींचा सन्मान आहे, असे आपण मानतो. तुळजाभवानी मातेच्या नगरीत होत असलेला आपला सन्मान हा केवळ आपला नसून मायमराठीच्या सेवेचा गौरव असल्याचेही नायगावकर यांनी नमूद केले. संत साहित्यापासून ते आजवर मायमराठीला अनेकांनी समृध्द केले आहे. त्या परंपरेतील एक छोटा भाग आपल्याला होता आले.



याचे मनस्वी समाधान असल्याचेही त्यांनी सांगितले. या पुरस्कारामुळे आणखी गांभीर्याने साहित्यसेवा करण्याची जबाबदारी वाढली असल्याचेही नायगावकर यांनी सांगितले.

साहेबराव हंगरगेकर फाउंडेशनच्या वतीने नगराध्यक्ष विनोद गंगणे, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, तुळजापूर मसाप शाखेचे अध्यक्ष अमर हंगरगेकर, पंडित जगदाळे, राजेश शिंदे, प्रताप हंगरगेकर, दिपक हंगरगेकर, रंगनाथ हंगरगेकर, दत्ता हंगरगेकर, बाळासाहेब हंगरगेकर, गुणवंत हंगरगेकर, प्रदीप हंगरगेकर यांच्या हस्ते नायगावकर यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. रु. २१०००/- आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

तुळजापूर तालुका तसेच मराठवाड्याच्या राजकीय, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे व्यक्तिमत्व म्हणून साहेबराव आबा हंगरगेकर यांची ओळख होती. साहित्यिक तसेच ग्रंथालय चळवळीत त्यांचे योगदान महत्वाचे होते. महाराष्ट्रातील विविध भागातील साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मान्यवरांची समिती पुरस्कारार्थीची निवड करते. त्यानुसार यंदाच्या पुरस्कारासाठी ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दास पाटील यांनी, मानपत्र वाचन प्रा. विवेक कोरे, सूत्रसंचालन व आभार प्रा. अरविंद हंगरगेकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मसाप कार्यवाह विजय देशमुख, उपाध्यक्ष अरूण कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य तुषार सुत्रावे, संदिप गंगणे, किरण हंगरगेकर, ॲड. ओंकार मस्के, देवेंद्र पवार, दिलीप भारती, आण्णासाहेब क्षीरसागर, हंगरगेकर फाउंडेशनचे अनिल हंगरगेकर, कृष्णा हंगरगेकर, आदित्य हंगरगेकर, सोमनाथ हंगरगेकर, यश हंगरगेकर यांच्यासह मसापचे सदस्य आणि हंगरगेकर परिवाराने परिश्रम घेतले.

कार्यक्रमास शहर आणि परिसरातील रसिकश्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.